# बाल विहग

[ बालकवींच्या निवडक कवितांचा संग्रह ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. १६९५८

संपादक

अनुराधा पोतदार, एम्. ए., पीएच्. डी.

सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे

REFBK-0016957

REFBK-0016957

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

मूल्य रु. ४·००

व्हीनस प्रकाशन : पुणे

आवृत्ती पहिली : १३ ऑगस्ट १९६८

सर्व हक्क प्रकाशकांच्या स्वाधीन

प्रकाशक :
सदाशिव कृष्ण पाध्ये
व्हीनस प्रकाशन
'त प श्च र्या'
३८१ क, शनिवार पेठ : पुणे २

मुद्रक :
प्रभाकर सिद्ध
साधना प्रेस
४३०-३१ शनिवार पेठ, पुणे २

१६५५८

# बालकवी : एक चिंतन

'बालविहग आनन्द मूर्तिमान् झुलतो गगनांत शोभा (

डोळ्यांपुढे चित्र उभे राहते; नितळ निळे आभाळ, हिरवी वनराई, 'आसमंतावर रांगणारी पक्वपणाची पिवळी छाया', आणि मध्ये मुक्त भरारी घेऊन धुन्दपणे तरंगत राहिलेले एक गोजिरवाणे पाखरू! कोणाचे हे वर्णन? बालविहगाचे? सृष्टिदेवीच्या तान्ह्या बाळाचे? की स्वतःच आनन्दाचा मूर्तिमन्त नाचरा उद्रेक असलेल्या बालकवींचे? त्यांच्याच तरळ मनाचे? होय! बालकवींचे मनही असेच होते. आत्मरंगी रंगलेल्या मनाला झुलवणाऱ्या बालविहगासारखे, गोड निळ्या वातावरणात अव्याज मनाने डुलणाऱ्या फुलराणीसारखे, पाचूची हिरवी राने आपल्या झुळझुळत्या गीताने झुलवणाऱ्या निर्झरासारखे! सौंदर्यग्रहणाची अत्यंत कोमल आणि तरळ शक्ती आपल्याबरोबरच घेऊन आलेल्या या मनाची ओढ होती...

"सुन्दरतेच्या सुमनावरचें दंव चुंबुनि घ्यावें
चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हांत हिंडावें
प्रीतिसारिका गीत तियेचें ऐकावें कानीं
बनवावें मग धुंद रंगुनी काव्यसुधा पानीं."

"... दूरदूरचे सुन्दर हिरवे डोंगर" बोलवीत होते. तिथे बागडणाऱ्या हरिण-बालकांचे कातर आतुर डोळे दिसत होते....ते सारे बघणारे, हे 'नवे माणूस' ही जणू त्यांच्यातच मिसळून जाऊ पहात होते...पण जीविताची ही मधुर आकांक्षा अंतर्मनात तरळत असतानाच अंधाराचे पाश त्या मनाभोवती आवळू लागले— संध्येच्या सुंदर छाया काळवंडू लागल्या, जगाची अपूर्णता बायाळ करू लागली, ज्ञात–अज्ञाताच्या फेऱ्यात मन भिरभिरू लागले. देहाची गाठ काचू लागली. जीवाचेच कोडे पडले! आणि अन्धाराचा पूर सभोती दाटून येऊ लागला...असे का झाले? कसे झाले? कसे होते आणि कसे झाले याचीच कहाणी या कवितेच्या ओळीओळीतून गुंफली आहे. ही अवघी कविता म्हणजेच बालकवींच्या संवेदनाशील

अंतरंगाचे भावचित्र; त्यांच्या जीविताचा चढता-उतरता आलेख; त्यांच्या नवथर स्वप्नांचे उजळते आणि काजळते विश्व; संवेदनेच्या डोळ्यांनी आणि हळुवार पावलांनीच या विश्वात वावरायला हवे. कारण निर्जीव—सजीवाच्या, जगण्या-मरण्याच्या, शैशव—यौवनाच्या नेहमीच्या स्थिर कक्षाच येथे पालटल्या आहेत. त्यांना नाचरे पाय फुटले आहेत. त्या परस्परात अशा आणि इतक्या मिसळून गेल्या आहेत की, प्रीती, निसर्ग, मृत्यू यांविषयीच्या रसिक मनाच्या दृढ संस्कारांनाही विस्मयाचे सुखद झोके पदोपदी बसावेत...या अंतरंगाकडे आणि भावविश्वाकडे नेणारी वाट जाते ती सृष्टीच्या मांडवाखालून. या वाटेकडे वळण्यापूर्वी बाल-कवींच्या जीविताची रूपरेषा मात्र आपल्या दृष्टीपुढे असावयास हवी.

"एक लहानसे पान घेतले तर त्याच्यावर वाऱ्याच्या अनंत लहरी, सूर्याचे अनंत किरण, बाष्पाच्या अनंत कणिका, बीजाने त्या अंगी दिलेली बाह्य-पदार्थ-संग्रहणाची शक्ती, वृक्षावर झालेले परिणाम, फांदीला लागलेले आघात, इत्यादी इत्यादी अनंत संस्कार झालेले आहेत. हाच किंवा याहीपेक्षा गहन विचार केला तर आपणास मनुष्यत्व – व्यक्तित्वाची कल्पना होणार आहे."

बालकवींच्याच एका अपूर्ण[1] पत्रातील हे उद्गार! या अल्पायुषी कवीच्या जीवनाचा पट डोळ्यांपुढे उलगडत असताना त्यांच्याच ह्या उद्गारांचे स्मरण झाल्यावाचून रहात नाही.

'कवि तो होता कसा आननीं' या प्राथमिक कुतूहलापेक्षाही 'कवि तो होता कसा जीवनीं' ही जिज्ञासा त्याच्या वाचकांमध्ये अधिक उत्कट स्वरूपाची असते. बालकवींचे जीवन कसे होते? निर्झराची मुक्त क्रीडा आणि बालविहगाचे आभाळातील स्वैर नर्तन पाहून ज्याच्या व्यथित अंतःकरणातून उत्स्फूर्त उद्गार निघाले, "तें जीवित न मिळे मातें, मग कुठुनी असलीं गीतें'...त्याला प्रत्यक्षात लाभले ते जीवन कसे होते? स्थूल मानाने पाहिले तर प्रापंचिक जबाब-दारीतून माथे वर काढण्यासाठी धडपडणाऱ्या त्या काळातील कुणाही मध्यम-वर्गीय व्यक्तीपेक्षा हे लौकिक आयुष्य फारसे वेगळे नव्हते. त्यात सुदैवाचा काही भाग्ययोग होता, तसाच प्रतिकूल परिस्थितीचा ताण होता, आणि नियतीचे

---

१. बालकवी : कृ. बा. मराठे, पृ. १.

आघातही होते. हे सारे अनुभवणारे, भोगणारे मनच अशा तरळ मनोवृत्तीचे, निखळ बालवृत्तीचे आणि संवेदनशील होते की साऱ्याच भल्याबुऱ्या अनुभूती तेथे अधिकाधिक उत्कट आणि तीक्ष्ण होऊन आल्या. अत्यंत बालसुलभ आणि निरागस, लहरी आणि कलंदर- अशा या मूळ स्वभावाचा गुणधर्मच असा होता की जे जे घडले त्याहून ते वेगळे घडणे त्या काळात, त्या समाज-स्थितीत तरी अशक्यप्राय होते.

१३ ऑगस्ट १८९० रोजी खानदेशातील धरणगावी बालकवींचा जन्म झाला. आणि ५ मे १९१८ रोजी मनाच्या ताणलेल्या व्यग्र अवस्थेत आपली एकाकी वाट कापीत असताना ऐन तारुण्यात त्यांना अपघाती मृत्यू आला! अवघ्या २८ वर्षांचे हे आयुष्य. बुद्धिमंतांच्या, प्रतिभावंतांच्या आणि कर्तृत्व-संपन्नांच्या त्या पिढीलाच जणू अल्पायुषित्वाचा शाप मिळाला होता. पण ही माणसे कधी लहान राहिलीच नाहीत. त्यांना फार लवकर मोठे व्हावे लागले. भक्ती, काव्य आणि रसिकता ही बालकवींच्या ठिकाणी आनुवंशिकच होती. शाळेच्या मर्यादित जगात जे मिळू शकले नाही असे किती तरी मौलिक शिक्षण त्यांना आपल्या घरीच मिळाले होते. घरचे वळण जुने, धार्मिक. आई–आजी-कडून रामायण–महाभारतातील कथांवरील जुनी गाणी, संत कवींचे अभंग, पदे, भूपाळ्या, स्तोत्रे कानांवर पडत; थोरली बहीण जिजी,– हिच्याशी भेंड्या खेळून संस्कृत, मराठी व हिंदीतील उत्तमोत्तम कवनाचा परिचय होई. बालकवींच्या कवितेची पूर्वतयारी अशा भाविक वातावरणात होत होती. जिजींनीच त्यांना कवितेची गोडी प्रथम लावली. आणि त्यांच्या पहिल्यावहिल्या रचनेचे अलोट कौतुकही त्यांनीच केले. बालकवींच्या घरी लहानपणी आलेल्या हस्तसामुद्रिक जाणणाऱ्या सरस्वती-नंदन नामक बुवांनी "बेटा बडा शायर होगा. कीर्तिमान होगा" हे भविष्य वर्तविले तेव्हा शायर म्हणजे गोड कविता करणारा शाहीर हा अर्थही जिजींनीच आपल्या लाडक्या भावाला सांगितला होता. बालकवींच्या अस्थिर, अतृप्त जीवनात या थोरल्या बहिणीचे स्थान अखेरपर्यंत अतिशय जिव्हाळ्याचे होते, मोलाचे होते.

खानदेशातील एरंडोल, शिरपूर, सावरी या गावी बालकवींचे मराठी व इंग्रजी शिक्षण सुरू झाले. तरी वडिलांचा भर मात्र संस्कृतच्याच अध्ययनावर

अधिक होता. जिर्जांपाशीच संस्कृतचे प्राथमिक पाठ घेऊन पुढे नाशिकचे दूधमांडेशास्त्री यांच्याजवळ कालिदास, भवभूती यांचे काव्यग्रंथ, आणि रामायण, महाभारत, शाङ्करभाष्य यांचे परिशीलन बालकवींनी केले. संस्कृतमधील बालकवींची गती किती असाधारण होती याच्या आठवणी त्यांचे विद्वान स्नेही आजही सांगतात. संस्कृतप्रमाणे मराठीचाही त्यांचा व्यासंग बालवयातच सुरू झाला होता. परशुरामतात्या गोडबोले यांच्या नवनीतामधील वामन, मोरोपंत त्यांनी मुखोद्गत केले; ज्ञानेश्वर–तुकाराम यांच्याप्रमाणेच रामजोशी, होनाजी बाळा व अमृतराय यांच्या काव्याचाही आस्वाद मनसोक्त घेतला. अर्वाचीन कवींपैकी केशवसुत, विनायक आणि दत्त त्यांच्या विशेष आवडीचे! गोविंदाग्रजांविषयी त्यांना उत्कट स्नेहभाव असे, आणि केशवसुतांविषयी अपार भक्तिभाव वाटे. संस्कृत व मराठीच्या या अशा चौफेर व दुहेरी व्यासंगामध्येच बालकवींच्या सहजसुन्दर व टवटवीत भाषेचे रहस्य शोधता येईल. संस्कृत व मराठीच्या तुलनेने इंग्रजीचा त्यांचा परिचय बहुधा मर्यादित असावा. आंग्ल कवींपैकी शेले आणि वर्डस्वर्थ यांचे वाचन त्यांनी रसिकतेने केले होते; आत्मीयतेने स्वतःच्या ठायी मुरविले होते.

बालवयातील बालकवींच्या निसर्गप्रेमाची, काव्यतंद्रीची आणि उत्कट मनोवृत्तीची चाहूल त्यांच्या जवळच्या मित्रांना वेळोवेळी लागत असे. "आमच्यासारख्या नीरस मित्रांबरोबर खेळत असतानासुद्धा मध्येच लहर येऊन ते आकाशाकडे, नदीकडे, देवळांकडे, किड्यांकडे अगर दीनदुबळ्यांकडे, सारखे टक लावून पहात बसत. अगर कित्येक वेळा मनाशीच काही तरी गुणगुणत असत." अशा आठवणी त्यांचे बालमित्र आजही सांगतात. बालकवींची पहिलीवहिली कविताही तेराव्या वर्षी एका फुलबागेत झाली. निसर्गप्रेमातूनच तिचा जन्म झाला यात नवल ते काय? त्यांच्या कवितेत पुढे अनेकदा आलेला कृष्णसखाही ह्याच कवितेत त्यांना प्रथम भेटला. बालकवींच्या नवतरुण वयातील दोन महत्त्वाच्या घटना म्हणजे, वनवासी या टोपण नावाने खानदेशात ऐतिहासिक व पौराणिक कथा-कीर्तने करीत हिंडणाऱ्या, स्वतः सुबोध व भावपूर्ण कविता करणाऱ्या एका भाविक सत्पुरुषाबरोबर त्यांनी केलेली भ्रमन्ती, आणि १९१० साली जळगाव येथील कविसंमेलनात त्यांचा झालेला अत्यंत उत्स्फूर्त सन्मान.

वनवासी बुवांबरोबरची बालकवींची ही भ्रमन्ती जरी अल्पकालीन ठरली तरी उत्तर भारतात हिंडत असताना सृष्टीचे जे भव्य–दिव्य दर्शन त्यांना घडले, जे अनेकविध अनुभव मिळाले त्यांनी त्यांची मनोभूमिका तयार होत गेली यात शंका नाही. ह्या भ्रमन्तीतच वनवासी बुवांचा अत्यंत आकस्मिक मृत्यू घडला, आणि या विपरित आघाताचा बालकवींच्या कोवळ्या मनावरील परिणाम ताजा असताना तत्पूर्वीच घडलेल्या पितृनिधनाच्या दुःखद प्रसंगालाही त्यांना तोंड द्यावे लागले. आईच्या आग्रहापुढे यानंतर लवकरच बालकवींचा विवाह झाला. खानदेशच्याच एका खेड्यात वाढलेली आपल्या माता-पित्यांची एकुलती-एक लाडकी मुलगी त्यांची बालपत्नी झाली. बालकवींचे चरित्रकार सांगतात की, कुणाही एका व्यक्तीचा दोष नसतानाही ह्या पति-पत्नीच्या संसारसतारीचे सूर मात्र जमले नाहीत—जुळले नाहीत. परिस्थितीने घातलेला अडसर हे त्याचे फार मोठे कारण असावे. हे कारण काहीसे दूर होऊन हा चिरवांछित संवाद मनोमन जुळण्याची शक्यता जेव्हा उद्भवली तेव्हाच बालकवींना काळाचे बोलावणे आले; - फार लवकर आले ! मात्र ते येण्यापूर्वीच किती तरी काळ त्यांना मरणाची स्वप्ने पडत, वेध लागत. वनवासी बुवांचा आणि पित्याचा कोवळ्या वयातच घडलेला आकस्मिक मृत्यू आणि स्वतःच्या अशक्त प्रकृतीसंबंधी वैद्याने केलेले क्षयरोगाचे निदान,–ही कदाचित मृत्यूच्या या विलक्षण ध्यासाची किंवा भीतीची तात्कालिक कारणे असतीलही, परंतु त्याचे बीज त्यांच्या अत्यंत तरल वृत्तीतच कुठे तरी दडलेले होते खास.

१९०३ मध्ये एका संध्याकाळी बागेचे वर्णन करणारी आपली पहिली कविता लिहिल्यानंतर बालकवींनी मेळ्यातील पदांची आणि इतर काही प्रासंगिक स्फुट कवितांची रचना केली. याच काळात केशवसुतांपासून अवतरलेले मराठी कवितेचे नवे रूप त्यांना प्रतीत होऊ लागले होते. आणि त्यांचा स्वाभाविक कलही या नवीन कवितेकडेच झुकू लागला होता. वनवासी कवींच्या संगतीचा परिणाम बालकवींच्या कवितेवर झालाच नाही असे नाही. झाला तो एवढाच की, अगदी नव्या धर्तीच्या त्यांच्या कवितेलासुद्धा बहुधा कथा-निरूपणाचे किंवा आख्यानाचे स्वरूप आलेले दिसते. संस्कृत आणि प्राचीन मराठीच्या त्यांच्या विशेष अध्ययनाच्या, किंवा वाई येथील राममंदिरात रामायणावर त्यांनी केलेल्या अत्यंत

रसाळ प्रवचनांचा परिणामही कदाचित यामागे असावा. त्यांनी रामायणावर जशी प्रवचने केली तशीच बालरामायणाची रचनाही केली.

खानदेशातील प्रसिद्ध कवी विनायक यांना बालकवींच्या कवितेविषयी आरंभापासूनच वडिलकीचे कौतुक व ममत्व वाटत होते. "तो एक खाणीतील अनगड हिरा आहे" असे ते प्रेमाने म्हणत. बालकवींच्या अवघ्या जीवनावर परिणाम करणारी कविवर्य टिळकांची व त्यांची भेट विनायकांनीच प्रथम घडवून आणली. या पहिल्या भेटीतच टिळकांनी जळगावच्या कविसंमेलनाचे आमंत्रण बालकवींना दिले. बालकवींच्या जीवनातील हा एक सोन्याचा दिवस! एक अविस्मरणीय प्रसंग! १६-१७ वर्षांच्या ह्या कोवळ्या युवकाने आपल्या शीघ्रकवित्वाने व मधुर वाणीने संमेलनासाठी जमलेल्या रसिक श्रोतृवृंदाला त्या दिवशी चकित केले;– प्रसन्न केले! वि. मो. महाजनी, चंद्रशेखर, अनंततनय, माधवानुज, लंढे ही प्रथितयश कविमंडळी या कौतुकात व प्रशंसेत सहभागी होती. खानदेशाच्या एका खेड्यात वाढलेला हा नवयुवक, त्या दिवशी महाराष्ट्राचा लाडका बालकवी झाला.

ही घटना १९०७ च्या ऑक्टोबरमध्ये घडली. आणि बालकवी प्रपंचाचा अवजड गाडा ओढण्यासाठी पुन्हा घरी परतले; परन्तु याच प्रसंगी झालेला डॉक्टर कीर्तीकर या ज्येष्ठ, रसिक विद्वानाचा परिचय वृद्धिंगत होऊन बालकवींविषयीच्या आस्थेने त्यांची राहण्याची व्यवस्था अहमदनगरला टिळकांच्या घरी करण्यात आली. १९१० मध्ये बालकवी अहमदनगरला टिळकांच्या प्रेमळ, मनमोकळ्या कुटुंबात येऊन दाखल झाले, आणि जणू घरचेच झाले. टिळक कुटुंबातील त्यांच्या वास्तव्यासंबंधीच्या अनेक हृदयंगम आठवणी लक्ष्मीबाईंनी आपल्या स्मृतिचित्रांत सांगितल्या आहेत. बालकवींच्या निरागस खेळकर बालवृत्तीला या काळात जणू उल्हासाचे उधाण आले. या काव्यवेड्या प्रेमळ कुटुंबातील जिव्हाळ्याच्या वास्तव्याचे परिणाम संसारतापाने उबगलेल्या बालकवींच्या हळव्या कविमनावर अत्यंत उत्कट स्वरूपात झाले असल्यास नवल ते काय? अर्थात त्यांच्या अस्थिर, अतृप्त मनाची आन्दोलने नगरलाही सुरू होतीच; ती अनावर होऊन एक दिवस नगर सोडून ते पुण्याला आले. गोविंदाग्रज, त्र्यं. सी. कारखानीस यांनी केशवसुतांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुरू केलेल्या तुतारी मंडळाचे ते सदस्य झाले. याच काळात गोविंदाग्रजांचा व त्यांचा जिवाभावाचा स्नेह जडला. टिळकांच्या प्रेमळ आग्रहाने लवकरच पुन्हा नगरला परत गेल्यानंतर एक दिवस

टिळकांच्याच ईश्वरी परिज्ञान शाळेतील विद्यार्थ्यांपुढे प्रत्यक्ष टिळकांनाही मंत्रमुग्ध करून सोडणारे त्यांच्या " वनवासी फुला "वरील अत्यंत सुंदर भाष्यही बालकवींनी मोठ्या समरसतेने केले.

टिळक पतिपत्नींचे अति उत्कट वात्सल्य बालकवींना अखेरपर्यंत लाभले. पुढील काळात बहुतांशी पुणे व महाबळेश्वर येथील युरोपीय मंडळींना मराठी शिकविण्याचे काम ते करीत असत. निसर्गाशी जडलेली बालकवींची अकृत्रिम मैत्री तर या सर्वच काळात त्यांची सोबत करीत होती. एका पावसाळ्यात फर्ग्युसन कॉलेजकडे जात असताना लकडीपुलानजीक खवळून गर्जना करणाऱ्या नदीच्या पुराचे पाणी पाहून बालकवी किती धुंद झाले होते, देहाची शुद्धही कशी हरपली होती, आणि त्या पाणचक्राला आलिंगन देण्यासाठी त्यांचे मन कसे अनावर झाले होते– याची आठवण बालकवींचे स्नेही भास्करराव[1] उजगरे यांनी सांगितली आहे. आपले परम मित्र सोनाळकर यांना लिहिलेल्या पत्रातूनही बालकवींनी निसर्गाचे आपले वेड उत्कटपणे व्यक्त केले आहे. नगरला टिळक, पुण्यात गोविंदाग्रज, आणि जळगावात सोनाळकर हेच त्यांचे खरे सुहृद. या ज्येष्ठ व समवयस्क सुहृदांनी या लहरी व कलंदर बालकवीला सदैव सांभाळले– सावरले. विशेषतः वेळोवेळी उद्विग्न झालेल्या त्यांच्या मनाला उत्तेजित करण्याचे कार्य स्वतः कवी असलेल्या सोनाळकरांनी मनःपूर्वक केले.

युरोपीय मंडळींना मराठी शिकविण्याच्या योगाने महाबळेश्वरला सृष्टिसान्निध्यात घालविलेले निर्वेध दिवस हे त्यांच्या जीवनातील निर्भेळ आनंदाचे दिवस होत. एरवी प्रपंचाचा ताप त्यांना कधीच चुकला नाही. विशेषतः त्यांचे बन्धू अमृतराव ठोमरे आपल्या देशभक्तीत निमग्न असल्याने या " जातीच्या भ्रमरा "ला व्यवहाराचा ताण पेलावाच लागला. येथवर बालकवींच्या जीवनात धडपड, ताण असला तरी टिळकांसारख्या ज्येष्ठ सुहृदांनी त्यांची वाटचाल सुकर करण्याचे प्रयत्नही मनःपूर्वक केलेले दिसतात. मात्र जीवनाच्या या अखेरच्या वर्षात बालकवींनी केलेली एक जगावेगळी कृती कवितेविषयींच्या त्यांच्या निस्सीम भक्तीची मोठी हृदयस्पर्शी साक्ष देते. अर्थोत्पादनाचा ताण, व्यवहाराची घालमेल

---

१. बालकवी : कृ. बा. मराठे, पृ. ६३.

त्यांनी सोसली; परंतु मिळणाऱ्या पैशाची आणि स्वास्थ्याची ऊब आपल्या कवितेच्या आड येत आहे असे जेव्हा त्यांना वाटले तेव्हा निश्चयाने त्यांनी पुण्याचा आणि नोकरीचा निरोप घेतला. आपल्या कवितेखेरीज दुसरा कोणताही विचार त्यांच्या व्याकुळ मनाला या घटकेला शिवला नाही. खानदेशच्या खडतर आयुष्यात संकटांच्या सोबतीनेच आपली कविता वाढीला लागेल हा त्यांचा मनोमन विश्वास होता. केवळ कवितेसाठीच तो आयुष्यक्रम स्वीकारण्याची त्यांची तयारी होती. आपल्या ईप्सिताविषयी, जीवितकार्याविषयी त्यांच्या मनात यत्किंचितही सन्देह नव्हता.

"सृष्टीची सौन्दर्ये उकलून दाखविण्यासाठीच माझा जन्म आहे, तारकांचे संगीत मला नेहमी ऐकू येते, आकाशाची शोभा आणि जलाशयाची गति-स्थिती यातून मला सारखे संदेश येतात—" असे ते आपल्या मित्रांपाशी सांगत. ही केवळ भावड्या, भावविवश शब्दांची पखरण नव्हती. ते प्रचीतीचे बोलणे होते. दुर्दैवाने खानदेशी आल्यानन्तर त्यांची प्रकृती अधिकाधिक बिघडू लागली. केशवसुत, दत्त यांचा अकाली शेवट करणाऱ्या प्लेगलाही त्यांना तोंड द्यावे लागले. नेवळी, खेतिया, एरंडोल अशी त्यांची अत्यंत दीनवाणी भ्रमंती सुरू झाली......हाल–अपेष्टा सुरू होत्याच, परंतु कविता प्रसन्न होत नव्हती. अशा स्थितीत अहमदनगरला नोकरी वाट पहात असल्याचे पत्र आले. आणि रुजू होण्यासाठी त्यांनी पुन्हा खानदेशचा निरोप घेतला.– मात्र अल्पकाळासाठीच. आता दिवस थोडे राहिले होते... "कल्पतरूचीं फुलें, ताटवा वेचुन आणिन खाली। वाहिन मत्प्रिय वसुन्धरेला नित्याची लाखोली" असे सकौतुक प्रेमाचे उद्गार ज्या वसुन्धरेविषयी त्यांनी काढले होते, तिच्या कुशीमधील निवास आता संपत आला होता. अखेर विश्रान्तिस्थान होते ते खानदेशच्याच त्या मरुभूमीत. अहमदनगरला गेल्यानंतर दोनच महिन्यांनी जिजीच्या मुलीच्या लग्नासाठी ते उन्हाळ्याच्या सुट्टीत जळगावला आले;– या सुट्टीत जळगावच्या खेडुतांना ज्ञानेश्वर व तुकारामाचे अभंग ज्या अमृतवाणीने त्यांनी समजावून सांगितले त्याचे स्मरण आजही या जनपदांच्या मनातून गेलेले नाही. मरणाची स्वप्ने त्यांनी आयुष्यात अनेकदा पाहिली होती. जगाच्या पुष्पावर दाटलेले परोपरीचे गंध हुंगण्याचा ध्यास घेणारे हे नादी कविमन—

"स्वप्नींही स्वप्नं बघत। स्वप्नांतच व्हावा अन्त
मरण्याचें स्वप्नहि गोड। जगण्याचें स्वप्नहि गोड

भासाचीं सर्वेहि सुमनें । चला चला चुंबित वदनें
होइल मग सर्वचि गोड । मरण गोड– जगणें गोड "

—असे धुन्द उद्गार त्यानेच काढले होते. नियतीनेही ते ऐकले असावेत... मृत्यूपूर्वी ५–६ दिवसच आधी आपल्या देहाचे तुकडे तुकडे झालेले त्यांनी स्वप्नात पाहिले होते, अशी आठवण त्यांचे बंधू–मित्र सांगतात. ही हकीकत खरी असेल किंवा नसेलही; पण जगण्याचे सत्य अनुभवीत असतानाच बालकवींनी आयुष्यभर मरणाचे स्वप्नही पाहिले होते यात संदेह नाही.

सन १९१८ च्या मे ची ५ तारीख. बालकवी जिची आतुरतेने वाट पहात होते अशी एक जिवाभावाची वार्ता कळविणारी तार त्यांचे परममित्र अप्पा सोनाळकर यांच्याकडून आली होती. सोनाळकरांनी त्यांना तातडीने बोलाविले होते. बालकवींना जाणे भाग होते... त्यांना केवळ सोनाळकर बोलावीत नव्हते, आणखीही कोणी बोलावीत होते,– तातडीने बोलावीत होते. मे च्या त्या ५ तारखेस आपल्याच तंद्रीत स्टेशनची जवळची पायवाट ते चालत होते. मन भरलेले होते, अनावर झाले होते. वाटेत येणारे खाचखळगे, दगड, फिश्-प्लेट्स यांची त्यांना तमा नव्हती, जाणीवही नव्हती.– वेगाने चालून येणाऱ्या आगगाडीची तरी चाहूल आपल्याच तंद्रीत हरवलेल्या या मनाला कशी लागणार ? भादली स्टेशन-जवळ रूळ ओलांडताना तारेत जोडा अडकला...आणि वेगाने आलेली मालगाडी बालकवींच्या देहावरून गेली !– प्राणपाखरू क्षणभर फडफडले– आणि स्तब्ध झाले ! अवघ्या २८ वर्षांतच बालकवींच्या जीवनाची इतिश्री झाली...

'विसर मला, परि अमर्याद जग
राही नित्य जपून !'

असे टिळकांनीच बालकवींना एकदा वात्सल्यभरात सांगितले होते;– पण 'वाऱ्यावरचा हा चंचल तरंग', 'मायेचा हा हिरवा रावा' आपल्या चंचूची खूण मागे ठेवून उडून गेला तो गेलाच...

बालकवी म्हणजेच निसर्गकवी, आणि त्यांची कविता म्हणजे निसर्गकविता हे समीकरण रसिकमनांत फार पूर्वीच निर्माण झाले यात नवल ते काय ? पहाट फुटली की पक्ष्याच्या वाणीलाही किलबिल फुटावी तशी ही सहजमधुर कविता.

तिच्या शब्दा-शब्दातून डोकावून पहात होता तो निसर्गच; तिच्या ओळीओळीं-तून अधिकच सौंदर्यपूर्ण आणि चैतन्यमय होऊन विखुरली होती ती त्याचीच विलसिते. जणू चित्रलिपीतूनच अवतरल्यासारखी वाटावी अशी ही कविता... निसर्गाला तिच्या ठायी मिळालेले स्थान इतके सुस्पष्ट होते, सामान्य वाचकालाही अशा तत्परतेने जाणवणारे होते की, बालकवी म्हणजेच निसर्गकवी– अशी खूणगाठ त्याने आपल्या मनात आरंभीच पक्की बांधून टाकली; आणि फुल-राणीच्या, निर्झराच्या, संध्या-रजनीच्या कौतुकात तो मनोमन दंग झाला. बाल-कवींची निसर्गाशी झालेली तन्मयता आणि या कविमनाने निसर्गाचे परोपरीने केलेले मानवीकरण साध्यासुध्या रसिकालाही तत्काळ जाणवलेच. परन्तु त्यापलीकडे जाऊन या विलक्षण नाजुक नात्याचा अधिक खोल शोध घेणे त्या काळाला आणि त्या रसिकतेलाही शक्य झाले नाही. म्हणूनच बालकवी म्हणजे निसर्गकवी हे सीधे समीकरण जेव्हा प्रथम निर्माण झाले तेव्हा त्याचे स्वरूप काहीसे ढोबळ, स्थूल आणि एकमार्गीच राहिले. बालकवींच्या पूर्वकालीन किंवा समकालीन निसर्गकवितेपेक्षा त्यांची कविता मूलतः आणि स्वभावतःच कशी वेगळी होती, तिचे अंगभूत वैशिष्ट्य तिच्या ठायी किती स्वाभाविकतेने उमलले होते याची ओळखही साहजिकच तेव्हा पुरती पटू शकली नाही. कालान्तराने काव्या-स्वादाची आणि काव्यसमीक्षेची पाउले अधिक जाणीवपूर्वक पडू लागली,– अधिक मर्मग्राही रसिकतेने पडू लागली. त्यांचा रोख कविमनाकडे, त्यांच्या संवेदनाशील अंतरंगाकडे, विशिष्ट प्रकृतिधर्माकडे आणि अनुभूतीकडे वळू लागला; तेव्हाच बालकवी आणि निसर्ग या उभयतांमधील हे अपूर्व आणि असामान्य नाते रसिकाच्या चिंतनाचा विषय झाले, त्याला ओढ लावू लागले; काव्यविश्वातील बदलत्या वातावरणाच्या आणि बदलत्या मूल्यांच्याही पलीकडे जाऊन त्याला एक नवे आणि मनोज्ञ आव्हान देऊ लागले. खरोखर, सुजाण रसिकालाही आणि समानधर्मी प्रतिभावंतालाही अशी ओढ लागावी एवढे निखळ सामर्थ्य या सहज-सुन्दर आणि जातिवन्त कवितेत खासच होते.

वास्तविक बालकवींची निसर्गकविता ही बदलत्या आधुनिक दृष्टीतून निर्माण झालेली पहिलीवहिली निसर्गकविता नव्हती. १८८५ नंतर मराठी जीवनाच्या आणि साहित्याच्या अंगोपाङ्गात एक नवे प्रबळ स्थित्यंतर झाले. आधुनिकतेची, आत्मनिष्ठेची, सौंदर्यदृष्टीची आणि स्वातंत्र्याची एक नवी जाण साहित्याच्या शाखा-

शाखांतून डोकावू लागली. या स्थित्यंतराच्या अनुरोधाने पाहिले तर केशवसुतांचीच कविता नजरेत प्रथम भरते. आशय आणि आविष्कार या उभय अंगांनी संकेतांच्या आणि बंधनांच्या कोंडीत सापडलेल्या मराठी कवितेला केशवसुतांनी जी वेगळी दिशा दाखविली तिची एक वाट निसर्गकवितेचीच होती. १८८५ पूर्वीच्या आणि नजीकच्या काळातील पंडिती वळणाच्या कवितेत प्रदीर्घ, साङ्केतिक आणि कल्पनाप्रचुर वर्णनांच्या गर्दीत गुदमरलेला, केवळ पार्श्वभूमीदाखल आलेला निसर्ग त्यांनी पाहिला होता. अलंकारांच्या अतिरेकी भाऊगर्दीतील त्याचे गुदमरणेही त्यांनी अनुभवले होते. म्हणूनच निसर्गाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी परंपरागत आणि साङ्केतिक राहिली नाही. केशवसुतांच्या संवेदनाशील मनाची भूमी जात्याच नव्या संस्कारासाठी उत्सुक होती, सिद्ध होती. पाश्चात्यांकडून येणारे नवे वळण स्वतःच्या ठायी आत्मसात करण्यास, मुरविण्यास ते समर्थ होते. साहजिकच वर्डस्वर्थसारख्या निसर्गपूजक कवीचे जे उत्कट संस्कार त्यांच्या मनावर उमटले त्यांतूनच निसर्गाकडे पाहण्याची त्यांची वेगळी दृष्टी जन्माला आली. निसर्गालाही स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे, प्राणतत्त्व आहे, चैतन्यमय अस्तित्व आहे ही जाण केशवसुतांच्या कवितेपासूनच अर्वाचीन मराठी काव्यात प्रथम उद्भवली. मानवी जीवनाची अपूर्णता, असुंदरता आणि क्षणिकता तीव्रपणे जाणवल्याने निसर्ग मात्र तुलनेने अधिकाधिक स्वयंपूर्ण आहे, चिरतरुण आणि चिररुचिर आहे, मानवापेक्षा श्रेष्ठ आहे– हा विश्वासही पुढे ओघानेच आला.

त्यांच्या निसर्गकवितेचे तेच मध्यवर्ती सूत्र ठरले. रेंदाळकरांसारख्या त्यांच्या निस्सीम भक्तांच्या कवितेतही अधिक क्षीण स्वरूपात का होईना हाच सूर उमटला. परन्तु निसर्गाला सदैव दिव्य, परिपूर्ण आणि अलौकिक स्वरूपातच पाहिल्याने बोधाची, आदर्शाची, मार्गदर्शनाची आणि तत्त्वज्ञानाची दृष्टीही त्यापाठोपाठच आली. तिचा बांध या निसर्गकवितेभोवती नेहमीसाठीच पडला. पंचेन्द्रियांना भुलविणाऱ्या या रसरूपगंधमयी सृष्टीत मुक्त बेहोषीने स्वतःला उधळून देणारी, तिच्याशी एकरूप होणारी केशवसुतांची प्रकृती नव्हती. भावसंवेदनेच्या जोडीने तरलपणे अवतरणाऱ्या बहुरूपी कल्पकतेची आणि झुळझुळत्या झऱ्याच्या सहजतेने स्रवणाऱ्या शब्द-संगीताची जोडही त्यांच्या कवितेला लाभली नव्हती. किंबहुना भृंग, फूलपाखरू, पुष्प, अशा निसर्गरूपांकडे पाहता पाहता स्वतःच्या आणि मानवी जीवनाच्या अपूर्णतेची कवीची जाणीव इतकी बलवत्तर

होई की, दृष्टिसन्मुख असलेला निसर्गही बघता बघता मनाच्या पडद्याआड जाई. कवीच्या आत्मचिंतनाला आणि आत्मनिर्भर्त्सनेलाही चालना देणाऱ्या गतिवाहकाचे कर्तव्य करून जणू बाजूला होई. कवीच्या जीवनविषयक कल्पना, जीवनाविषयीचे तत्त्वज्ञान, सिंहावलोकन,– या सर्वांचे फलित व्यक्त करण्याचे एक माध्यम होई. केशवसुतांची कविता त्या पिढीतील बहुतेक सच्च्या कवींप्रमाणे बालकवींच्याही कवितेमागे मूलाधार होऊन उभी होतीच. अनेकविध मानवी भावना आणि अनुभवांचे संमिश्र लावण्य, आणि निसर्गातील व जीवनातील परोपरीचे सौन्दर्य यांना ज्या प्रामाणिक व तरल संवेदनेनिशी सामोरे जावयास हवे तिची वाण तत्पूर्वीच्या कवितेत प्रकर्षाने होती. 'मराठी[1] कवितेत गुदमरलेल्या या संवेदनाविश्वाची दारे' उघडणारे, निदान किलकिली करणारे पहिले हात केशवसुतांचेच होते.

केशवसुतांविषयीचा बालकवींचा नितान्त आदर लक्षात घेऊनही त्यांच्या निसर्गगीतांचे नाते केशवसुतांच्या निसर्गकवितेशी चपखलपणे जोडता येणार नाही. मग हे नाते रेव्हरंड टिळकांच्या कवितेशी जुळते काय? जीवनातील अत्यंत संस्कारशील अशा वयात अहमदनगरला टिळकांच्या घरी बालकवी त्या मोकळ्या प्रेमळ घरातीलच एक होऊन राहिले होते. काव्यप्रेमाने दरवळलेल्या त्या वातावरणात बलकवींच्या मूळच्याच कविवृत्तीच्या आणि कौटुंबिक उपाधींनी उदासलेल्या मनाच्या नाजुक पाकळ्या, 'संध्यावाताने फुलराणी' फुलावी तशा उमलल्या असतील खासच. अहमदनगरच्या त्या काळात बालकवींची कितीशी प्रसन्न कविता झाली याची काटेकोर मोजदाद करून हे परिणामाचे गणित मांडता येणार नाही. टिळक-दंपतीचे साहचर्य, त्यांचे निरतिशय प्रेम व कौतुक बालकवींना लाभले होते. टिळ-कांच्या कवितेवर विशेषतः 'वनवासी फुला'सारख्या त्यांच्या काव्यावर बाल-कवींची नितान्त भक्ती होती. टिळकांची ही प्रासादिक कविता गाढ सृष्टिप्रेमाने खरोखरच आकंठ भरलेली होती--भारलेली मात्र नव्हती. सृष्टीच्या निकट सान्निध्यातील त्यांचा सौम्य, सात्त्विक आनन्द आणि मानवी भावनांचा केलेला मंगल आविष्कार जसा या कवितांतून आढळतो तशीच त्यांच्या सश्रद्ध मनाची बोधवादी ध्येयदृष्टीही बहुतेक कवितांमधून व्यक्त होते. कुरूप मानवी जीवन

---

१. गंगाधर गाडगीळ; साहित्याचे मानदंड, पृ. ५४.

आणि सुन्दर निसर्ग यांतील तौलनिक विरोधाला प्राधान्य दिल्याने आणि जीवनाचे तत्त्वज्ञान व तात्त्विक दृष्टिकोण यांचे साहचर्य बहुधा लाभल्याने ही कविता तत्त्व-चिंतनाच्या व बोधपरतेच्या पातळीवर जाऊ नये तितकी जाते... तिची काव्यात्मता अपरिहार्यपणे उणावलेली दिसते.

केशवसुत आणि टिळक यांचे काही स्वाभाविक व रेंगाळते संस्कार बाल-कवींच्या निसर्गकवितेतून टिपता आले तरी तिची प्रकृती मूलतःच स्वतंत्र होती. तिचे व्यक्तिमत्त्व स्वयंभू होते. तिचे अंगभूत वैशिष्ट्य तिच्याठायी इतक्या अम्लान सहजतेने साकारले होते, कारण ते सर्वस्वी तिचेच होते. बालकवी हे निसर्गाचेच कवी. गाणाऱ्या पाखरासारखी त्यांच्या कंठातील उत्स्फूर्त लकेर नियतीने अकाली– फार अकाली कंठातच कोंडली; मात्र ती अखेरची थांबेपर्यन्त त्यांनी गाइली ती निसर्गाचीच गाणी, आणि सौन्दर्याच्या ओढीने मन्तरलेले आपले नेत्र अखेरचे मिटेपर्यंत त्यांनी पाहिले ते निसर्गालाच. निसर्गाविषयीची ही विलक्षण जवळीक आणि एकरूपता यांनी बालकवींची साथ आयुष्यभर केली. कारण ती वस्तुतः स्वतःचीच साथ होती;– स्वतःचीच संगत होती. बाल्य आणि यौवन यांच्या सीमेवर सदैव रेंगाळणाऱ्या त्यांच्या कविमनाची वाटचाल जसजशी उजळत किंवा काळवंडत गेली तसतसा या गीतांचा सूरही पालटत गेला. आपल्या स्वप्निल आणि निरागस बालवृत्तीच्या ऐन भरात, उमलत्या आकांक्षांनी आणि उसळत्या आनंदाने त्यांचे मन जेव्हा काठोकाठ भरून गेले, परिमळून गेले तेव्हा "आनंदी आनंद गडे" ही मधुर ललकारी चराचराला साक्षी ठेवूनच पुकारली गेली; फुलराणीच्या मिषानेही व्यक्त झाली, अनोख्या प्रेमभावनेचीच त्यांची ओढ. आणि अवखळ निर्झराच्या नर्तनामधून व्यक्त झाला त्यांना हव्याहव्याशा वाटणाऱ्या पण न लाभणाऱ्या जीवनाचा सोनेरी स्पर्श. निसर्गाच्या विविध रूपांना सदैव न्याहाळणारे आणि तसे करताना जणू स्वतःच्याच अंतरंगात डोकावून पाहणारे हे डोळे जेव्हा स्वच्छ निरभ्र होते तेव्हा त्या डोळ्यांत पडलेले निसर्गाचे प्रतिबिंबही तसेच स्वच्छ आणि सुंदर होते. तेव्हा डोळ्यांसमोर "हरित तृणाची मखमल" सर्वदूर पसरली होती. अर्ध्या मिटल्या, अर्ध्या उघड्या डोळ्यांनी दिशा कुणाची तरी वाट पहात होत्या, आणि पाचूच्या हिरव्या रानातून लाडका निर्झर नाचत बागडत येत होता...तेव्हा सोनेरी सूर्यकिरण, कौमुदी, संध्या,– सारीच एक आनंदाचेच गाणे गाऊन राहिली होती. पण हे प्रसन्न चित्र

असेच रहायचे नव्हते. कारण ते पाहणारे डोळेही तसेच निर्मळ, नितळ राहणार नव्हते. ते पालटले, त्यावर अभ्रे आली; आणि मग त्यांच्यात प्रतिबिंबित झालेले सृष्टीचे रूपही उजळ राहिले नाही; तेही झाकोळले, काळवंडले. अंतःकरणात साचत दाटत चाललेला अंधार सृष्टीतही आरपार भरू लागला. " खोल भूमिगर्तेत अंधाराचे ते विलक्षण खळाळणे " कानांना ऐकू येऊ लागले. दिसू लागली सुकलेली फुले...हृदयाची गुंतागुंत अनावर होऊ लागली. तिचा उमज पडेना. हृदयाच्या अंतरहृदयाला काय डाचत आहे, सलत आहे त्याचीही उकल होईना तेव्हाही या हृदयाने धाव घेतली होती ती निसर्गाकडेच;–आपल्या काळवंडलेल्या, बावरलेल्या मनाचे प्रतिबिंब पाहिले ते निसर्गाच्याच दर्पणात.

कवी आणि निसर्ग यांच्यातील हे जिवाभावाचे नाते कधी निर्माण झाले ? कसे निर्माण झाले ? या नात्याचे स्वरूप होते तरी कसे ! आणि या नात्यातील हा निसर्ग होता तरी कोणता ? निसर्गावर हा जीव कधी जडला याचे नेमके उत्तर कसे द्यावे ? प्रीतीसारखीच हीही प्रचीती कविमनाने जेव्हा प्रत्यक्ष अनुभवली, तेव्हाच ती मनात रुजलेली असावी. सृष्टीचे हे प्रेम तसे बालपणापासूनच होते. कवीची पहिलीवहिली कविताही त्याच वातावरणातून स्फुरलेली होती. उत्कटतेचा स्पर्श जेव्हा होईल तेव्हा सहज भावानेच बालकवींना निसर्गाकडेच वळावेसे वाटे. त्याच्याशीच खेळावेसे वाटे. पुढे जीवनाच्या अपूर्णतेची, व्यवहाराची, पार्थिवतेची झळ जेव्हा व्यथित करू लागली तेव्हा हा बालपणीचा सवंगडीच जिवाभावाचा सांगाती झाला...अपूर्णता भरून काढणारा, कविमनाचे रंग लेवून येणारा, त्याच्या भाववृत्तींची दखल घेणारा, त्याचेच पडसाद उठवणारा ! असा हा निसर्ग तरी कोणता ? सर्वांच्याच डोळ्यांपुढे असणारा आणि असूनही नसल्यासारखा होणारा नेहमीचाच खराखुरा निसर्ग हाच या कविमनाचा साथी होता काय ! नाही. हा नेहमीचा खराखुरा निसर्ग पाहताना या स्वप्नाळू कविमनाने आपल्या मनात त्याला एक वेगळेच रूप दिले, जणू वेगळा जन्म दिला. बालकवींचा निसर्ग-होय,– बालकवींचाच निसर्ग हा परोपरीने चैतन्यमय झालेला, निर्दोष सौंदर्याच्या सळसळत्या पातळीवर सदैव डोलत राहिलेला अभिनव निसर्ग होता. या निसर्गाचे रूप कसे होते, त्याचे पोत कसे होते !– ते होते पूर्वी काचेवर गडद रंगांनी चित्रे रंगवीत तसे. निसर्गरूपाची, निसर्गचित्राची प्रत्येक अंधुक, धूसर मिसळती रंगच्छटा येथे अधिक गडद झाली होती. जिवंत झाली होती. मानवी चैतन्याने

थरथरत होती.– जणू या कवितेतील आपले रूप पाहिले तर निसर्गानेही स्तिमित व्हावे आणि नवलाईने स्वतःशी म्हणावे, "खरेच, मी इतका सुंदर आहे !"

लहान मुलाला आवडत्या खेळण्याचे विलक्षण वेड असावे तसे बालकवींना निसर्गाचे होते. जुनेपाने खेळणेही शैशवाच्या कोवळ्या डोळ्यांना सुंदरच दिसते, आणि सुंदर खेळणे अधिकच निर्दोष होते. तशी किमया निसर्गाविषयी बालकवींच्या मनात आणि त्यांच्या कवितेत झाली होती. याचा अर्थ बालकवींचा हा निसर्ग केवळ काल्पनिक, खोटा, अवास्तव होता काय ? किंवा डोळ्यांसमोर काहीच साकार,– समूर्त होऊ नये अशा निर्जीव रंगरूपहीन निसर्गाचे ते चित्रण होते काय ? नाही. आपल्या कोंदट खोलीत स्वतःला कोंडून घेऊन बालकवींनी निसर्ग पाहिला नव्हता. त्याचे साक्षात दर्शन त्यांनी जवळून घेतले होते...डोळे भरून घेतले होते. श्रावणमास, निर्झर इत्यादी कवितांतून आणि पाचगणी, वाई, महाबळेश्वरच्या त्यांच्या रंगदार आठवणींतून याचीच साक्ष मिळते. उघड्या डोळ्यांनी पाहिलेला हा निसर्ग अर्थातच काल्पनिक अथवा अवास्तव नव्हता. केशवसुतांच्या निसर्गाप्रमाणे रंगरूपहीनही नव्हता. उलट प्रत्यक्षापेक्षाही आपली नादरूपगंधाची जादू या कविमनात तो अधिकच उधळून राहिला होता...चित्रांचा फुलोरा फुलवीत होता...कारण बोधाच्या किंवा मार्गदर्शनाच्या अपेक्षेने हे सौन्दर्यवेधी कविमन त्याच्याकडे वळले नव्हते खास. एका[1] अभ्यासकाने यथार्थपणे म्हटल्याप्रमाणे बालकवींच्या निसर्गकाव्यातील निसर्ग हा प्रति-निसर्ग होता. बालकवींची सौंदर्यरूपाची जाणीव स्वभावतःच इतकी तरळ व ताजी होती, स्वाभाविक होती की, जाणीव हा शब्दही येथे फसवा व उपरा वाटावा !

ती त्यांची जणू मूळ प्रवृत्ताच होती. म्हणूनच आपला अनुभव सदैव सौंदर्यस्वरूपात पाहणे त्यांना शक्य झाले. त्यांच्या संवेदनाची तीक्ष्णताही अशी असाधारण की, आपल्या इंद्रियाचे जणू कान करून निसर्गाचे नाद त्यांनी कानात भरून घेतले, आणि रंगरंग दृष्टीत साठवून घेतले. ज्याला त्यांनी असे मनोमन पाहिले तोच निसर्ग त्यांच्या कवितेत अवतरला. म्हणूनच या कवितेतील निसर्गाचे

---

१. म. सा. पत्रिका; नोव्हेंबर १९६२. बालकवि : द. भि. कुलकर्णी.

चित्रण यथातथ्य किंवा वास्तव वाटत नाही, कल्पनाप्रचुर वाटते, त्यांचा "अरुण" कोणत्या ऋतूत कोणत्या स्थळी त्यांनी पाहिला याचा बोध होत नाही असे असमाधान सृष्टिविषयक कवितांकडे एका विशिष्ट दृष्टिकोणातून पाहणाऱ्या टीका-कारांकडून व्यक्त झाले. त्यांचा 'अरुण' किंवा 'निर्झर' हा एखाद्या विशिष्ट बिंदूवरूनच (Point) पाहिलेला होता असे नाही. निसर्गाचे सारेच लाघव त्यांनी तन्मयतेने पाहिले. परंतु काव्यात प्रकटले ते हे प्रत्यक्षावलोकन नव्हे. त्यांच्या मनाच्या नितळ काचेवर जी चित्रे उमटली तीच काव्यात उतरली. यथातथ्य छायाचित्रणाच्या एकमार्गी दृष्टीने पाहिले तर त्यांच्या अशा चित्रणात अनेक वर्णनप्रमाद आणि कल्पनांच्या विसंगती आढळतील. परंतु या कवितेला सामोरी जाणारी वाट ही नव्हे याचा विसर पडता कामा नये. बालकवींनी आपल्या अंतरंगात, आपल्या अंतःपूर्ण कल्पना-विश्वात ज्या निसर्गाला प्रतिरूप दिले त्याच्याच दर्पणात त्यांनी आपल्या वांछिलेल्या भावविश्वाचेही दर्शन आयुष्यभर घेतले. त्यांच्या व्यक्ति-मत्त्वाच्या सहजप्रेरणेनेच हे घडत गेले, अर्थपूर्ण झाले. अनोख्या प्रेमभावनेविषयीची नवथर मनाची गोड हुरहूर, प्रतीक्षेची धुंदी, मीलनाची अधीरता, प्रणयाचे विभ्रम ही प्रेमानुभवाची विविध रूपे तर त्यांनी निसर्गाच्या लावण्यपूर्ण माध्यमातून अनुभवलीच...फुलराणी, संध्या-रजनी या कविता एका तरुण मनाने वांछिलेल्या प्रीतीचीच कथा सांगत नाहीत काय? 'सुन्दरतेच्या सुमनावरचे दंव' चुंबून घेण्याची आस मनोमन बाळगणारे हे कविमन—व्यवहारी लौकिक जगाचा वारा जेव्हा जेव्हा सोसवेनासा झाला तेव्हाही पूर्णतेची, पूर्णानंदाची स्वप्ने त्यांनी निसर्गातच पाहिली. बालविहग ही अप्रतिम कविता याचेच अत्यंत हृदयंगम दर्शन घडविते.

> "अन्धाराचे पाश मनाचे हे गळुनी जावे
> चित्त वाटतें तरळ तुझ्यापरि खग बाळा व्हावें"

या ओळी बालकवींचे निसर्गाशी कसे सायुज्य झाले होते, आणि मोकळ्या, रित्या जागा भरून काढाव्यात त्याप्रमाणे आपल्या भावविश्वातील अपूर्णता त्यांनी निसर्गाच्या त्यांना भावलेल्या पूर्णस्वरूपातून कशी भरून काढली होती, निदान तशी ती भरून काढण्याचा केवढा यत्न केला होता याचीच हृदयंगम साक्ष देतात. या दृष्टीने पाहिले तर बालकवीच निसर्गाशी एकरूप झाले होते असे नाही तर या-

पुढे जाऊन निसर्गालाच आपल्या अंतरंगात, आपल्या भावविश्वात सामावून घेण्याची आणि आपल्या स्वप्नांचे रंग चढवून त्याला आपलेसे करण्याची किमयाही त्यांनी केली होती. निसर्गाला पाहताना बालकवींनी, सर्वत्र सर्व काळी मानबालाच पाहिले होते असे म्हटले गेले ते यामुळेच. म्हणूनच बालकवींची निसर्गकविता हीच त्यांची भावकविता आहे, त्यांची प्रेमकविता आहे, तिने जागविलेले रसिकमनाचे स्पंदन आणि स्फुरण आजही तितकेच ताजे वाटते ते यामुळेच.

हा निसर्ग त्यांनी कसा पाहिला ? कसा ऐकला ? कसा टिपला ? बालकवींच्या कवितेतील हा सौन्दर्यशोध त्यांच्या संवेदनानिष्ठेच्या वाटेने घेणे म्हणजे ओसंडत्या सरी तापल्या गात्रांवर घेऊन पुन्हा टवटवीत होण्यासारखे आहे. मलूल, मरगळलेल्या संवेदनांना नवी लखलखती झिलई चढवून घेण्यासारखेही आहे. संवेदनेच्या मूलस्थानापासूनच अनुभवाचे प्रवाह वहात असतात. हा मूळचाच झरा जितका स्वच्छ तितके अनुभवही संपन्न होतात याची साक्ष ही कविता देते. आपल्या कल्पकतेच्या अद्भुत गुणधर्मामुळे बालकवींनी निसर्गाला सचेतन तर केलेच, जागेपणी स्वप्न पहावे किंवा स्वप्नातच स्वप्न पहावे तसे निसर्गाचे आपल्या मनातील रूपही साकार केले.— आणि हे घडावे किती सहजतेने !

“ ते डोंगर सुंदर दूरदूरचे बाई
पाहीन गडे त्या हिरव्या हिरव्या राई
त्या विमल जलासह वळणें वळणें घेत
हिंडेन झऱ्यांच्या शीतल कुंजवनांत
दरडीवर बसल्या चढून चिमण्या वेली
परि हाय फुलांची पांखर पायाखालीं
उचलून उराशीं धरीन चुंबुनि त्यांतें
गुंफीन तयांची माला मी निजहातें
तीं हरिणबालकें नयनीं पाहुनि मातें
म्हणतील आज हें नवेंच कोणी येथें

असे चित्र, चित्र टिपतानाच आपल्या संवेदनेच्या कोमल अग्राने त्यातील रंगही बालकवींनी वेचून टिपून घेतले. बालकवींचे रंगाचे वेड खरोखर

असाधारण. एक प्रकारे तेही त्यांच्या बालवृत्तीचेच द्योतक आहे. निर्मळ, शुद्ध, दृक्संवेदनेचा हा प्रत्यय खरोखर अत्यंत आल्हादक वाटतो. हरिततृणांची हिरवी मखमल, जांभळी वनमाला, पिवळी शेते, पाचूची हिरवी राने, फिकट निळीने रंगविलेला मेघांचा कापूस आणि त्यावरचे मोत्यांचे पाणी, कुसुंब्याचा गुल्जार हात, जळाची शुभ्र मोहनमाळ, रक्तवर्णी सोनेरी ढग, निळासावळा झरा– अशी किती उदाहरणे द्यावीत ? रंगांचे हे भांडार सृष्टीच्या माहेरघरचे तर खरेच, पण बालकवींच्या घरी ते आले तेव्हा हे मूळचे रंग अधिकच झळझळून उठले यात काय नवल ? ज्या रंगांनी त्यांचे मन, जीवन फुलायला, रंगायला हवे होते तेच रंग सृष्टीत टिपल्याने त्यांना हा आगळा तजेला मिळाला असेल काय ! रंगाप्रमाणेच नादांचेही आकर्षण बालकवींना उदंड होते. आणि जी सृष्टी त्यांना सामोरी येत होती ती तर संगीताने भरलेली होती...संगीतमय होती. तेथील वारा, विहग, निर्झर, प्रपात, नदी– ही सारी तर या संगीतात आपला सूर मिसळत होतीच, पण

"पिवळीं कुरणें या गाण्यानें
हर्षोत्कट झालीं
गाउं लागलीं नाचुं लागलीं
वेडावुन गेलीं"

इतकी ही संगीताची जादू प्रभावी आहे. "गीतमय स्थिरचर झाले, गीतमय ब्रह्माण्ड डुले" अशी ही संगीत समाधी. हे संगीत बालकवींना इतके वेडावून टाकत होते की, "शिकवी रे शिकवी मातें, दिव्य तुझीं असलीं गीतें" असे उद्गार त्यांना उत्स्फूर्तपणे काढावेसे वाटले. निसर्गाच्या या संगीताला त्यांच्या शब्दसंगीताची जोड मिळाल्यावर त्यांचे ऐश्वर्य अनन्त पटींनी वृद्धिंगत झाले. गन्ध, स्पर्श या संवेदनांचा प्रत्यय बालकवींच्या कवितेत कमी प्रमाणात जाणवत असला तरी जाणवतो तेव्हा मात्र तो प्रत्ययकारी वाटतो. हिरवे हिरवेगार गालिचे, लसलशीत हिरवळी, फुललेला सुवर्णचंपक, विपिनी दरवळलेला रम्य केवडा इत्यादी– 'परी मोहिनी विविधरूपिणी सृष्टीचा मी दास' हेच कवीचे उद्गार शेवटी आठवत राहतात.

लक्ष्मीबाई टिळकांनी आपल्या 'स्मृतिचित्रां'मध्ये बालकवींच्या आठवणी सांगताना एक सहजोद्गार काढला आहे. त्या म्हणतात, "ठोमरे बालकवी होता

पण कवीपेक्षा तो बाल अधिक होता. ” लक्ष्मीबाईच्या या उद्गारांत बालकवींच्या व्यक्तिमत्त्वाचे, त्यांच्या वृत्तीचे आणि त्यांच्या कवितेचेही मर्म साठविले आहे. त्यांच्या बालवृत्तीच्या किंबहुना बालिशतेच्याही अनेक लोभसवाण्या, गमतीदार खुणा याच साध्यासुध्या हृदयंगम आठवणींतून विखुरल्या आहेत. चटकन रागावणाऱ्या, चिडणाऱ्या, भलभलते समज करून घेऊन संतापणाऱ्या, आणि तितक्याच तत्परतेने ते आपल्या भाबड्या अश्रूंच्या पाण्याने किंवा मुक्त हास्याच्या सरीने धुवून काढणाऱ्या या नादिष्ट, उत्कट युवकाचे मन अत्यंत बालसुलभ होते यात शंकाच नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे हे स्वयंभू आणि स्वाभाविक लक्षण त्यांच्या कवितेत तर पदोपदी जाणवतेच. फुलराणी, निर्झर, अरुण यांसारख्या कवितांतून बालकवींनी शैशवाच्या डोळ्यांनीच अपार उत्साहाने सृष्टीकडे पाहिले आहे. आपल्या कोवळ्या स्वप्नाचे रंगरूप तिला बहाल करताना या बालवृत्तीच्या मोहक प्रतिमा त्या चित्रणात सहजपणे निर्माण झाल्या आहेत. किंबहुना या निखळ कवितेचे वैशिष्ट्य, तिचा गोडवा, तिचे लाघव हे सारेच फार मोठ्या प्रमाणात या वृत्तीतूनच जन्मले आहे. बालकवींच्या या बालवृत्तीचा विशेष विचार त्यांच्या काही रसिक अभ्यासकांनी केला असून काही वैशिष्ट्यांची नोंदही मार्मिकपणे केली आहे. कवीचा अनुभव घेण्यातील ताजेपणा, कविमनाचा लडिवाळपणा, भाववृत्तीचा सुकुमारपणा, भाषेचा लाडिकपणा, आणि विषण्ण अनुभवातही “ हृदयाची गुंतागुंत ” सोडविता न आल्याने, तिचा उमज न पडल्याने आलेला एक भाबडा हताशपणा—यात त्यांच्या बालवृत्तीचे गमक कोणी[१] पाहिले, तर कोणी[२] तिचा अन्वयार्थ अधिक पुढे जाऊन लावला. बाल्य आणि यौवन यांच्या सीमेवरील नवतीच्या प्रान्तात वावरणारे मन संस्कारक्षम आणि तरल असते, सुखाभासांनीही हुरळून जाते, व दुःखाभासांनीही कोळपून जाते. या मनाला शोकाच्याच स्वप्नात विहरण्यास मौज वाटते, आणि पृथ्वीचा स्वर्ग करण्याची हाव सुटते,— अशा या काळातील विविध मनोवृत्तीचे प्रतिबिंब बालकवींच्या काव्यात पहावयास मिळते असेही सांगितले गेले. बालकवींच्या मानसिक वयाचा हा मार्मिक विचार करताना कुमार-वय म्हणजेच अपरिपक्व वय हे

---

१. गंगाधर गाडगीळ; साहित्याचे मानदण्ड, पृ. ५६.

२. माधव जूलियन्; अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक, पृ. १८.

नकळताच गृहीत धरले गेले. आणि पुढे अपमृत्यू ओढवला नसता तर भविष्य-काळात जी निर्माण झाली असती त्या संभाव्य कवितेचे भविष्यही वर्तविले गेले. पौगंडावस्थेतील नवतीमध्येच वावरल्याने बालकवींच्या काव्याची कक्षा सीमित झाली, जीवनविमुख स्वप्नाळूपणा त्या काव्यात बळावला असे वाटून, " मानवी जीवनाचा अभ्यास कर " असे बालकवींना कोणी सांगावयास हवे होते; अशी प्रौढ सूचनाही या संदर्भात केली[1] गेली. तर कोणी[२] या वृत्तीचे मर्म स्पष्ट करताना असे सांगितले की आश्चर्यातिरेकाने, उत्कट आनंदाने व तन्मयतेने एखाद्या नवीन गोष्टीकडे पाहणाऱ्या लहान मुलाप्रमाणे बालकवी निसर्गाच्या विविध स्वरूपांकडे पहात होते; आत्यंतिक कुतूहल त्यांच्या ठायी शिगेला पोहोचले होते. त्यांची वृत्ती अखेरपर्यंत एखाद्या निरागस मुलाप्रमाणेच अल्लड राहिली आणि तीव्र संवेदनक्षमता, स्वाभाविक जिज्ञासा व भावोत्कटता ही त्यांची अंगभूत वैशिष्ट्ये ठरली. लहान मुलगी[३] आपल्या लहानशा बाहुलीबरोबर हसते, खेळते, बोलते, ती सजीवच आहे अशी कल्पना करून तिच्याशी वागते, तशाच वृत्तीने बालकवी निसर्गाबरोबर हसले, खेळले, बागडले, असाही एक सूर त्यांच्या-विषयीच्या विवेचनात ऐकू येतो. बालकवींच्या बालवृत्तीविषयीचे हे सारेच चिंतन महत्त्वाचे आणि मार्मिक तर खरेच, मात्र प्रत्यक्ष जीवनात प्रगट झालेली त्यांची बालिशता आणि काव्यात विखुरलेल्या तिच्या मनोज्ञ खुणा लक्षात घेऊनही या बालवृत्तीची पूर्ण उकल होईल का याची शंका वाटते. प्रा. द. भि. कुलकर्णी यांचा या संदर्भात आवर्जून उल्लेख करावयास हवा. बालकाचे मन आणि बालकवीं-सारख्या कलावंताचे मन, अनुभव घेण्याची, त्याला सौंदर्यनिर्मितीच्या पातळीवर नेण्याची आपल्याच संवेदनेत रमून, हरवून जाण्याची आणि त्यातील संगती शोधण्याची या उभयतांची शक्ती सारखीच मानावी काय ? त्यातील मूलभूत भेद या संदर्भात लक्षात घेणे अतिशय अगत्याचे आहे. या दृष्टीने पाहिले तर जाणवते की बालकवी आपल्या कवितेमधून आणि बहुधा जीवनामधूनही सदैव बाल्य आणि यौवन यांच्या सीमारेषेवरच वावरत होते. कधी येथे तर कधी तेथे झुकत

---

१. रा. श्री. जोग; अर्वाचीन मराठी काव्य, पृ. ९८.

२. डॉ. रा. शं. वाळिंबे; बालकवी, पृ. २१–२२.

३ अ. ना. देशपांडे; आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, पृ. ३९४.

होते; परंतु बहुधा मधल्या रेषेवरच स्वतःला हरवून बसत होते. बालकवींचे हे कलात्मक वय लक्षात घेतले म्हणजे त्यांच्या कवितेचे, सर्वस्वी तिचे असलेले वैशिष्ट्य आणि मंत्रमुग्ध करून टाकणारे सौंदर्य यांचाही उगम त्यातच सापडतो. पृष्ठभागावरचे उपरे अर्थ बाजूला सारून या बालवृत्तीचाही अधिक खोल अर्थ गवसल्यासारखा वाटतो.

या बालवृत्तीची लक्षणे त्यांच्या काव्यात किती परींनी दिसावीत! वास्तवापासून अलग होऊन जणू तुटून पडून आपल्याच विश्वात वावरणारी, अद्‌भुताकडे झुकणारी, स्वतःच्या ठायीच पूर्णत्व साधणारी अशी ही बालवृत्ती. कल्पनारम्यता हे तिचे पहिले लक्षण. त्यांच्या काव्यात्म जाणिवेचाही हा एक अविभाज्य भाग. फुलराणी, औदुम्बर, संध्यारजनी अशा कित्येक कवितांतून हे वैशिष्ट्य टिपता येते. बालकाचे सत्य जसे त्याच्या मनात अद्‌भुताच्या आणि वास्तवाच्या मिश्रणाने तयार होते, आणि वास्तवातील काटेकोर सत्याशी त्याचा अर्थाअर्थी फारसा संबंध पोहोचत नाही तसेच काहीसे बालकवींच्या काव्यात्म व्यक्तिमत्त्वाचे होते. स्वप्नाचा आणि स्वप्नाच्या प्रतीक कल्पनेचा त्यांनी आपल्या काव्यातून पुनः पुन्हा केलेला अवलंब, सत्य आणि स्वप्न यांच्या तेथे परस्परांत मिसळून पुसट झालेल्या सीमारेषा ही काय दर्शवितात? फार काय, निर्जीव, अचेतन गोष्टींचे मानवीकरण करून त्यांना आपल्या विश्वात सचेतन करण्याची बालकाची किमया बालकवींच्या कवितेत वेगळ्या स्वरूपात साकार झालेली दिसते. निर्जीव आणि सजीव यांतील भेदभाव बालकाच्या लेखी नसल्याने त्याला सारेच जिवन्त वाटते. आणि साहजिकच जिवन्तपणाचे सारे गुणधर्म तेथे ओघानेच येतात. बालकवींच्या काव्यात हीच प्रचीती येत नाहीं काय? त्यांच्या काव्यातील ' चराचर पाहिले तरी ते विलक्षण चैतन्याने सळसळणारे दिसते. पहा बरे– या विश्वात काहीच स्थिर नाही, निश्चल नाही. सारेच हसत, बागडत, नाचत, गरगरत आहे. आणि हे सारे नाचरे विश्व जेव्हा स्थिर होते तेव्हाही ते एकदम होते...चित्ररूपच धारण करते. या बालवृत्तीचे आणखी एक गमक म्हणजे अतिशय नितळ पारदर्शक स्वरूपात त्यांच्या काव्यात व्यक्त होणारे त्यांच्या भाववृत्तीचे आकस्मिक बदल. त्यांच्या अनुभूतीचा लंबक अधेमध्ये न थांबता एकदम टोकालाच जातो. धुंद आनंदाकडून थेट अमर्याद वैफल्यापर्यंत होणारा कविमनाचा हा प्रवास हेही त्यांच्या या विशिष्ट बालवृत्तीचेच काव्यात संक्रान्त झालेले रूप होय. किंबहुना बालकाला अनाकलनीय वाटणारे

गूढ दुःख, त्यातील अनाकलनीयतेमुळेच किती तरी तीव्रतर झालेले असते. बालकवींच्या व्यथागर्भ कवितेत हाच प्रत्यय येत नाही काय? खालच्या उजळ धरतीवर बघता बघता ढगाची सावली पडावी तसे दुःखाचे सावट त्यांच्या हृदयाच्या आन्तरहृदयावर पडते. या दुःखाची सारीच कारणे लौकिक जीवनातील तपशिलावर नेमके बोट ठेवून दाखविता येणार नाहीत; बऱ्याच वेळा ती दृश्ये प्रत्यक्ष व्यवहारी वास्तवाच्या पलीकडची असतात,— आणि म्हणूनच अधिक विलक्षण आणि जीवघेणी ठरतात.

> " सुन्दर सगळें मोहक सगळें
> खिन्नपणा परि मनिंचा न गळे
> नुसती हुरहुर होय जिवाला
> कां न कळे कांहीं "

हे स्वगतासारखे भावार्त उद्गार, आणि

> " कोठुनि येते मला कळेना
> उदासीनता ही हृदयाला...
> ...कुणीकडे हा झुकतो वारा
> हांका मारी जीव कुणाला "

हे व्याकुळ प्रश्न तरी काय सांगतात? यौवनाच्या सीमेवर रेंगाळणाऱ्या या बालवृत्तीमुळेच की काय, प्रीतीची, प्रणयाची, विभ्रमांची स्वप्नेही येथे येतात ती या बालवृत्तीच्याच आडोशाने...अशा अवखळ, निरागस, क्रीडासुलभ स्वरूपात, की हा " प्रणयाचा खेळही मग भातुकलीसारखा वाटू लागतो." सुख-दुःखांचे, आशा-निराशेचे, प्रीतीचे कोणतेही अनुभव या कवितेत व्यक्त होताना ते न कळता या बालवृत्तीच्याच रंगांत न्हाऊन निघतात, आणि परिणत प्रौढत्वापासून, वास्तवापासूनही दूर गेलेले एक कोवळे, गोजिरवाणे चटका लावणारे रूप त्यांना प्राप्त होते. बालकवींच्या कवितेचे आणि त्यांच्या काव्यात्म व्यक्तिमत्त्वाचे मर्म शोधताना बालवृत्तीचा हा गाभा नजरेआड करिता येणार नाही याचे आणखी एक प्रमुख कारण असे की, कवितेत संक्रान्त झालेल्या त्यांच्या अनुभवांची पातळीही सामान्य, प्रौढ, पक्व अनुभवापेक्षा वेगळी असते; नव्हे, अनुभव अर्थपूर्ण

होण्याच्या आधीचीच ती अवस्था असते. तिचे सरळसरळ नाते जडलेले असते, संवाद जुळलेला असतो तो जाणीवांशी. आणि या जाणीवांमध्ये अद्भुताप्रत गेलेल्या कल्पनारम्यतेचा मोठाच भाग असतो. अद्भुताच्या रसायनात त्या जणू चिंब भिजून येतात. आणि विचार, तर्कसंगती, स्मृती, इत्यादींचा स्पर्श न झाल्याने आपली निर्लेपता सहजपणे जपून ठेवतात, टिकवून धरतात. निरनिराळ्या संवेदना एकत्र येऊन त्यांची एक सुवर्णमूस तयार व्हावी तशा स्वरूपात या जाणिवा काव्यात येतात. बालकवींचा काव्यात्म अनुभव हा अशा रीतीने पूर्णपणे संवेदना-निष्ठ असतो. अनुभवाला अनुभवत्व येण्यापूर्वीच्याच अवस्थेत तो कविमनाला भावतो, कवितेत उतरतो, आणि मग असे एक आगळेच रसायन तयार होते,—जी सर्वस्वी बालकवींचीच वैशिष्ट्यपूर्ण निर्मिती असते.

बालकवींच्या या असामान्य अनुभव गाभ्याला जे शब्द गवसले तीच त्यांची कविता. हे शब्द या कवितेला ज्या सहजतेने लाभले ती सहजता मराठी कवितेत खरोखर अपूर्व होय. किंबहुना आविष्कारातील ही विलक्षण पूर्ण अखंड प्रयास-विरहित सहजता हीच या अम्लान कवितेची एक प्रमुख शक्ती होय; आणि जुन्या-नव्या कोणत्याही काळातील कवितेबद्दल कालान्तरानेही असे निखालसपणे म्हणता येणे ही गोष्ट निश्चितच वाटते तितकी साधी नाही. वास्तविक काव्यात्म आशय आणि त्याचे वाहन असलेले नित्याचे शब्द यांच्यातील संघर्ष फार पुरातन आहे. प्रत्येक कवीला केव्हा ना केव्हा त्याला तोंड द्यावेच लागते. दैनंदिन जीवनातील शब्दांभोवती अर्थाचे जे कडे पडते त्यामधून त्यांना परत काव्यात्म पातळीवर आणणे मोठे कठीण असते. भावना आणि संवेदना स्वभावतःच सूक्ष्म, संमिश्र व अनेक पदरी असतात. सरळ विधानांच्या चिमट्यात त्यांना पकडणे कठीण तर खरेच, पण झिजलेल्या नाण्याप्रमाणे गुळगुळीत झालेल्या शब्दांच्या—त्या, आणि त्याच शब्दांच्या माध्यमातूनच त्यांचा आविष्कार करण्याची कसरत ही कवीला करावयाची असते. शिवाय अनेकविध अनुभव एकत्रित चित्रित करण्यामधील भाषेची असमर्थता हा तर अभिव्यक्तीचा नेहमीचाच अडसर असतो. बालकवींच्या कवितेत, त्यांच्या भाषेत हे अडसर इतक्या सहजपणे दूर होतात की सहेतुकपणे पाहिल्याखेरीज त्याची जाणीवही सहसा होऊ नये. बालकवी हे किती प्रकारांनी आणि किती सहजगत्या साधतात! केवळ अनुरूप, नादमधुर शब्दांमुळे होणाऱ्या परिणामा-पेक्षाही येथे अधिक काही साधले जाते. स्पर्श, दर्शन, श्रवण इत्यादी अनु-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

भवांच्या संवेदना या त्यांना कारणीभूत होणाऱ्या वस्तूंच्याही आधी काव्यात आणल्या जातात. उदाहरणार्थ,

'हिरवे हिरवेगार गालिचे' हे 'हरित तृणा'च्याही आधी येतात तेव्हा हिरवळ पाहताना व तिचा स्पर्श अनुभवताना जे वाटावयाचे ते आधीच वाटलेले असते. 'आनन्दी आनन्द गडे, इकडे तिकडे चोहिकडे' या पालुपदाला ते अशी नादलय देतात की ज्यामुळे प्रत्यक्ष अनुभव घेण्याची क्रिया ही जणू अनुभवाच्या दर्शनातच अंतर्भूत होते, एकरूप होते. अधल्यामधल्या पायऱ्या ओलांडून हे सारेच जणू एकसमयावच्छेदेकरून प्रतीत होते. 'औदुंबर'सारख्या कवितेत ही प्रचीती घ्यावी. कधी अनुनासिक स्वरांच्या योग्य उपयोगातून गोडवा व नादलय आणून बालकवी अनेकविध घाट निर्माण करतात. आणि अत्यंत सहजतेने हे साधलेले पाहणे हा रसिकाला सदैव एक आल्हादकारी अनुभव वाटतो. प्रथम डोळ्यांत भरतात, कानांत साठतात ते त्यांचे शब्द. मूलभूत संवेदनांच्या अशा तीव्र तरल जाणिवेला शब्दांच्या सहजतेचे व अचूकतेचे असे वरदान क्वचितच कधी मिळाले असेल! या मंतरलेल्या भूमीत पाऊल टाकताना शब्दही जणू जुना अर्थ टाकून किंवा न्हाऊन माखून, घासून पुसून स्वच्छ होऊन आल्यासारखे वाटतात. जणू पहिल्या पावसात सुस्नात झालेल्या विविध सृष्टिरूपांसारखे! आणि या शब्दांचा ताजेपणा, कोवळेपणा आपल्या लेखी कधीच कोळपत नाही, कोमेजत नाही. वास्तविक हे शब्द असतात नेहमीचेच आणि साधेच. पहा बरे—

"निद्रिस्त भूमिला। स्वप्न जणों हें दिसलें
स्वप्नात लाडके, सुंदर डोळे भिजले"

शब्दांचा हा "लाडका" प्रयोग किती बोलका आहे; किंवा

"सौंदर्यभरी भरलेलें तारुण्य चढे रंगास
अलवार कोवळें अंग जशि काय फुलांची मूस"

किंवा

"निद्रिस्त नील वनमाला, निद्रिस्त सरोवर खालीं
वर मुक मोहने जैसें शशिकिरणें विरघळलेलीं

इवलाच अधर हलवून जल मन्द सोडिते श्वास
इवलाच वेल लववून ये नीज पुन्हा पवनास ”

खरोखर, असे वाटते की, आतल्याच प्रकाशाने उजळलेली असावी अशी काही भाषा बालकवींना सापडली आहे. आणि ती आहे आपली नित्याचीच भाषा. कधी साध्यासुध्या बोलीतून व्यक्त होणारी, कधी संस्कृतात सुस्नात होणारी, कधी या उभयांचा मेळ जमविणारी, तर कधी इतर कोणतीही क्षिती न बाळगता सहज-प्रेरणेने दोहोतील संवाद साधणारी. भाषेचे हे असे तऱ्हेदार रसायन निव्रिस्त मलूल शब्दांना नवी जाग आणते. मात्र, सौंदर्याची जाणीवही त्या भाषेला असत नाही. त्यासाठी विलक्षण साहाय्यक ठरते ते त्यांचे नादमाधुर्य. झुळझुळत्या झऱ्यासारखे हे शब्दसंगीत सहज असले तरी नादाच्या व ध्वनीच्या अर्थ-वाहकतेची पुरेपूर जाणीवही त्यात अंतर्भूत असते—

‘ तूं तर चाफेकळी ’ हे गहिरे नाट्यगीतच याचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

गर्दसभोंती रान साजणी
तूं तर चाफेकळी
काय हरवलें सांग शोधिसी
या यमुनेच्या जळीं ?
ती वनमाला म्हणे नृपाला
‘ हें तर माझें घर
पहात बसते मी तर येथें
जललहरी सुन्दर ’

तारकांचे गाणे, निर्झर, संध्यारजनी अशा कित्येक कवितांतून हीच साक्ष मिळते. जणू अति वापराने झिजलेल्या शब्दांचा मूळ अर्थच येथे प्रतीत होतो. या शब्दसंकेताला स्वाभाविक जोड मिळते ती लयीची. जी चित्ताला तंद्री आणते, भुरळ घालते, बहुधा अनुप्रासमूलक आणि ठसकेबाज शब्दांनी ही लय चांदण्या-सारखी सर्व कवितेभर पसरलेली असते. ‘ लाजलाजली ’, ‘ हिरवे हिरवे ’, ‘ डोलडोलली ’, अशा अभ्यस्त शब्दांनूनही हा परिणाम लीलेने साधतो. बाल-कवींच्या बालवृत्तीमुळे त्यांच्या शब्दयोजनेतही एक विलक्षण लाडिकता, लडिवाळ-

पणा आहे. हे लाडिक आर्जव कधी लडिवाळ पुनरुक्तीने, तर कधी ' रे ', ' ग ', ' गडे ', ' बाई ', ' लाडक्या ' अशा नाजुक व बोलक्या संबोधनांनीही कवितेत अवतरते. मात्र तिचे अधिष्ठान मूळ वृत्तीतच असल्याने केवळ वरवरचा उपरा परिणाम साधणाऱ्या चतुर लकबी कवी हाताळत आहे असे रसिकाला वाटतही नाही.

अगदी मोजक्या शब्दांतून नेमके अपरिहार्य तेवढेच संवेदना-घटक टिपून बालकवींनी आपल्या कवितेतून निर्माण केलेली शब्दचित्रे हेही तिचे एक मोठेच वैशिष्ट्य आहे. शब्दांतून प्रत्यक्ष चित्र निर्माण करण्याची, त्यात रंग भरण्याची, ही सहजशक्ती खरोखर असाधारण होय. भाषेची मुलायम कलाकुसर व जणू चित्रलिपीतून बोलत आहेत असे वाटावे. अशी कितीएक शब्दचित्रे औदुंबर, फुलराणी, निर्झर इत्यादी कवितांच्या ओळींओळींतून विखुरली आहेत. हे सारेच घडते ते अशा नितळ स्वाभाविकतेने, अशा नाजुक तरळपणाने की त्याचे विश्लेषण करणेही कठीण व्हावे. एका रसिक अभ्यासकाने यथार्थपणे म्हटल्याप्रमाणे[१] " रंग, नाद आणि रेखा यांची इतकी गोंडस संगती फुलविणारा कवी शतकात एखादाच निघावयाचा. "

बालकवींची प्रतिमासृष्टीही मोठी बहुरूपी, बहुरंगी आहे. स्पर्श-नाद-रूप-गंधाच्या सेन्द्रिय पातळीवर गतिमय व काव्यमय अशा चित्रांतून भावनेला व संवेदनेला ते काव्यात्म पातळीवर आणतात. जी सरळ विधानांनी सहसा साधू नये अशी भाववृत्ती या प्रतिमांतून निर्माण होते. ती कधी त्यांच्या बालवृत्तीचेच रंग व आकार धारण करते, तर कधी उमलत्या नवतीची चित्रे पहात बसते. तसे पाहिले तर फुलराणी ही सर्व कविताच एक प्रतिमा नव्हे काय ? निर्झर, संध्या-रजनी आणि इतर कित्येक कवितांतून त्यांच्या बालवृत्तीचे कोवळे पाणी ल्यालेल्या प्रतिमा चमचमताना दिसतात. त्यांच्या पहिल्यावहिल्या कवितेत डोकावलेला कृष्णसखा येथे अनेकदा डोकावतो.

' तो चंद्र नव्हे गडि कृष्ण खेळतो रास
मधु गोफ गुंफितो अधरिं धरुनि पाऱ्यास '

---

१. मं. वि. राजाध्यक्ष; पांच कवि, पृ १६५.

किंवा

'गोपि तुझ्या हिरव्या वेली
रास खेळती भंवताली'

या प्रसन्नतेबरोबरच कधी त्यांच्या बावरलेल्या, काळवंडलेल्या मनाच्या झळीने या प्रतिमा कातर आणि विलक्षणही होतात. भीषण वाटतात—

'जळ काळें काळें हसें भयानक दिसे
सहज बघशि तर दिसेल तुजला
तुझीच दुबळी भूल'

किंवा

'त्या खोल भूमिगर्तेत अंधार खळाळत होते'

किंवा

'रात्र किर्र ही तिडतिडताहे'

या ओळींतील ध्वन्यर्थक क्रियापदांतून भीषणतेची एक अबोध छटा व्यक्त झाली आहे; तर—

'सूर्य मध्याह्नीं नभीं उभा राहे
घार मंडल... भंवति घालताहे'

या बाह्यात्कारी साध्यासुध्या वाटणाऱ्या भव्य प्रतिमेची पुरती अर्थवाहकता शब्दात उतरविणेही कठीण वाटते.

बालकवींच्या भाषेचा व प्रतिमासृष्टीचा हा संक्षिप्त विचार येथवर केला. परंतु हे सारे ज्यांच्या आश्रयाने अवतरले आहे अशा इतर विषयांवरीलही अनेक कविता या काव्यसंभारात आढळतात.

यौवनाच्या ऐन भरात बालकवींच्या प्रतिभेला गंधाने दरवळणारा मोहोर आला. रसरसत्या चैतन्याने भरलेला हा तरू त्याने पानोपान भरून गेला. आणि तरीही प्रश्न पडतो की, या उण्यापुऱ्या दोनशे कवितांमधून त्यांची प्रेमकविता कोणती—

किती ? आश्चर्यकारक वाटले तरी या प्रश्नाचे खरे तर नकारार्थीच उत्तर द्यावे लागते. केशवसुती पद्धतीने प्रीतीचे तत्त्वज्ञान सांगणारी तुरळक कविता येथे आढळते. परंतु प्रीतीसाठी जीव कुर्बान करायला हवा अशी संथा देणारी कविता त्यांची प्रेमकविता मानावी काय ? प्रीतीच्या स्वप्नावरची कविताही येथे क्वचित दिसते, ' तूं तर चाफेकळी 'सारखे गहिरे नाट्यगीतही भेटते, आणि आल्हाद-कारी रुचिपालट देऊन जाते. परंतु तेही त्यांचे अंतरीचे बोल नव्हत. वास्तविक प्रेम हा शब्द त्यांच्या काव्यात विलक्षण वैपुल्याने आला आहे, सर्वत्र विखुरला आहे, नव्हे,–अक्षरशः उधळला आहे. गाणी प्रेमाची, फेर प्रेमाचा, संगम प्रेमाचा आणि निद्रा व समाधीही प्रेमाचीच.

' प्रेमावांचुन फेड कशानें प्रेमाची व्हावी '

किंवा

' या प्रेमाच्या लाटेखालीं मस्तक नमवावे
हे आम्हांला ब्रह्माण्डाला, देवाला ठावें '

किंवा

द्वैताला ठावच नाहीं प्रेम दिसे ज्या ज्या ठायीं
प्रेम बनुन जीवेंभावें प्रेमाला शोधित जावें '

या आणि अशा कितीएक ओळींमधून त्यांच्या अंतर्मनाने चालविलेला प्रेमाचा शोध, प्रीतीची ओढ किंबहुना प्रेमकल्पनेसंबंधीचेच त्यांचे प्रेम व्यक्त होते. आणि तरीही सच्च्या जिवंत प्रेमानुभवाची उत्कट आत्मनिष्ठ कविता या काव्यसंभारात सहसा आढळत नाही हेच खरे. व्यक्तिगत जीवनात याची करणमीमांसा न शोधता असे म्हणावेसे वाटते की वास्तवात न सापडलेले प्रीतीचे त्यांचे स्वप्नही निसर्ग-कवितेतूनच उमलले होते, उजळले होते. जे जसे हवे होते, जशा मुक्त, धुंद, सहज स्वरूपात हवे होते ते आणि तसेच त्यांनी निसर्गात पाहिले, व त्याच्या परोपरीच्या क्रीडेतच मनोमन अनुभवले. अल्लड फुलराणीला आलेली यौवनाची जाग आणि तिची कोवळी प्रेमभावना, सूर्य आणि पश्चिमा, रजनी आणि चंद्र यांचा प्रणय, तारकांच्या मुखांतून स्रवणारे प्रेमाचे गाणे, दिनरजनीच्या संगमातून उद्भवलेले मुक्त तान्हुले संध्यातारक, आपल्या विरही श्वासांनी भुवने आर्द्र करणारे फूल ही बालकवींच्या निसर्ग-कवितेतील सौंदर्यरूपे म्हणजे त्यांनी पाहिलेली प्रीतीची,

साफल्याची, तृप्तीची स्वप्नेच होत. त्या अर्थी बालकवींची निसर्गकविता हीच त्यांची प्रेमकविता होय हे चिंतन[1] यथार्थ ठरते. एरवी विशिष्ट व्यक्तीवर जडलेल्या प्रीतीचा जिव्हारी लागलेला घाव, त्यातील तलखली यांचा स्वतंत्र उद्गार गोविंदाग्रजांप्रमाणे जीववेण्या आर्ततेनिशी या कवितेत आढळत नाही हेच खरे. 'जादुगारीण'-सारख्या कवितेतही उत्कट भावनेपेक्षा त्यांच्या काळाने निर्माण केलेले संकेतच अधिक जाणवतात. प्रीतीच्या स्वप्नावरील त्यांच्या कवितेचा उगमही जी प्रेमकल्पना मनात बाळगली परंतु लाभली मात्र नाही– त्यातच आहे. निसर्गाला त्यांनी परोपरीच्या क्रीडांचे, विभ्रमांचे, प्रणयाचे, पूर्ततेचे सौंदर्य बहाल केले; निसर्ग अमूर्त-अचेतन असल्याने त्याने हरकत घेण्याचा प्रश्न नव्हताच. हाडामसांच्या व्यक्तीच्या ठायी प्रीतिस्वप्नांचे हे फलित पाहण्यासाठी वृत्तीची जी झेप आणि धैर्य असावे लागते तेही प्रत्यक्षात कदाचित त्यांना लाभले नसावे, कदाचित परिस्थितीची साथही मिळाली नसावी;—काहीही असो– बालकवींनी स्वतः तर सांगून ठेवलेच आहे—

'घे हातीं कर कौतुक याचें परि चित्तीं नच आणी
या गीतांनीं कळलें कविचें अंतःकरण निदानीं'

मात्र निसर्ग आणि कविमन यांतील रेषा हरवलेल्या या स्थितीत, अतृप्त, प्रेमार्त मनःस्थितीत जी जन्माला आली ती निसर्गाच्या विलसितातील प्रेमकविताही आपले अंतःकरण हालवून सोडते.

'हें बाल्य खेळतें येथें
तारुण्य हांसवी मातें'
'वद काळा मी यांत कुणाला सोडूं
शब्दही नको तो काढूं.'

अशा आन्दोलनात सदैव तरंगलेल्या या बालकवींची प्रेमकविताही अशीच असावी हेही स्वाभाविकच नव्हे काय ?

कविता ही कारागिरी किंवा कलाकुसर नसून स्वतंत्र अस्तित्व असलेली निर्मिती आहे ही जाण बुद्धिगम्य स्वरूपात का होईना केशवसुतांना प्रथम आली.

---

१. वा. ल. कुलकर्णी; सत्यकथा, एक टिपण.

अशा त्या काळात कवितेवर कविता होणे ही एक अपरिहार्य अवस्था होती. कवीने काव्यविषयक कविताही करावी हा जणू एक अलिखित पायंडाच या काळात पडल्यासारखा झाला. बालकवींच्या समग्र काव्यात काही स्वतंत्र काव्य-विषयक कविता, आणि त्याच्याशी निगडित असे अनेक कवितांमधून विखुरलेले उल्लेख आढळतात. अशा स्वरूपाची त्यांची कविता कदाचित सघन, विचारगर्भ व क्रान्तिकारक वाटली नाही तरी त्यातील प्रामाणिकता, उत्कटता व नाटकीपणाचा संपूर्ण अभाव यामुळे निराळीच ठरते. अतिशयोक्तिपूर्ण गौरवाचा किंवा ऊनोक्तीचा अवलंब न करता जे जाणवले तेच तिच्यात निर्मळपणे व्यक्त झालेले दिसते. आणि ही जाणीवही त्यांच्या सर्वत्र जाणीवांप्रमाणे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या मूळ गर्भापासून आली आहे असा प्रत्यय येतो. या कवितांमधून एखादी सुसूत्र काव्यविषयक भूमिका आढळेल असे नाही. काव्यातील स्थित्यंतराचे विशदीकरण आणि प्रतिपक्षाला दिलेले धारिष्ट्याचे आव्हानही येथे दिसणार नाही. दिसेल ते– कविता हे आपले पहिले प्रेम मानणाऱ्या कवीची उत्कट भावना आणि गाढ समज. निर्झराच्या गीताचे वर्णन करताना "व्यक्त तसें अव्यक्तहि तें तव गीतें डुलतें झुलतें" असे जे उत्स्फूर्त उद्गार त्यांनी काढले आहेत त्यामध्ये अव्यक्तही व्यक्त करण्याचा श्रेष्ठ कवितेचा असाधारण गुणधर्म सहजपणे सूचित झाला आहे. "पूर्ण करी जें जड जीवातें" ही कवितेबद्दलची त्यांची धारणा आहे. आणि

"दिव्य रसीं विरणें जीव
जीवित हें याचें नाव
तें जीवित न मिळे मातें
मग कुठुनी असलीं गीतें"

हा जीवित आणि काव्य यांच्या अकृत्रिम दृढ नात्याचा समजही त्यांच्या ठायी बाजूला आहे.

"वेडा झाला म्हणा हवें तर उठला जनतेंतुनी
कवी हा तन्मय निज गायनीं"

या धुंदीचा अनुभव तर ते आयुष्यभर घेतच होते. या नादी कवीची आस मात्र होती—

'फूलपांखरें परोपरी। निर्वेधपणें फुलांवरी
जशी स्वयें तरलित होती। मन्दतरल गंधावरती
तेंवि जगाच्या फुलावरी। गन्ध दाटले परोपरी
अनुभवुनी हर्षित व्हावें। सुखदु:खें चुंबित जावें'

जगाच्या उपेक्षेचे सोयरसुतकही त्याला नव्हते. कारण

'मी तूं पण तें क्षणीं विसरवितें,
लावि अखंड ध्यास जिवातें'

'हाच कवितेबद्दलचा त्यांचा विश्वास होता. केशवसुतांप्रमाणेच बालकवींनाही कवित्वाची सतत व रोगट जाणीव होई अशी टीका झालेली आढळते.[१] या कवितांमागील केशवसुतांचे संस्कार स्पष्टच आहेत. अन् तरीही तिच्यातून ऐकू येणारी गुंगलेली, हरवलेली, नादावलेली बालकवींची वाणी ही केवळ उसनी पोपटपंची होती असे मनातही येत नाही. त्यांनी जे अनुभवले त्याचे सूर त्या काळातील प्रथेप्रमाणे त्यांच्या काव्यातून उमटले एवढेच यासंबंधी म्हणता येईल.

बालकवींची कविता प्रामुख्याने १९१० ते १९१८ या काळातील. राजकीय प्रक्षोभ आणि सामाजिक जीवनातील विषमता यांनी हे वातावरण पेटलेले आणि पोखरलेलेही होते. केशवसुतांनी 'तुतारी', 'गोफण', 'नवा शिपाई', 'अस्पृश्याच्या मुलाचा पहिला प्रश्न' अशा समर्थ कविता लिहून सामाजिक समस्यांचा आविष्कार आत्मीयतेने केला होता. त्यांच्या काव्यगत व्यक्तित्वाचा विलक्षण परिणाम गोविंदाग्रज, बालकवी या जातिवंत कवींवरही झाला. त्यामधूनच 'तुतारी वाङ्मय'ही वाढू लागले. सामाजिक क्रान्तीचा आशय व्यक्त करणारी 'धर्मवीर' ही बालकवींची एकमेव कविता बरीच विवाद्य ठरली. 'तुतारी' वाङ्मयातील सर्वांत अयशस्वी कविता आणि केशवसुतांच्या तुतारीहूनही अधिक आवेशयुक्त कविता– अशा दोन अगदी परस्परविरोधी भूमिकांतून या कवितेला कधी धारेवर धरले गेले तर कधी उंचावले गेले. 'धर्मवीर'मधील आशयाच्या

१. ग. त्र्यं. माडखोलकर : आधुनिक कवि पंचक.

अनुरोधाने " आद्य ऋषी म्हणजे कोणते आणि त्यांनी प्रतिपादिलेला तेजाचा धर्म कोणता याची या लहानग्या कवीला तोंडओळख तरी होती का नाही " अशी शंका[1] या कवितेच्या कर्त्याविषयी घेतली गेली. वास्तविक बालकवींचे काव्य ज्या काळात निर्माण होत होते त्या काळाची, त्या काळाच्या गरजेची, आणि केशवसुती संस्कारांची एक क्रमप्राप्त व अपरिहार्य फलश्रुती म्हणजे धर्मवीर ही कविता. आपल्या मूळ काव्यपिंडाशी विसंवादी आणि विरोधी अशी निर्मिती सहेतुकपणे झाली म्हणजे ती कशी निःसत्त्व व निर्जीव ठरते, किंबहुना त्याच कर्त्याच्या सच्च्या निर्मितीशी या प्रयत्नसाध्य रचनेचे नातेच कसे जुळू शकत नाही याचीही खूण येथे पटते. बालकवींच्या अशा स्वरूपाच्या कवितेमागे केवळ कर्तव्यबुद्धीचाच भाग असेल असे नाही. त्यांचे भावनाप्रवण अंतःकरण त्या विशिष्ट परिस्थितीमुळे अस्वस्थ आणि व्यथित होणेही सहज शक्य आहे. किंबहुना अधिक स्वाभाविकही आहे. परंतु या स्वरूपाच्या त्यांच्या जाणिवेला किंवा चिंतनाला इतर कवितांसारखे सहज कलात्मक रूप लाभावे इतकी ती त्यांच्या कविप्रतिभेला पोषक नव्हती हाच निष्कर्ष काढावासा वाटतो.

बालकवींनी इतर कवितांप्रमाणेच काही बालगीतेही लिहिली आहेत,– अशा कामचलाऊ शब्दांत या कवितांचा नाममात्र उल्लेख केल्यास तो निश्चितच अपुरा ठरेल. कारण या मोजक्या बालगीतांनाही बालकवींच्याच कवितेत नव्हे तर मराठीतील बालगीतांच्या दालनातच एक स्वतंत्र स्थान आहे. आपल्या बालवृत्तीला ऐन तारुण्यातही जपणाऱ्या या बालकवीकडून काही अत्यंत अकृत्रिम बालगीते लिहिली जावीत हे स्वाभाविक तर खरेच. बालगीतांची ही प्रेरणा बालकवींना टिळकांकडूनच लाभली असावी. " बालबोध मेवा " या बालकांसाठी निघालेल्या मासिकाचे संपादन टिळक करीत असतानाच बालकवींची ही बालगीते लिहिली गेली. परंतु या तात्कालिक कारणापेक्षा टिळक, दत्त, आणि तांबे यांची सुंदर बालगीतेच त्यांना अधिक प्रेरक ठरली असावीत. बालकवींच्या या मोजक्याच बालगीतांना त्यांचे असे कोवळे, निरागस सौंदर्य आहे. त्यांच्या शब्दसंगीताची मूळचीच लय या गीतांनाही साहजिकच लाभली आहे. ही लय बालकांना निसर्गतःच किती प्रिय असते हे आपण प्रत्यही अनुभवतोच. आपल्या कवितेत

---

१. प्रस्तावना : बालकवींची कविता; संपादक गो. गो. अधिकारी, १९२५.

आशयाचे आणि आकाराचे विविध घाट सहजपणे निर्मिणाऱ्या बालकवींच्या बालगीतांत वैचित्र्यही आहे. कधी सहज नाट्यपूर्ण संवाद, कधी बोबडी भाषा, गेयता, अभिनयाचे जोपासलेले अंग, आणि बालकांच्याच मनात येतील असेच स्वाभाविक विषय यांनी ही बालगीते वैशिष्ट्यपूर्ण झाली आहेत.

बालकवींची काही अपूर्ण कथाकाव्येही त्यांच्या संग्रहात आढळतात. या अर्ध्यामुर्ध्या काव्यातही असे वेधक सौन्दर्य भरुन राहिले आहे की, ती अपुरी राहिल्याची खंत आजही वाटावी. त्यांच्या वाणीचे सहजमाधुर्य आणि चित्रित प्रसंगात रंग भरण्याची त्यांची कुशलता तर या अपुऱ्या काव्यातूनही दिसतेच. पण दुसरीही एक गोष्ट विशेषत्वाने जाणवते ती ही की, त्यांनाही निसर्गाची आकर्षक महिरप आहे. निसर्गाची अनेक सौंदर्यरुपे या कथाकाव्यांनाही बिलगून राहिली आहेत. त्या विविध रुपांत रमणीयतेप्रमाणेच कधी भीषणतेचाही प्रत्यय तीव्रपणे येतो. ‘ निःश्वास ’ या अपुऱ्या ऐतिहासिक काव्यातील या ओळी पहा—

काळोखाचें काळिज फुटलें
　　किर्रर रात्र अन्धारी बोले
कसला पर्वत कसलें रान
　　एक मात्र अन्धार भयाण

किंवा

भयाण दरडी घोर कऱ्हाडी
　　दाट अन्धारी झाडी
कृष्ण राक्षसी शिला पसरल्या
　　गर्द मातल्या गवतावरती

तर, “ मोहिनी ” या अपूर्ण काव्यातील कोणत्याही ओळी पाहिल्या तरी श्रुतिसुभगतेचे, चित्रमयतेचे, किंबहुना स्पर्श-रस-रुप-गंधादी संवेदनांचे सारेच ऐश्वर्य येथे झळाळून उठलेले दिसते.

‘ या शुभ्र विरल अभ्रांचें। शशिभंवती नर्तन चाले
गम्भीर धवळली रजनी। बेभान पवनही डोले

तन्द्रींतच अर्धीमुर्धी। लुकलुकते ताराराणी
ये झुंजुमुंजु तेजानें। पूर्वेवर पिवळें पाणी

दुःख असे की, गोविंदाग्रजांच्या दीर्घ काव्यांप्रमाणेच बालकवींची ही कथा-काव्येही अपुरीच राहिली.

बालकवींसारखा जातिवन्त आणि सहज-कवी केशवसुतांच्या पिढीत, अगदी समकाळातच जरी नाही तरी लगतच्याच काळात निर्माण व्हावा हा काळाचा केवळ एक अपवाद किंवा एक अर्थपूर्ण योग ऐवढेच मानता येईल काय? तसे मानणे हे कदाचित पूर्ण सत्य ठरणार नाही, न्यायाचेही होणार नाही. संकेतांच्या कोंडीत सापडलेल्या मराठी कवितेचा अवरुद्ध प्रवाह केशवसुतांनी पुढे नेला, त्याला मोकळी वाट दिली, हे मोकळे व खेळते वारे त्यांच्या समकालीनांच्या किंवा नजीकच्या पिढीतील कवींच्या सळसळत्या प्रकृतीला व जोमदार पिंडाला हितावह आणि स्फूर्तिप्रद ठरले यात शंकाच नाही. या कवींच्या ठायी असलेल्या स्वयंभू कवित्वालाही त्याने अधिकच मोकळी वाट दिली, हेच खरे. केशवसुतांची सची आणि प्रभावी कविता प्रत्यक्षाप्रत्यक्ष स्वरूपात त्यांच्या मागे मूलाधार होऊन उभी होती हे कसे नाकारावे? रेंदाळकर आणि विनायक यांच्या कवित्वाचा कस, त्यातील सखोलता आणि झेप ही गोविंदाग्रज आणि बालकवी यांच्या मानाने मर्यादित होती. केशवसुतांचे मोठेपण आणि चेलेपण त्यांनीही मनोमन मानले होते. केशवसुती काव्याच्या अंगभूत सामर्थ्यामुळे, त्यातील सामाजिक आशयाच्या जबरदस्त पकडीमुळे, आणि त्यांच्या तेजस्वी द्रष्टेपणाचे दर्शन घडल्यामुळे त्यांना गुरू मानणारे कवी निर्माण होणे स्वाभाविकच होते. परंतु केशवसुतांच्या खऱ्या श्रेष्ठत्वाचे आकलनही बहुतेकांना एका मर्यादेपर्यंतच होऊ शकले. कारण ती त्यांचीच मर्यादा होती. आकलन पुरते झाले असते तरीही स्वतःमध्ये ते मुरवणे, बिंबविणे बहुतेकांच्या कक्षेबाहेरचे होते. गोविंदाग्रज आणि बालकवी यांची अवस्था मात्र तशी निश्चितच नव्हती. केशवसुतांचा ठसा या जातिवन्त कवि-मनांवरही उत्कट स्वरूपात उमटला होता. केशवसुतांचे मोठेपण उभयतांनीही मनोमन मानलेले होते. ('केशवपुत्राचा महशूर, गोविंदाग्रज चेला सच्चा' हे गोविंदाग्रजाचे उद्गार स्पष्टार्थबोधक तर खरेच, पण "नवकवितेच्या जरिपटक्याचा तुलाच अधिकार" हे त्यांनीच बालकवींना उद्देशून काढलेले उद्गार

अधिकच बोलके वाटतात. ) मात्र, ज्या काळात अर्वाचीन कविता म्हणजे केशवसुतांचीच कविता असे समीकरण तयार होत होते त्याच काळात गोविंदाग्रज आणि बालकवी या उभयतांनीही आपल्या कविप्रकृतीचे स्वातंत्र्य आणि वैशिष्ट्य राखले होते. त्यांच्या अस्सल काव्यातून तेच फुलत राहिले होते. केशवसुती काव्यातून नव्याने आलेल्या सामाजिक आशयासारख्या किंवा चिन्तनशील गूढगुंजनासारख्या काही वैशिष्ट्यांमध्ये दोघांनी आपला सूर—क्वचित उसना सूरही कधी ना कधी मिसळला असला तरी त्यांचा मूळ पिंड या अनुकरणापेक्षा निश्चितच अधिक समर्थ होता. गोविंदाग्रजांपाशी कल्पकतेचे व शब्दसंपदेचे लखलखते वैभव तर होतेच, पण काव्यात्म आविष्काराची त्यांची जाण केशवसुतांहूनही अधिक तरल होती. मात्र बाह्याङ्गाने जेव्हा अन्तरंगावर कुरघोडी केली, तेव्हा त्यांच्या कविताही घसरल्या, उतरणीला लागल्या, लांबत गेल्या. स्वतंत्रपणे आकर्षक ठरणाऱ्या कल्पनांची माळ ओवत राहिल्या; ललितमधुर शब्दांचे मणी अल्लड पोरसवदा हट्टवादाने तळ-हातावर खेळवत राहिल्या ! बालकवींची केशवसुती धर्तीची सामाजिक कविताही कनिष्ठ प्रतीची वाटते; कारण ती पूर्णार्थाने त्यांची नाही. मातीतून अंकुर फुटावा तितक्या स्वाभाविकतेने ती त्यांच्या मनःपिंडातून आलेली नाही.

बालकवींच्या कविप्रकृतीची पृथगात्मता आणि काव्यात्मता खास त्यांचीच होती. आणि केशवसुतांच्या विचारशील काव्यपिंडापेक्षा ती मूलतःच भिन्न होती यात शंका नाही. या दोन श्रेष्ठ कवींच्या काव्यप्रकृतीतील हा भेद इतका मूलगामी स्वरूपाचा आहे की त्याविषयी कोणतीही अस्पष्टता उरू नये. मात्र महत्त्वाची गोष्ट अशी की, या उभयतांच्या, विशेषतः बालकवींच्या कवित्वाचे मर्म अजमावताना या वस्तुस्थितीचे कोणतेही विपरीत सावट रसिक-मनावर येऊ नये. संवेदनशीलतेचे, सौंदर्यनिष्ठेचे, आणि सहज कवित्वाचे ऐश्वर्य लाभलेल्या बालकवींसारख्या सच्च्या कविप्रकृतीला कोणत्याही समर्थनाची आवश्यकता का पडावी ?

या अनुकरणप्रधान वातावरणातही आपल्या भल्याबुऱ्या मूळ पिंडाशी, कवित्वाच्या गाभ्याशी आणि प्रेरणेशी अत्यंत दृढतेने आणि तितक्याच प्रयत्न

१. म. सा. पत्रिका, १९६२; नोव्हें. डिसेंबर; प्रा. द. भि. कुलकर्णी : बालकवि.

रहित सहजतेने चिकटून राहणारा कवी बालकवीच होय. म्हणूनच केशवसुत संप्रदायाच्या पूर्वसिद्ध व गृहीत पार्श्वभूमीवर या कलावन्ताचे नेटके चित्र रेखाटण्याचा प्रयत्न जितका अन्यायाचा आणि अपुरा तितकाच प्रमादजन्य ठरेल. बालकवींचा विचार निखालस स्वतंत्रपणेच व्हावयास हवा. केशवसुत आणि बालकवी या उभयतांमधील फरक म्हणजे त्यांच्या एका मार्मिक अभ्यासकाने[1] म्हटल्याप्रमाणे "कविप्रतिभेच्या दोन वृत्तींनील निसर्गसिद्ध भेद होय. केशवसुतांची कविता अधिक विचारशील आहे; बालकवींची मुख्यतः सौंदर्यरत आहे. तिची अशान्तीही नवतारुण्याच्या स्वप्नभंगातून उद्भवली आहे. केशवसुतांप्रमाणे विचारांचा पीळ तिला नाही." या कवितेला, तिच्यातील अनुभवविश्वालाही काही मर्यादा आहेत. अनुभव व आकार यांचे वाद नेहमीच साधलेले नाहीत. कदाचित एका विशिष्ट दृष्टिकोणातून पाहिले तर हे सारेच विडव अतिशय सीमितही वाटू शकेल. परंतु ते तसे नाही आणि ही पूर्वकल्पना मनात बाळगून स कवितेकडे वळल्यास तिचा गाभा आपल्या रसिकतेच्या पकडीतून निसटण्याचा वच अधिक आहे.

स्वतःच्याच आतील प्रकाशाने उजळलेले हे कविमन तो प्रकाश मालवल्यानेच कसे काळवंडत गेले याचीच कहाणी या कवितेत गुंफली गेली आहे, या दृष्टीने तिच्याकडे पहावे, तेव्हा तिची शक्तिस्थाने आणि तिच्या मर्यादाही समजतात. तिच्यात जे नाही त्याचा शोध घेण्यापेक्षा तिचे अंतरंग, प्रकृती आहे तशीच स्वीकारून तिच्या गुणविशेषांकडे अधिक तन्मयतेने वळावेसे वाटते. बालकवींनी मानवी भावनांची उपेक्षा केली किंवा मानवी जीवनाकडे पाठ फिरवली, या आक्षेपाला एवढेच उत्तर देता येईल की, जीवनाचे भरीव, सघन तत्त्वज्ञान आणि सखोल अनुभवजन्य चिंतन स्वतंत्रपणे, सलगपणे काव्यातून समर्थपणे व्यक्त करणारी विचारशील, गंभीर प्रतिभा केशवसुतांप्रमाणे त्यांची नव्हती. सुसूत्र विचारधारेला पेलणारे ते मनही नव्हते. मात्र निसर्गाच्या दर्पणात त्यांनी सदैव मानवी भावनांचे आणि जीवनाचेच दर्शन घेतले. निसर्गाशी त्यांचे जुळलेले हे मैत्र, ही जवळीक इतकी पूर्ण होती की त्या एकाच माध्यमातून त्यांना आपल्या अनुभूतीला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष किंवा हव्याहव्याशा वाटूनही न लाभलेल्या अनुभवाला

---

१. प्रा. मं. वि. राजाध्यक्ष; पाच कवि, पृ. १६५.

व्यक्तता देता आली हीच त्यांची मर्यादा मानावी काय ? तशी ती मानलीच तर त्यांच्या कवितेतील एकसुरीपणाच्या दोषालाही उत्तर सापडणार नाही. वास्तविक सृष्टीतील रंग, पोत, आकार, गंध यांमधील त्यांचा निरुपम, बालसुलभ आनंद किंवा शब्दांचे त्यांचे प्रेम या गोष्टी अधिक श्रेष्ठ कवीमध्येही दोषास्पद ठरल्या असत्या. येथे मात्र त्या स्वाभाविक वाटतात, घरच्यासारख्या वाटतात. बाल्य आणि यौवन यांच्या सीमेवर घुटमळणाऱ्या त्याच मनाने प्रीती, आनंद, निराशा, अपूर्णता, अतृप्ती, इत्यादी उत्कट मानवी भावनांचे लाघव किंवा तांडवही बहुतांशी निसर्गाच्याच स्वरूपात पाहिले,—यासाठी कवीलाच दोषी मानता येईल काय ? " सौंदर्यानें जोवन बाणे प्रेमजागृती हो मग त्यानें " असे त्यांनी स्वतःच सांगितलेले नव्हते काय ? असे म्हणतात की, कोणत्याही संवेदनाशील कवीच्या किंवा कलावंतांच्या संवेदनांचे काही विवक्षित प्रान्त असतात; तेथेच त्यांची जाणीव अधिकाधिक तीव्र, तरळ होते. आणि आविष्कारास सहजगत्या उत्सुक बनते. किंबहुना आविष्कार तेथे अपरिहार्यच होतो. बालकवींच्या मनात हा प्रान्त निसर्गाने व्यापिलेला होता. मानवी भावनांचे आविष्करण एकीकडे आणि निसर्गसौंदर्याचे आस्वादन दुसरीकडे,— अशी वर्गवारी करणे, असा दुजाभाव ठेवणे त्यांना स्वभावतःच शक्य नव्हते. तसा प्रयत्नही त्यांनी कधी केला नाही म्हणूनच ही कविता कल्पनारम्य होऊनही सच्ची कविता राहिली.

बालकवींनी निसर्गाची प्रसन्न आणि खेळकर बाजून पाहिली असे निष्कर्षही निरपवादपणे काढता येतील काय ? त्यांनी निर्झराचे, भ्रमराचे झुळझुळणे, गुणगुणणे तर ऐकलेच, कारण त्यांच्या लेखी तो केवळ झऱ्याचा मधुर आवाज नव्हता,- तर प्रवाही, गतिशील, मुक्त आणि प्रकाशित जोविताची हाक होती—जी त्यांना मनोमन ऐकावीशी वाटत होती,...ज्या हाकेच्या दिशेनेच त्यांना वाटचालही करावयाची होती, पण करता मात्र येत नव्हती. निसर्गाचे प्रसन्न रूप तर त्यांनी पाहिलेच, कारण तेव्हा त्यांचे मनही जीवनानन्दाने काठोकाठ भरून गेले होते. परन्तु निसर्गाच्या मुखश्रीची मनाला कातर, भयभीत व व्याकुळ करणारी दुसरी बाजूही – पहावत नसतानाही ओझरती का होईना त्यांनी पाहिली होती; त्याची वाणीही ऐकली होती. प्रकाशासारखाच त्यांनी अंधारही पाहिला होता, अनुभवला होता.

> ‘ रात्र काळी आकाश कृष्णवर्ण
> चन्द्र काळ्या मेघांत हो विलीन ’

हे दृश्यही त्यांनीच पाहिले होते.

> ‘ अन्धार दाटला अपार भरला पूर
> परि पार तयाच्या कोण मला नेणार ? ’

या प्रश्नानेही त्यांना व्याकुळ केले होते.

खेड्यातील रात्रीचे सारेच वातावरण भीषणतेची साक्ष देणारे आहे. ‘ पारवा ’, ‘ सुकलेले फूल ’ या कविता त्यांतील प्रतीकात्मता बाजूला ठेवली तरीही मनाला व्यथित केल्यावाचून राहात नाहीत. ते जीवनविन्मुख होते, किंवा मानवी भावनांचा काव्यात विचार करू शकले नाहीत– याची फोल चर्चा करण्यापेक्षा त्यांच्या उदासीनतेच्या गीतांकडे वळणेच अधिक श्रेयस्कर आहे. ‘ या गीतांकडे महाराष्ट्राचे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे ’ असे बजावून कवी माधव जूलियनांनी[1] प्रथम रसिकांचे लक्ष त्यांकडे वेधले. आज मात्र ही गीते उपेक्षित राहिलेली नाहीत. कवीचे अन्तरंग समजून घेण्यासाठी, फार काय, त्याच्या मर्यादा जाणण्यासाठीही या गीतांचे मोल आज मोठेच मानले जाते. ‘ भटकणे ’, ‘ उदासीनता ’, ‘ शून्य मनाचा घुमट ’, ‘ पारवा ’, ‘ पांखरास ’ अशा अनेक कवितांतून त्यांच्या मनाचे खोल असमाधान, अपूर्णतेचे शल्य, व्याकुळ हुरहूर, साचत आलेली निराशा आणि तिच्या पार जाण्याची असमर्थता हृदयभेदक जिव्हाळ्यानिशी व्यक्त झाली आहे. मात्र उदासपणाची विफलतेची जाणीव येथे येते तीही एकाएकी काळोखी दाटून यावी तशी. आरंभ झाला कसा, कोणत्या उमेदीत, कोणत्या उल्हासात, आनंदगीतात,– आणि अखेर वाट्याला आला हा दुस्तर व्यामोह, ही हृदयाची गुंतागुंत, हा शून्य मनाचा घुमट,– आणि त्यात भरून राहिलेला अंधार. हे असे का झाले ? प्रत्यक्ष लौकिक किंवा व्यक्तिगत जीवनातल्या असमाधानामध्येच या उदासीनतेचा उगम शोधता येईल का ? आर्थिक ओढगस्त, जबाबदारीचा अकाली पडलेला ताण, वैवाहिक जीवनात न लाभलेला

---

१. माधव त्र्यंबक पटवर्धन : अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक, पृ. २७.

संवाद- यांसारखी काही कारणे नेमकी बोट ठेवून दाखविता येतील का? आणि दाखविता आली तरी पुरतील का? तो आनंद जितका अकारण आणि अनामिक तितकेच हे दुःखही. मात्र या दोहोंना या कवितेत विलक्षण जिवंत रूप मिळाले. व्यवहाराचे धक्के आणि संसार-व्यथांचा शीण या नैराश्यामागे प्रत्यक्षाप्रत्यक्ष स्वरूपात होताच. त्यांचे निरभ्र मन गढूळणे आणि झाकोळून जाणे या विशिष्ट समाज परिस्थितीमुळे ओढवले असेलही,- किंबहुना ओढवले होतेही. परंतु बालकवींचे कल्पनाविश्व हे अंतःपूर्ण विश्व होते. तेथून प्रत्यक्षाकडे वळणे ही क्रिया नेहमीच स्वप्नातून जागे होण्यासारखी होती. बालकवींची विशिष्ट परिस्थिती त्या काळाच्या आणि समाज स्थितीच्या दृष्टीने पाहिल्यास मोठीशी लोकविलक्षण किंवा अपवादात्मक नव्हती. हा भोग असलाच तर तो अनेकांचा भोग होता. म्हणूनच या आर्ततेची उकल केवळ वैयक्तिक जीवनातील यशापयशाचे गणित मांडून करता येणार नाही. या मनाच्या, या व्यक्तिमत्त्वाच्या विशिष्ट प्रकृतीतच या जीवघेण्या अनुभवाचे बीज सापडू शकेल. येथे पुन्हा स्मरण होते ते त्यांच्या बालवृत्तीचेच. या बालवृत्तीमुळेच आनंद अनुभवला तेव्हा तोही जसा मुक्त, चराचरात भरून राहिलेल्या पूर्ण स्वरूपात तसाच अंधार दाटून आला तेव्हा तोही दुथडी भरून वाहणाऱ्या अपार पुराप्रमाणेच— मूळचेच उजळलेले हे मन करपले तेव्हा तो पालटही बालकाच्या किंवा पौगंडावस्थेतील युवकाच्या बदलत्या प्रतिक्रियेप्रमाणे अनावर स्वरूपातच झाला. वैयक्तिक जीवनातील प्रत्यक्ष स्वरूपाच्या मनोभंगांचे किंवा अपेक्षाभंगांचे कारण येथे होतेच. गोविंदाग्रजांप्रमाणे उत्कटतेची किंवा व्याकुलतेची प्रचीती बालकवी केवळ प्रेमानुभवांतून किंवा त्याच्या अभावातूनच घेत नव्हते. तिने त्यांचे अंतरंगच व्यापले होते. या उदासीनतेची पुरती उकल न झाल्याने बावरून- भांबावून जाणेच त्यांच्यापाशी उरले होते. येथे खोलवर तडा गेला होता तो सुंदरतेच्या, पूर्णतेच्या, अपार्थिवतेच्या आन्तरिक ध्यासाला. तो ध्यास आणि वास्तव जीवनाची रखरख यांचा मेळ जमू शकला नाही. त्यातील विसंवाद व विरोधाचा ताण पचवूनही त्यावर मात करण्याची शक्ती या अपक्व मनात नव्हती. फार काय, जे जे अस्वस्थ- बेचैन करीत होते त्याचा पुरता बोधही या मनाला होत नव्हता. तीही त्या मनाची मर्यादाच. हृदयाची गुंतागुंत होत होती, पण ते काचणारे धागे सोडवता मात्र येत नव्हते. अंधार दाटत होता, पण त्याच्या पार मात्र जाता येत नव्हते. आणि मग चित्ता-

एक विलक्षण अगतिकता ग्रासून टाकू लागली. आनंदाच्या भारानेही हे कविमन दुखत असे.

" दुःख बघुनि मग नवल न त्याचे तुकडे होतात. "

ही कबुली त्यांनी स्वतःच दिली होती. त्यांच्याच एका अभ्यासकाने[१] म्हटल्याप्रमाणे " भाववृत्तीच्या सुकुमारपणाला जाणिवेच्या कणखरपणाची जोड येथे मिळू शकली नाही. आपल्या मनात दाटत चाललेल्या अन्धारावर ज्ञानसंवेदनेची मशालही त्यांना पाजळून धरता आली नाही, किंवा त्या तिमिर प्रवाहात क्रियाशक्तीची नौकाही सोडता आली नाही." साहजिकच सभोतीच्या आवर्तात आपण खोल खोल बुडत चाललो आहोत या भयाने निर्वाणीची, त्राग्याची हाक उमटली,

" मज व्यर्थ नको तीं अमरपणाचीं गाणीं
कुणि उठवा असल्या गहनांतुनि हलवूनी "

आणि मग अनावर झाली ती या सर्वांच्या पलीकडे जाण्याची ओढ. ... ...

" काळाच्या आवर्तांत भोवंडुनि गिरकी घ्यावें
चांचपतां अंधारांत ठेचाळुनि विव्हळ व्हावें "

ही स्थिती अनुभवताच अशी एक सुन्न बधिरता मनाला आली की,

" दिन-पक्ष-मास-ऋतु-वर्ष भराभर गेले
हें रक्त जसेंच्या तसेंच सांकळलेलें "

हे विलक्षण उद्गार उमटले ! फुलराणीचे कोवळे गीत गाणाऱ्या सृष्टीच्या या गायकाचे, या बालविहगाचे हे विलक्षण उद्गार आजही मनाला व्याकुळ करतात. त्या बधिरतेतही एक हाक सारखी ऐकू येऊ लागली. हा कवी स्वच्छ, निरभ्र डोळ्यांनी जगाकडे पहात होता तोवर त्याची कविता वेगळी होती. कडांना अनुभवाची लालसर छटा आली तेव्हाच त्याच्या कवितेत हा पिळवटलेला सूर उमटला. मग हे डोळे स्वतःकडेच पाहू लागले;– त्यानंतर दैवानेच ते मिटले !

---

१. त्र्यं. वि. सरदेशमुख ; अंधारयात्रा, पृ. ३२–३३.

‘ काळ्या अंधारांत दडोनी
किंवा पडक्या बुरुजावरुनी
शब्द येतात चल नको बसूं जगतांत. ’

नियतीनेही हे शब्द ऐकले असावेत. या भिरभिरत्या पाखराच्या हृदयावर अखेर काळाची गोफण बसलीच !–आणि अंधाराचे पाश गळून गेले...हृदयाचे जळजळणे थांबले. उरला एक सुंदरतेचा,—अपार्थिवतेचा ध्यास... !

१ ऑगस्ट १९६८
पुणे

— अनुराधा पोतदार

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | कवि | १ |
| २. | कवीची इच्छा | २ |
| ३. | काव्याची कल्पना | ४ |
| ४. | कवीचें अंतरंग | ५ |
| ५. | कवीचा विचार | ६ |
| ६. | कवीची इच्छा | ७ |
| ७. | जिकडे तिकडे गाणेंच गाणें | ७ |
| ८. | गाण्याची चढली कमान- | ९ |
| ९. | माझें दिव्य | ९ |
| १०. | भ्रमर आणि कवि | १० |
| ११. | कवि-बाळें | १२ |
| १२. | आनंदी–आनंद | १५ |
| १३. | तृणपुष्प | १६ |
| १४. | संध्यातारक | १७ |
| १५. | निर्झरास | १९ |
| १६. | बालविहग | २२ |
| १७. | तारकांचें गाणें | २४ |
| १८. | फुलराणी | २६ |
| १९. | संध्यारजनी | २९ |
| २०. | फूलपांखरूं–फुलवेली | ३२ |
| २१. | शुक्रोदय | ३४ |
| २२. | अरुण | ३५ |
| २३. | हिरवाळ गडे ही हिरवी | ४० |
| २४. | | |
| २५. | श्रावणमास | ४१ |

२६. पाऊस ४३
२७. तडाग असतों तर— ४४
२८. गवताचें गाणें ४५
२९. मेघांचा कापूस ४६
३०. शारदीय सौंदर्यदेवता ४७
३१. औदुंबर ४८
३२. खेड्यांतील रात्र ४९
३३. अंगाई–गीते ४९
३४. रागोबा आला ५०
३५. बीज ५१
३६. चिमणीचा घरटा चोरिस गेला ५२
३७. संतांचा अनुवाद ५३
३८. धर्मवीर ५४
३९. जीर्ण दुर्ग ५९
४०. वैष्णव-धर्म ६०
४१. प्रीति हवी तर ६१
४२. प्रीति व कर्तव्य ६२
४३. प्रेमाचें अल्लडतेचें चित्र ६३
४४. दिव्य आणि प्रीति ६३
४५. प्रेमाचें गाणें ६५
४६. दोष व प्रीति ६६
४७. भटकणें ६६
४८. मोहिनी ६७
४९. निःश्वास (?) ६९
५०. ते डोंगर सुंदर दूरदूरचे बाई ७०
५१. तूं तर चाफेकळी ७०

| | | |
|---|---|---|
| ५२. | काय असे संसारांत ? | ७२ |
| ५३. | हे तासाचे तास– | ७३ |
| ५४. | माझें गाणें | ७४ |
| ५५. | अश्रुमाळ | ७५ |
| ५६. | काळाचे लेख | ७६ |
| ५७. | सौंदर्याचा अभ्यास कर ! | ७७ |
| ५८. | काल आणि जीवित | ७७ |
| ५९. | अनंत | ७८ |
| ६०. | ज्योत | ७९ |
| ६१. | आवाहन | ८१ |
| ६२. | दुबळें तारूं | ८२ |
| ६३. | यमाचे दूत | ८४ |
| ६४. | दोन फुलें | ८५ |
| ६५. | जिज्ञासु | ८७ |
| ६६. | तुझें न घडलें दर्शन अजुनी | ८७ |
| ६७. | तापल्या जिवाला कोण देइना ताप ? | ८८ |
| ६८. | निराशा | ८९ |
| ६९. | हृदयाची गुंतागुंत | ९० |
| ७०. | शून्य मनाचा घुमट | ९३ |
| ७१. | सुकलेलीं फुलें | ९४ |
| ७२. | पांखरास | ९६ |
| ७३. | उदासीनता | ९८ |
| ७४. | पारवा | ९९ |
| ७५. | मी | १०० |
| | टीपा | १०१ |
| | बालकवींविषयक साहित्याची-सूची | १२० |

## १. कवि

वेडा झाला, म्हणा हवें तर उठला जनतेंतुनी,
कवी हा तन्मय निजगायनीं;
सुखदुःखांच्या व्यामोहाच्या सुटला फेऱ्यांतुनी
नसे जग याच्या ध्यानींमनीं
स्वार्थ विसरला अविरत फिरतो गुंगत विजनीं, वनीं
म्हणुनिया निंदो याला कुणी.
परि जगीं मिळालें याचें याला पुरें,
वैभवें वाटती यास दुजीं पामरें,
मग करील कां हा स्पृहा तयांची बरें ?
एकच याचें यास पुरे, मग हसोत, हसतिल कुणी,
कवी हा, हा जगताचा धनी ॥ १ ॥

मदान्ध कमले ! जगीं कुणावर या पसरी मोहिनी,
न हा वश कविवर तुजलागुनी !
दंभा ! नीचा ! कळे न का तुज हा सत्याचा झरा,
सुखें जा नाच जगीं पामरा !
सैताना ! मत्सरा ! अरेरे ! जासी कोणाकडे ?
दिसेना कविवर का तुज पुढें ?
हा पवित्र पुरता ज्ञानसूर्य कीं अहा !
जा, तमा नीच, हा उदया आला पहा !
अविवेका घूका, दडुनि कुठेंही रहा.
हा प्रेमाचा धवलचंद्रमा भूवर ये उतरुनी;
कवी हा, हा जगताचा धनी ॥ २ ॥

स्वच्छंदी हा प्रभातवायू झोके घे अंबरीं,
लतांना पुष्पित करितो तरी;
चंद्र पहा हा गगनमंडलीं हसतो वेड्यापरी,
कर्षितो सागरलहरी तरी;
हो ! असाच समजा हा स्वच्छंदी कवी
हा जगास अपुल्या इच्छेसम वागवी,
हा भूस अर्पितो सदैव सुख मानवी,
खरा भिकारी, खराच वेडा, परंतु मोठा गुणी;
कवी हा, हा जगताचा धनी ॥ ३ ॥

◎ ◎ ◎

## २. कवीची इच्छा

तुला बघावें गुंगावें । गुंगतची चुंबुनि घ्यावें;
गुंगतची होउनि जावें । त्वदाधीन जीवेंभावें.
गुं गुं गुं गुं जोंवरती । जडतेची पडते माती,
तरलित हो हृदयज्योती । दिव्य सूर श्रवणीं येती.
मग त्यांचा धरुनी सोल[1] । एकेकच गुंफित बोल—
सौंदर्याचे, स्वप्नाचे । भासाचे, कल्पकतेचे-
अर्धस्फुट नयनांवरचे । निद्रेचे, जागेपणिंचे-
मुग्ध मधुर हास्यावरले । बिंदुकिरण कलिकेमधले,
हृदयतार हालविणारे । मनस्ताप मालविणारे,

---

१. झोल.

मनोवृत्ति कालविणारे । अंधकार घालविणारे,
दिव्य तरंगीं तरणारे । गोड गोड गुंफित सारे.
प्रतिभेच्या सौधावरुनी । मरुद्गणांवरती चढुनी,
अनंतांत गगनीं उडुनी । लीन बनुनि वातावरणीं,
होउनियां सौंदर्यधनी । गुंजावीं मंजुळ गाणीं,
ब्रह्माण्डाची सदाफुली । अक्षयतेमध्यें फुलली.
फुलें तिचीं बघतां नयनीं । वेड भरुनि अंतःकरणीं;
फूलपांखरें परोपरी । निर्वेधपणें फुलांवरी
जशीं स्वयें तरलित होतीं । मंद तरल गंधावरतीं;
तेंवि जगाच्या फुलावरी । गंध दाटले परोपरी,
अनुभवुनी हर्षित व्हावें । सुखदुःखें चुंबित गावें,
सुमकोषीं आपोआप । क्षण घ्यावी साखरझोंप
डोलतची जागें व्हावें । हांसतची गुंगत जावें,
सत्याचीं स्वप्नें व्हावीं । सत्याला स्वप्नें यावीं[1]
स्वप्नींही स्वप्नें बघत । स्वप्नांतच व्हावा अंत !
मरण्याचें स्वप्नहि गोड । जगण्याचें स्वप्नहि गोड !
येणेंपरि सर्वहि भास । अमृताचे व्हावे कोष.
काव्यपांखरूं हें मेलें । जन म्हणतिल पाहुनि सगळे
नवल परी यावर कांहीं । मृत्यूचें चिन्हहि नाहीं !
स्वर्गींचीं बहरून फुलें । सूर्यफुलें नक्षत्रफुलें
नंदनवन सुंदर वरतें । तें दिसलें नयनीं यातें;
मधुगीतें गंधर्वांचीं । नृत्यकला अप्सरसांची
देवांचीं 'राज्यें' बघुनी । हें भुललें गेलें उडुनी
अक्षय तेथें तरंगतें । तरल मनें डुलतें झुलतें.

---

१. सत्याचें स्वप्न पहावें । सत्यानें स्वप्नें घ्यावें.

काव्यपांखरूं स्वैरपणें । चुंबनगीतें अजुनि म्हणे;
नाहिं खरें जगतीं मरण । काव्यपांखरूं बघा खुण;
नसत्याची भीती धरुनी । असतें कां द्यावें त्यजुनी !
कां म्हणुनी वेडें व्हावें ? चुंबितची यासम जावें
भासाचीं सर्वेहि सुमनें । चला चला चुंबित वदनें,
होइल मग सर्वचि गोड । मरण गोड जगणें गोड
दु:खाश्रूंतिल ही गोडी । हास्याहुनि नाहीं थोडी.
दोघेही गोडच[1] भास । आवडती चुंबायास.
प्रेमानें भरलें गात्र । सांपडला चुंबनमंत्र !
चुंबितची आम्ही जाऊं । स्वैरपणें जगतीं राहूं.
प्रेतहि माझें पाहून । प्रेमानें गुंगत गान[2]
यापरि जग हर्षित व्हावें । हें इच्छीं जीवेंभावें !

◎ ◎ ◎

## ३. काव्याची कल्पना*

वस्तुवस्तुमधिं काव्य विलसतें;
श्रवणीं नयनीं हृदयीं उतरुनी
पूर्ण करी जें जड जीवातें.
बाह्यवेष जरि सुंदर धरितें,
मंजुगीत त्यामधुनी स्फुरतें;
दिव्य अहा मग तें अवतरतें.

---

१. नाही; २. प्रेमें मी गुंगे गानीं.

* ही कविता बाडात नाही पण बालकवींची आहे असे म्हणतात, म्हणून रचनेच्या दृष्टीने सदोष असताही छापिली आहे.

मी-तूंपण तें क्षणिं विसरवितें;
लावि अखंड ध्यास जिवातें.

◎ ◎ ◎

## ४. कवीचें अंतरंग

सख्या वाचका गीत कवीचें ऐकुनिया निज कानीं
न वदे, कळलें महाकवीचें अंतःकरण निदानीं.
हृन्मंजूषीं भाव गुप्त जे भरले, जनसम्मर्दीं
कथील का कधिं उच्चरवानें कवि हृदयाचा दर्दी ?
जा, जाउनिया अब्धिकिनारीं एक शुक्तिका घेईं,
रंग मनोहर दीप्तिहि अनुपम यावीण अन्य न कांहीं.
अगाधगहनें सागरलहरी झांकुनि ठेवति कांहीं;
गूढतळींचीं त्याविषयीं ती शब्दहि बोलत नाहीं[1]
[ त्या शुक्तीपरि हींहि गायनें विचारलहरीवरतीं
हृदंतरांतुन महाकवीच्या उसळुनि वरतीं येती.
घे हातीं, कर कौतुक यांचें परि चित्तीं ( नच ) आणी
या गीतांनीं कळलें कविचें अंतःकरण निदानीं ]

◎ ◎ ◎

---

१. अगाध गहनें सागर ठेवी झांकुनिया निजहृदयीं
खोल खोल त्याविषयीं कांहीं शब्दहि बोल्त नाहीं ।

श्री. निफाडकर व श्री. अधिकारी यांनी पायटीपेतील या दोन ओळींनी कवितेचा शेवट करून मूळ बाडातील शेवटच्या महत्त्वाच्या चार ओळी गाळल्या होत्या, त्या येथे कंसांत दिल्या आहेत.

# ५. कवीचा विचार

दिव्यकल्पनामय पक्षांहीं । दिव्य विचारा ! ये लवलाही;
स्वर्गीय तुझ्या आलापानें । गा कविहृदयीं मंजुळ गाणें,
देवदूत तूं स्वर्लोकींचा । तूंच गूढगूढांची वाचा;
परोक्षासही तूं सोपान । तूंच मर्त्य जगताचा प्राण.
विश्वात्मक देवाची वाणी । विश्वात्मक दिव्यांची खाणी;
विश्वात्मा[1] तूं येथें तेथें । प्रगटविसी या अज्ञेयातें.

* * * *

मायाजालीं परि अवघडला । आत्मराज तेजोमय पहिला;
एकसुराचें गीत तुझें तें । कळुनि येइना तेणें त्यातें.
रम्य उषेच्या पहिल्या किरणीं । कीं रजनीच्या गभीर गानीं
दिव्य दर्शनें मोहुनि जातें । परि न बघे मन तेथें तूतें,
सृष्टीचा मनिं भाव कळेना । तेजोमार्गीं चित्त वळेना,
म्हणुनि असें उद्विग्नपणें तें । हांक मारितें अखंड तूतें.

* * * *

वत्सल मातेच्या उच्छ्वासीं । सात्त्विक कान्तेच्या करपाशीं
लहानग्याच्या कीं मृदुहास्यीं । भूमितलीं या तूं वावरसी ?
[ जेथ मानवी ध्येय अहा तें । क्षण ( भर ) भूवर चमकुनि जातें
अक्षय्यपणें नांदायातें । राहतोसि तूं कीं वद तेथें. ]

◎ ◎ ◎

---

१. विश्वाला.

## ६. कवीची इच्छा

जगाचे बंध कोणाला—जगाला बांधला त्याला;
मला जो थांबवी ऐसा—जगीं निर्बंध ये कैसा ?
जगानें देह हा केला—जगाला वाहिलें त्याला;
ह्मण मारा खुडा तोडा—परी आतां मला सोडा.
न कीर्तीला, न प्रेमाला—न सौख्याला, विलासाला,
न विघ्नाला, न मृत्यूला—मला ये आडवायाला !
वृथा या वाहणें चिंता—वृथा अश्रू वृथा ममता;
वृथा निःश्वासमालाही—मला जी थांबवीना ही.
पुरे संबंध प्रेमाचा—नको हा खेळ प्रेमाचा
खरा जो प्रीतिचा प्याला—जगीं प्याला, सुखी झाला.

अपूर्ण

◎ ◎ ◎

## ७. जिकडे तिकडे गाणेंच गाणें !

हें जिकडे तिकडे गाणें, गाणें, गाणें !
ब्रह्मांड भारिलें न कळे या जादूनें.
वर गाणें कसलें ? कोण तिथें गाणार ?
हे रवी शशी तारका तसे ग्रहगोल,
ही सृष्टिसुदरी मजला गाया शिकवी;
हीं चराचराचीं निगूढ गीतें कांहीं.

हा वायू विखरी मधुर सूर गाण्याचे
.... .... ... .... ....
ये उघडुनि पडदा गाढ गाढ तिमिराचा
तो सूत्रधार रवि गात गात ये साचा.
मग सस्मित हर्षित होते । सृष्टि ही,
नव मौक्तिकसम ढाळीते । अश्रुही,
त्यासवेंच मंजुळ गीतें । गात ही.
मग हांसत हांसत नेत्रें उघडी कोण ?
ती कमलिनि गाई प्रेमाचें मधु गान. १

नभिं रम्य तारका खेळ कुणाशीं करिती ?
निज नाथासंगें विहरत हर्षें गाती.
तो चंद्र नव्हे, गडि कृष्ण खेळतो रास,
मधु गोफ गुंफितो अधरिं धरुनि पाव्यास,
त्या मंजुळ गानें किति तरि हर्षित झाल्या;
बघ वरी तारका, खालीं कुमुदिनि हसल्या
तो सागर गाई, गाई पर्वत गाणें,
तो निर्झर जाई गात गात डौलानें,
ते हिंस्र पशूही गाती । भेसुर,
हे विहंग सारे गाती । सुस्वर;
हीं मुलें फुलेंही गाती । सुस्वर;
मीं जिकडे जावें तिकडे गाणें, गाणें !
ब्रह्माण्ड भारिलें न कळे या जादूनें. २

( बालकवींची ही अप्रसिद्ध कविता संगमनेरचे कवी श्री. केशव ल. टेंभुर्णीकर यांच्या संग्रही होती; ती त्यांनी आम्हांला छापण्यासाठी दिली. —संपादक. )

## ८. गाण्याची चढली कमान—

गाण्याची चढली कमान, नयनीं स्वर्मार्ग झाला खुला;
व्योमीं तारकमालिकांसह कवि प्रेमें हसूं लागला.
त्याला हास्य परंतु दिव्य असलें आलें तरी कोठुनी ?
त्याचा उद्गम नाहिं काय तुझिया दिव्यौष्ठगंधांतुनी ?
प्रेमावांचुनि कोणता कवि पिसा गाईल गाणें तरी ?
गाणें प्रेमच, तें स्फुरेल तरि का निष्प्रेम चित्तावरी ?
प्रेमानें रसरंग जो उधळिला त्याच्या तरंगांवर
होवोनी रसवंत लुब्ध हृदयें बेहोष त्यानंतर.
स्वच्छंदें मग वाहतात जिकडे त्या त्या प्रदेशान्तरीं.
तारांच्या सुमवाटिका विलसती आकाशगंगेवरी
प्रीतीचा लडिवाळ बाळ चिमणा वक्षस्थलीं वाहिला;
तो प्रेमातुर ओष्ठचुंबनसुखा निःशंक नादावला.

अपूर्ण

◎ ◎ ◎

## ९. माझें दिव्य

बाह्य जगांतुनि दिव्य रसाचा पूरच हा लोटला,
हर्षविल अंतःसृष्टी मला.
अमृतरसाचा पाट नभांतुनि धावत हा पातला,
लोळवी परमानंदीं मला.

निर्झर की हा शान्तिसुखाचा मम हृदयीं झरतसे.
पुढें कीं नंदन हें मज दिसे.
हा प्रणयविकासी उज्ज्वलतेची खनी,
तारकापुंज कीं भरला माझ्या मनीं,
स्वर्गदीप्तिसह सखि कविता ये मग हृदयीं धांवुनी
कर मज गुंग सदा गायनीं.
सृष्टि हांसवी मला फुलांनीं, तारांनीं नभ तसें,
सदाचें मंगल मज देतसे.
जिकडे तिकडे दिव्य सांठलें, रत झालें गायनीं;
पहा या जनीं मनीं कीं वनीं.
त्यासह जी क्रीडा प्रेमच माझें खरें,
ही क्रीडा म्हणजे जीवित माझें बरें,
या दिव्यासह सखि कवितेशीं जिणें वेचिलें जरी
खरी मज माझी मुक्ती तरी.

◎ ◎ ◎

## १०. भ्रमर आणि कवि

सखया भ्रमरा सदैव होसी तूं कमलावरि गुंग,
कवितेचा मी दास, पदाशीं तिच्याच असतों दंग. १

चाखुनि घेसी पुष्पांमधला तूं मधुतर मकरंद;
काव्यरसास्वादाचा मजला तसाच भारी छंद. २

प्रेमभरानें तूं पुष्पांवर सदैव गासी गाणें;
आळवितों मी कवितादेवी मंजुल आलापानें. ३

बागडसी तूं स्वैर मजेनें नभांत गरके घेत;
बागडतों मी सुज्ञ जनांना हर्षभरीत करीत. ४

समशीलाचे आपण दोघे, ये, ये भ्रमरा आतां;
उडूं बागडूं, फिरूं मजेनें नुरे कशाची चिंता. ५

ये प्रिय सखया, वनलतिकांच्या झोपाळ्यांत बसून;
गाऊं सुंदर गीत आपुलें, होऊं त्यांत विलीन. ६

ये, ये कमलीं प्रेमबंधनें बांधुनि घेऊं काया;
आनंदाच्या सुधासमुद्रीं जाऊं स्नान कराया. ७

वनराजींतुनि कुंजांमधुनी वेणुध्वनी करून;
वात विहरतो; त्याचा जाऊं आपण पंथ धरून. ८

ये, ये स्वच्छंदानें मारूं नभांत उंच भराऱ्या;
गिरक्या घेऊं परमानंदें ओसरल्या ज्या साऱ्या. ९

रम्य गायनें वेधुनि टाकूं चाल दिशांना चारी;
अमृताचा वर्षाव करूं ये ईशाच्या बाजारीं. १०

# ११. कवि-बाळें

स्वर्गाच्या तेजोगर्भी बाळें तीं खेळत होतीं,
वत्सलता प्रभुरायाची जोजवी तयां निजहातीं;
झुलवी त्यां पाळणियांत छायामय मधुरजनी ती.
मोत्याचें घालुनि पाणी
स्वर्गंगा त्यांना न्हाणी,
लडिवाळें बाळें तान्हीं,
देवाचीं आवडती तीं—कविबाळें खेळत होतीं ! १

बैसूनि सूर्यकिरणांत सोन्याच्या कारंजांनीं
कधिं जलदजाल खुलवावें स्वर्गीय जादुनें त्यांनीं,
कधिं चंद्रकला सजवावी ज्योत्स्नेचें जाल विणोनी,
शान्तीचा करुनी पांवा
कधिं रात्रीं सूर धरावा,
नक्षत्रलोक डुलवावा,
सौंदर्यें उधळित होतीं—बाळें तीं खेळत होतीं ! २

एकदां सडा संध्येचा शिंपुनी महोत्सव केला,
बनविलें बीन ओढोनी कोंवळ्या सूर्यकिरणांला,
तें वाद्य वाजवायाला बाळांचा मेळा आला;
ते सान्ध्यगिरी बहुवर्णी
छायामय त्या निर्झरिणी
टाकिल्या क्षणीं व्यापोनी !
परिसाया देवहि येती ! बाळें तीं खेळत होतीं ! ३

वाद्याचा ये झंकार   एकेक जसा उदयाला
एकेक सृष्टिचें फूल   लागे हो उमलायाला !
निस्तब्ध मूक गगनाला   निमिषांतच मोहर आला.
आनंद गडे—आनंद,
गाण्याचा एकच छंद,
हो चोहिंकडे गोविंद,
ये रंगनाथ संगीतीं,   बाळें तीं खेळत होतीं ! ४

परि आला तीव्र विषारी,   हा न कळे कुठचा वारा !
कंपित हो एकाएकीं   कां दिव्य देश हा सारा !
बाळांचे गळले हात,   वीनेच्या तुटल्या तारा !
ती स्वप्नसृष्टि जळाली,
गाण्याची तार गळाली,
काजळी चढे वरखालीं,
झाली हो माती माती !   बाळें तीं खेळत होतीं ! ५

त्या खोल भूमिगर्तेत   अंधार खळाळत होते;
मोहाचें जालिम वीष   बेभान करी सकळांतें;
वायूसह तीव्र विषारी   अंधुकता पसरित येतें.
वाफारा तो लागोनी
तीं दिव्य बालकें तान्हीं
कळमळुनी पंचप्राणीं
कोसळुनी खालीं येतीं !   स्वर्गीय दिव्य बाळें तीं ६

कडकडला गगनीं तारा   ढांसळला, भूवर आला !
स्वर्गीय तेज मालवुनी   पाषाण क्षणार्धीं झाला !

हा प्रभाव या जगताचा   दोषावें यांत कुणाला ?
स्वर्गाचे ते शृंगार,
प्रेमाचे मौक्तिकहार,
गांठिता जडाचें दार
जडतेनें वेष्टित होतीं !   स्वर्गीय दिव्य बाळें तीं ! ७

काळाच्या आवर्तांत   भोवंडुनि गिरके घ्यावे,
चांचपतां अंधारांत   ठेंचाळुनि विव्हल व्हावें,
जें जीवित या जगतीचें   तें त्यांस कसें मानावें ?
जीवास आग लागोनी
तळमळती माशावाणी
स्मरुनी ती पूर्वकहाणी
फोडितात टाहो चित्तीं—   बाळें तीं खेळत होतीं ! ८

परि त्याच दीर्घ किंकाळ्या   ठरतात जगाचीं गाणीं !
निःश्वास आंत जे कढती   ती स्फूर्ति लोक हा मानी.
संतप्त अश्रुमालेला   गणितात कल्पनाश्रेणी !
गौरवितें विश्व कवींना,
जग सर्व डोलवी माना,
परि मुग्ध मधुर आत्म्यांना
त्या काय बोचतें चित्तीं ? बाळें तीं खेळत होतीं ! ९

◎ ◎ ◎

# १२. आनंदी–आनंद

आनंदी–आनंद गडे
इकडे, तिकडे, चोहिंकडे.
वरतीं–खालीं मोद भरे;
वायूसंगें मोद फिरे,
नभांत भरला,
दिशांत फिरला,
जगांत उरला,
मोद विहरतो चोहिंकडे;
आनंदी–आनंद गडे १

सूर्यकिरण सोनेरी हे
कौमुदि ही हंसते आहे;
खुलली संध्या प्रेमानें,
आनंदें गाते गाणें;
मेघ रंगले,
चित्त दंगलें,
गान स्फुरलें,
इकडे, तिकडे, चोहिंकडे
आनंदी–आनंद गडे ! २

नीलनभीं नक्षत्र कसें
डोकावुनि हें पाहतसे;
कुणास बघतें ? मोदाला !
मोद भेटला का त्याला ?
तयामधें तो
सदैव वसतो,
सुखें विहरतो,
इकडे तिकडे चोहिंकडे;
आनंदी–आनंद गडे ! ३

वाहति निर्झर मंदगति,
डोलति लतिका वृक्षतती,
पक्षि मनोहर कूजित रे,
कोणाला गातात बरें ?
कमल विकसलें,
भ्रमर गुंगले,
डोलत वदले—
इकडे, तिकडे, चोहिंकडे
आनंदी–आनंद गडे ! ४

स्वार्थाच्या बाजारांत
किती पामरें रडतात;
त्यांना मोद कसा मिळतो ?
सोडुनि स्वार्था तो जातो–
द्वेष संपला,
मत्सर गेला,
आतां उरला
इकडे, तिकडे, चोहिंकडे
आनंदी–आनंद गडे ! ५

## १३. तृणपुष्प

मनोवेधका सृष्टिसतीच्या अगा चिमुकल्या बाला !
स्वागत तव, ये तृणासहित या भूतें डोलविण्याला १

सजल नील घन करोनि गेले अमृताचा वर्षाव;
चलत्तृणावरि तुला पाठवी प्रेमभरें मग देव. २

खेळ लाडक्या या सृष्टीच्या अंकावरती आतां;
घे आन्दोलन सुखें ताल दे या विहगाच्या गीतां. ३

या वायूच्या प्रशान्त लहरी, हे गगनाचे श्वास,
या प्रेमाच्या लाटा सुमना, चुंबुनि घे तूं यांस. ४

म्हणोत कोणी तूं अवनीच्या उदरांतुनि आलास;
मज गमसी परि नभोविहारी देवदूत तूं खास. ५

ही मोहकता, तुझी फुला ही प्रेमनिर्भरा वृत्ती;
सदानंद हा उद्वेल का या भूपृष्ठावरती ? ६

सदैव सस्मित, सदैव अपुला डोलत तूं असतोस;
दुःखसृष्टी कधीं स्पर्शिली नाहीं तव चित्तास. ७

तुला तुडविती कितेक करिती तुजवरती आघात;
म्हणोनि नाहीं कधीं पाहिलें खिन्न तुझें मीं चित्त. ८

मैदानावर मी मित्रांसह या खेळाया येतों;
प्रतिवर्षी तुज बघतों येथें, सवेंच वेडा होतों. ९

तुझीं चुंबनें असंख्य घेतों, धरितों तुज हृद्याशीं;
तृप्ति न हो परि चित्त धांवतें पुनःपुन्हां तुजपाशीं. १०

तृणपुष्पा चल, तुज कवितेच्या ठेविन उद्यानांत;
सख्या रहा तूं तिथें निरंतर, रंजव माझें चित्त. ११

◎ ◎ ◎

## १४. संध्यातारक

[ मूळ कवितेतील काही पद्यपंक्ती गाळून व काही बदलून ही कविता मासिक 'मनोरंजन'मध्ये शेवटी ह्या स्वरूपात प्रसिद्ध झाली. ]

दिनरजनींच्या हृदयावरलें
प्रेमसंगमीं उद्भवलेलें
मुग्ध तान्हुलें फूलच पहिलें !
कोमल किरणीं, नभ फुलवोनी, खेळ खेळतें त्यांत १

लहरींच्या सुंदर आन्दोलीं
लहानग्याची शय्या केली,
रजनी ओंव्या गाउं लागली—
तूं लडिवाळा ! निज निज बाळा ! मातेच्या हृदयांत. २

विश्वाचें विश्रान्तिस्थान
तें माझ्या गुणिलाचें गान
अशी गडे अक्षय गाईन !
तूं वेल्हाळा निज निज बाळा या मम गीतसुरांत. ३

तेजाला आन्दोलन देत
मंदपणें विचरे स्वर्वात
शान्त शान्त अवघ्या गगनांत
दिव्य अप्सरा, सुगुणागारा, प्रीतिगीति गातात. ४

त्या गीतींच्या मधुलहरींनीं
गुंगी चढुनी या तव नयनीं
लागो डोळा तुझा म्हणोनी–
मीही गातें अस्फुट गीतें हृदयाच्या हृदयांत ५

झोंप कशी ती परी अजुनिही
आज गडे तुज लागत नाहीं?
सांग करूं तरि आतां काई
बघ ना बा रे! विश्वच सारें निजलें प्रभुहृदयांत. ६

आन्दोलीं तुज नीज न येई
घेतें तर उचलुनि मी बाई
झांकियलीं ग मधुनेत्रें हीं
पदराखालें झोंपीं गेलें बाळ कसें इतुक्यांत? ७

◎ ◎ ◎

# १५. निर्झरास

गिरिशिखरें, वनमालाही दरीदरी घुमवित येई !
कड्यावरुनि घेऊन उड्या खेळ लतावलयीं फुगड्या.
घे लोळण खडकावरती, फिर गरगर अंगाभंवतीं;
जा हळुहळु वळसे घेत लपत–छपत हिरवाळींत
पाचूंचीं हिरवीं रानें झुलव गडे, झुळझुळ गानें !
वसंतमंडप–वनराई आंब्याची पुढतीं येई.
श्रमलासी खेळुनि खेळ नीज सुखें क्षणभर बाळ !
हीं पुढचीं पिवळीं शेतें सळसळती–गाती गीतें;
झोंप कोठुनी तुला तरी, हांस लाडक्या ! नाच करीं.
बालझरा तूं बालगुणी, बाल्यचि रे ! भरिसी भुवनीं !

* * * *

बालतरू हे चोंहिकडे ताल तुला देतात गडे !
प्रेमभरें त्यांवर तूंही मुक्त-मणी उधळुनि देई !
बुदबुद–लहरी फुलवेली फुलव सारख्या भंवतालीं.
सौंदर्यें हृदयांमधलीं दे विश्वीं उधळून खुलीं !
गर्द सावल्या सुखदायी वेलींची फुगडी होई !
इवलालीं गवतावरतीं रानफुलें फुलती हंसती.
झुलवित अपुले तुरे–तुरे निळी लव्हाळी दाट भरे.
जादूनेंच तुझ्या बा रे ? वन नंदन बनलें सारें !
सौंदर्याचा दिव्य झरा बालवसंतचि तूं चतुरा;
या लहरीलहरीमधुनी स्फूर्ति दिव्य भरिसी विपिनीं

* * * *

आकाशामधुनी जाती मेघांच्या सुंदर पंक्ति;
इंद्रधनूची कमान ती ती संध्या खुलते वरतीं;
रम्य तारका लुकलुकती नीलारुण फलकावरतीं;
शुभ्र चंद्रिका नाच करी स्वर्गधरेवर एकपरी;
हीं दिव्यें येती तुजला रात्रंदिन भेटायाला!
वेधुनि त्यांच्या तेजानें विसरुनियां अवघीं भानें
धुंद हृदय तव परोपरी मग उसळी लहरीलहरी
त्या लहरीमधुनी झरती दिव्य तुझ्या संगीततति!
नवल न, त्या प्राशायाला स्वर्गहि जर भूवर आला!
गंधर्वा! तव गायन रे वेड लाविना कुणा बरें!

*  *  *  *

पर्वत हा, ही दरीदरीं तव गीतें भरलीं सारीं.
गाण्यानें भरलीं रानें, वर–खालीं गाणें गाणें!
गीतमय स्थिरचर झालें! गीतमय ब्रह्माण्ड डुले!
व्यक्त तसें अव्यक्तहि तें तव गीतें डुलतें झुलतें!
मुरलीच्या काढित ताना वृंदावनिं खेळे कान्हा;
धुंद करुनि तो नादगुणें जडताही हंसवी गानें;
दिव्य तयाच्या वेणुपरी तूंहि निर्झरा! नवलपरी
गाउनि हें झुळझुळ गान विश्वाचें हरिसी भान!
गोपि तुझ्या हिरव्या वेली रास खेळती भंवतालीं!
तुझ्या वेणुचा सूर तरी चराचरावर राज्य करी!

*  *  *  *

काव्यदेविचा प्राण खरा तूंच निर्झरा! कवीश्वरा!
या दिव्याच्या धुंदिगुणें दिव्याला गासी गाणें.

मी कवितेचा दास, मला कवी बोलती जगांतला,
परि न झरे माझ्या गानीं दिव्यांची असली श्रेणी !
जडतेला खिळुनी राही हृदयबंध उकलत नाहीं !
दिव्यरसीं विरणें जीव जीवित हें याचें नांव;
तें जीवित न मिळे मातें मग कुठुनी असलीं गीतें ?
दिव्यांची सुंदर माला ओंवाळी अक्षय तुजला !
तूंच खरा कविराज गुणी सरस्वतीचा कंठमणि
अक्षय तव गायन वाहे अक्षयांत नांदत राहे !

* * * *

शिकवी रे, शिकवी मातें दिव्य तुझीं असलीं गीतें !
फुलवेली–लहरी असल्या मग हृदयीं उसळोत खुल्या !
वृत्तिलता ठायीं ठायीं विकसूं दे सौंदर्याहीं !
प्रेमझरी–काव्यस्फूर्ति ती आत्मज्योती चित्तीं
प्रकटवुनी चौंदा भुवनीं दिव्य तिचें पसरी पाणी !
अद्वैताचें राज्य गडे ! अविच्छिन्न मग चोहिंकडे !
प्रेमशान्तिसौंदर्याहीं वेडावुनि वसुधामाई
मम हृदयीं गाइल गाणीं रम्य तुझ्या झुळझुळ वाणी !
आणि जसें सगळें रान गातें तव मंजुळ गान,
तेंवि सृष्टिची सतार ही गाइल मम गाणीं कांहीं !

◎ ◎ ◎

# १६. बालविहग

( अष्टदिशांचा गोफ )

सांज खुले सोन्याहुनि पिवळें हें पडलें ऊन;
चोहिंकडे लसलशित बहरल्या हिरवाळी छान.
पांघरली जरतार जांभळी वनमाला शाल;
सान्ध्यतेज गिरिशिखरीं विखरी संमोहनजाल.
त्या तेजाचा प्राण चिमुकला संध्येचा दूत
बाल विहग आनंद मूर्तिमान् झुलतो गगनांत.
क्षणभर येथें क्षणभर तेथें, भिंगोरी साची
अवकाशीं जशि काय फिरविली फिरकी जादूची!
खेळाडू कविबाळ करुनि जणुं भावांची होडी
मूर्तरूप देउनी तिला या वाऱ्यावर सोडी.
गिरिशिखराचें गोड[1] फूल हें सान्ध्य तरंगांनीं
झुलुनि त्यांतला पराग कीं हा भरभरतो गगनीं!

*    *    *    *

अष्टदिशांचा गोफ सभोंतीं हा भिरिभिरि पाहे;
मंद झुले वनमाल, वाहता शान्त झरा राहे.
समाधिस्थ जणुं काय जाहलें हा गिरि, हें रान
हा आनंदोद्रेक नाचरा गगनीं पाहून!
सुंदरतेचा जलसा असला पाहुनिया धाला
कालहि वाटे विस्मित चित्तें स्तब्ध उभा ठेला।

*    *    *    *

---

१ गोल.

सृष्टिदेविच्या सगुणा बाळा स्वर्गाच्या तान्ह्या
नांवहि रे तव ठाउक नाहीं मज गोजिरवाण्या !
निजदेहाचा करुनि असा हा सुंदर आन्दोल
आत्मरंगीं रंगल्या मनाला झुलविसि कीं बोल ?
किंवा कोणी दिव्य देवता जरि न दिसे मज ती
लीलेनें तुज हालविते का घेउनिया हातीं ?
सुंदरतेच्या सुमनावरचें दंव चुंबुनि घ्यावें,
चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हांत हिंडावें,
प्रीतिसारिका गीत तियेचें ऐकावें कानीं,
बनवावें मन धुंद रंगुनी काव्यसुधापानीं,
अंधाराचे पाश मनाचे हे गळुनी जावे,
चित्त वाटतें तरळ तुझ्यापरि खगबाळा व्हावें.

*          *          *          *

भवदुःखाच्या अनंत डोहीं परि बुडतों पाहीं;
शान्ति मिळेना क्षणभर जीवा विश्रान्ती नाहीं.
काव्यदेवता अंतरली मज गरिबाला आज;
काळ लोटला हाय किती मन वरिताहे लाज.
भ्राते माझे वातावरणीं तुजपरि भरभरती;
पंख तुटुनिया विव्हल पडलों मी धरणीवरतीं.

*          *          *          *

सुंदरतेच्या मोहनांत मन अमुचेंही नाचे.
बंधहि होती शिथिल, हरपतें भानहि जगताचें,
जीव ओढतो वरवर जाया चैतन्यापाठीं;
हाय[१] ! सुटेना दृढ देहाची परि बसली गांठी !

---

१ हाय सुटेना दृढ देहाच्या परि बसल्या गांठी ।

दिव्यानंदीं म्हणुनि उमाळा दुःखाचा दाटे.
सत्यहि जो आनंद कल्पनामय केवळ वाटे.

*        *        *        *

अपूर्णताही यापरि मजला जरि बुडवी शोकीं,
चित्र मनोहर खगबाला परि मी तव अवलोकीं.
अपूर्ण अपुलें ईप्सित झालें पूर्ण दिसे जेथें,
मनुजाचें मन सहज पावतें आकर्षण तेथें.
तुजला बघतां भरभर उडतां कविता आठवली.
कशीबशी ती त्वत्प्रीतीस्तव या कवनीं लिहिली.

◎ ◎ ◎

## १७. तारकांचें गाणें

कुणि नाहीं ग, कुणि नाहीं    आम्हांला पाहत बाई,
शान्ति दाटली चोंहिकडे,    या ग, आतां पुढें पुढें,
लाजतलाजत,    हळूच हांसत,
खेळ गडे, खेळूं कांहीं,    कोणीही पाहत नाहीं.    १

सुंदरतेला नटवून,    कोमलतेला खुणवून[1],
प्रेमाच्या वसतीकरितां    जगदंतर[2] फुलवूं आतां,
दिव्य[3] सुरांनीं    गीतें गाउनि
विश्वाला निजवायाला    वाऱ्याचा बनवूं झोला,    २

---

१ सुंदर तें तें नटवून । कोमल तें तें खुलवून.    २ जग सगळें.    ३ दिव्य रवांनीं । गाणीं गावुनि ।

फेकुनि द्या इकडेतिकडे  थोडेसे दंवबिंदु गडे,
या निर्मल अवकाशांत  प्रेमाचें पेरूं शेत,
दिव्यमोहिनी–[1]  सर्वे गुंगुनी
विश्वाला[2] वत्सलतेनें  प्रेमाचें गाऊं गाणें,  ३

सरितांच्या लहरींवरतीं  नाचूं या निर्भयचित्तीं
अर्धोन्मीलित फुलवोनी  लपूं चला कलिकांत कुणी
कविहृदयांत  गरके घेत
जाउनिया खेळूं आतां  हीं गाणीं गातां गातां  ४

एखादी तरुणी रमणी  रमणाला आलिंगोनी,
लज्जामूढा भीरुच ती  शंकित जर झाली चित्तीं,
तिच्याच नयनीं  कुणी बिंबुनी
धीट तिला बनवा बाई;  भुलवा ग, रमणालाही.  ५

सुस्वप्नांनीं गुंगवुनी  पुण्यात्मे हसवा कोणी
आशा ज्या त्यांच्या चित्तीं,  त्याच रचा स्वप्नांवरतीं
दयितचिंतनीं,  विरहभावनीं
दिवसां ही झुरली बाला,  भेटूं द्या स्वपती हिजला  ६

अनेक असले खेळ करूं  प्रेमाशा विश्वांत भरूं,
सोडुनिया अपुले श्वास  खेळवुं[3] नाचवुं उल्हास
प्रभातकाळीं  नामनिराळीं
होउनिया आपण राहूं  लोकांच्या मौजा पाहूं.  ७

◎ ◎ ◎

---

१ मंदयामिनी ।   २ झोंप लागली जगताला । या ग आतां खेळूं चला.
३ जगीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वतंत्र

# १८. फुलराणी

हिरवे हिरवेगार गालिचे—हरित तृणाच्या मखमालीचे;
त्या सुंदर मखमालीवरतीं—फुलराणी ही खेळत होती.
गोड निळ्या वातावरणांत—अव्याज-मनें होती डोलत;
प्रणयचंचला त्या भ्रूलीला—अवगत नव्हत्या कुमारिकेला.
आईच्या मांडीवर बसुनी—झोंके घ्यावे, गावीं गाणीं;
याहुनि ठावें काय तियेला—साध्या भोळ्या फुलराणीला ?

*         *         *         *

पुरा विनोदी संध्यावात—डोलडोलवी हिरवें शेत;
तोच एकदां हांसत आला—चुंबून म्हणे फुलराणीला :—
" छानी माझी सोनुकली ती—कुणाकडे ग पाहत होती ?
कोण बरें त्या संध्येंतून—हळुच पाहतें डोकावून ?
तो रविकर का गोजिरवाणा—आवडला अमुच्या राणींना ? "
लाजलाजली या वचनांनीं—साधी भोळी ती फुलराणी !

*         *         *         *

आन्दोलीं संध्येच्या बसुनी—झोंकें झोंके घेते रजनी;
त्या रजनीचे नेत्र विलोल—नभीं चमकती ते ग्रहगोल !
जादूटोणा त्यांनीं केला—चैन पडेना फुलराणीला;
निजलीं शेतें, निजलें रान,—निजले प्राणी थोर लहान.
अजून जागी फुलराणी ही—आज कशी ताळ्यावर नाहीं ?
लागेना डोळ्याशीं डोळा—काय जाहलें फुलराणीला ?

*         *         *         *

या कुंजांतुन त्या कुंजांतुन—इवल्याशा या दिवट्या लावुन,
मध्यरात्रिच्या निवान्त समयीं—खेळ खेळते वनदेवी ही.
त्या देवीला ओंव्या सुंदर—निर्झर गातो; त्या तालावर—
झुलुनि राहिलें सगळें रान—स्वप्नसंगमीं दंग होउन!
प्रणयचिंतनीं विलीनवृत्ति—कुमारिका ही डोलत होती;
डुलतां डुलतां गुंग होउनी—स्वप्नें पाही मग फुलराणी—

* * * *

"कुणी कुणाला आकाशांत—प्रणयगायनें होते गात;
हळुच मागुनी आलें कोण—कुणी कुणा दे चुंबनदान!"
प्रणयखेळ हे पाहुनि चित्तीं—विरहार्ता फुलराणी होती;
तों व्योमींच्या प्रेमदेवता—वाऱ्यावरतीं फिरतां फिरतां—
हळूच आल्या उतरुन खालीं—फुलराणीसह करण्या केली.
परस्परांना खुणवुनि नयनीं—त्या वदल्या ही अमुची राणी!

* * * *

स्वर्भूमीचा जुळवित हात—नाचनाचतो प्रभातवात;
खेळुनि दमल्या त्या ग्रहमाला—हळुहळु लागति लपावयाला
आकाशींची गभीर शान्ती—मंदमंद ये अवनीवरतीं;
विरूं लागलें संशयजाल,—संपत ये विरहाचा काल.
शुभ्र धुक्याचें वस्त्र लेवुनी—हर्षनिर्भरा नटली अवनी;
स्वप्नसंगमीं रंगत होती—तरीहि अजुनी फुलराणी ती!

* * * *

तेजोमय नव मंडप केला,—लखलख पांढरा दहा दिशांला,
जिकडे तिकडे उधळित मोतीं—दिव्य वऱ्हाडी गगनीं येती;

लाल सुवर्णी झगे घालुनी—हांसत हांसत आले कोणी;
कुणी बांधिला गुलाबि फेटा—झकमकणारा सुंदर मोठा !
आकाशीं चंडोल चालला—हा वाङ्‌निश्चय करावयाला;
हें थाटाचें लग्न कुणाचें—साध्या भोळ्या फुलराणीचें !

*　　*　　*　　*

गाउं लागले मंगलपाठ,—सृष्टीचे गाणारे भाट,
वाजवि सनई मारुतराणा—कोकिळ घे तानावर ताना !
नाचुं लागले भारद्वाज,—वाजविती निर्झर पखवाज,
नवरदेव सोनेरी रविकर—नवरी ही फुलराणी सुंदर !
लग्न लागतें ! सावध सारे !—सावध पक्षी ! सावध वारे !
दंवमय हा अंतःपट फिटला—भेटे रविकर फुलराणीला !

*　　*　　*　　*

वधूवरांना दिव्य रवांनीं,—कुणीं गाइलीं मंगल गाणीं;
त्यांत कुणीसें गुंफित होतें—परस्परांचें प्रेम ! अहा तें !
आणिक तेथिल वनदेवीही—दिव्य आपुल्या उच्छ्वासांहीं
लिहीत होत्या वातावरणीं—फुलराणीची गोड कहाणी !
गुंगत गुंगत कवि त्या ठायीं—स्फूर्तीसह विहराया जाई;
त्यानें तर अभिषेकच केला—नवगीतांनीं फुलराणीला !

◎ ◎ ◎

# १९. संध्यारजनी

अस्तगिरीच्या अभिनव कुंजीं निजला निजनाथ,
बघतां बघतां त्यास रंगलें वारुणिचें चित्त.
हळुच पाहते, मधुर हांसते, जाते लाजून,
म्हणे मनाशीं, ' जीव टाकुं का हा ओवाळून ! '
प्रेमनिर्भरा बघुन सखीला भास्कर मायावी
जातां जातां साखरचुंबा एक तिचा घेई !
लाजलाजुनी जीव सतीचा मग अर्धा झाला.
त्यांतच आल्या रोषाच्याही लहरी गालाला !

*　　*　　*　　*

गेला, झाला दृष्टिआडही सूर्य, तरी अजुनी
पहा चमकते प्रेमपताका पश्चिमदिग्वदनीं.
थक्क होउनी दिशा म्हणाल्या ' काय मोहिनी ही !
प्रेमसमाधी अजुनि खुळीची या उतरत नाही ! '
किती पश्चिमे ! आतां त्याचें चिंतन करशील ?
दृष्टि लावुनी अशीच बसशिल सांग किती वेळ ?
खिन्नपणा हा पुरे, पुरे ग अश्रूंची माळ !
उद्यां बरं का तो राणीला अपुल्या भेटेल. '

*　　*　　*　　*

संध्येच्या खिडकींत येउनी ही हंसरी तारा,
हळुच पाहते, खुणावितेही ' या—या ' कोणाला ?
पलिकडचा तो तेजोमय नव पडदा सारून
बघते, हंसते, क्षणांत लपते, ही दुसरी कोण ?

लाजत लाजत असाच येइल सारा स्वर्लोक,
मुग्ध बालिका जमतिल गगनीं आतां नवलाख.
प्रथम तारके ! पहा सखी तव एक पुढें आली
ही दुसरी, ही तिसरी– आतां किती तरी भंवतालीं !

*　　*　　*　　*

आली होती भरती आतां अस्तसमुद्राला,
त्या लाटांतुन काय सांडल्या या मौक्तिकमाला !
कल्पतरूचीं फुलें उडालीं कीं वाऱ्यावरती ?
आकाशींच्या गंगेला कीं बुद्‌बुद हे येती ?
नवटिकल्यांची चंद्रकळा कीं गगनश्री नेसे ?
स्वर्गींचें भांडार उघडलें कीं रात्रीसरसें ?
विश्वशिरावर टोप चढविला हिऱ्यामाणकांचा !
मंगल, मंगल, जिकडे तिकडे जय माङ्गल्याचा !

*　　*　　*　　*

रजनीदेवी ! वैभवशाली तूं अमुची राणी,
हीं नक्षत्रें, तारा साऱ्या, लीन तुझ्या चरणीं.
ज्याच्या त्याच्या तारा वांटुन दे ग्रहगोलांना,
गगनमंडलीं फेर धरूं दे प्रेमाचा त्यांना
दिशादिशांला तुझीं गाउनी प्रेमाचीं गाणीं
रजनीदेवी ! विश्व टाक हें प्रेमें भारोनी !
काळ्या काळ्या या पडणाऱ्या अंधारासंगें
ब्रह्माण्डाचें हृदय नाचवी प्रेमाच्या रंगें !

*　　*　　*　　*

काळ्या अंधारांत खेळतें विश्व लपंडाव,
ताऱ्यांवरतीं बसून बघती तें कौतुक देव.
पहा दिशांनीं पांघरूनि या काळ्या बुरख्याला
काळा बागुल काळोखाचा एक उभा केला.
मंद मंद तेजांत शोधितें गगनश्री त्यांना,
पाजळूनि हे नक्षत्रांचे रत्नमणी नाना.
खेळ चालला एकसारखा हा खालींवरतीं,
पूर्व दिशाही तोंच हांसली, सांपडली हातीं

*    *    *    *

उदयगिरीवर नवतेजाची शान्त पताका ही !
कीं गंगेच्या शुभ्र जलाचा स्रोत वरी येई.
हे मेघांचे धुऊन पडदे स्वच्छ कुणीं केले ?
मंगल मंगल तेज चहूंकडे कुठुनि बरें आलें ?
अर्ध्या मिटल्या अर्ध्या उघड्या असल्या नयनांनीं
कुणास बघती दिशा कळेना मंदस्मित करुनी ?
पहा उदेला दिव्य गोल हा– छे ! भलतं कांहीं !
हा तारांचा सखा तयांना भेटाया येई.

*    *    *    *

तुमची राणी बसे सारखी तुम्हां न्याहाळीत,
गगनाच्या चौकांत चला हो, या रजनीनाथ !
धवल चंद्रिके ! दे आलिंगन दिव्य यामिनीला,
बहिणी–बहिणी तुम्ही सुखानें चंद्राशीं खेळा !
कां तारांनो ! तुम्ही लाजतां ? हा मंगल काल !
निर्मत्सर व्हा, प्रेमसंगमीं पोहा चिरकाल.

ब्रह्माण्डाचा गोल धरी या प्रेमाचा फेर
फुलें शान्तिचीं पहा उधळलीं जगतीं चौफेर !
निज निज आतां म्हणे जगाला वत्सलता माता,
रजनीदेवी गात बैसली अंगाईगीतां.
गगनाच्या या शेजेवरती निजवा तारांना,
चंद्रा ! दे ओढणी तुझ्या नव तेजाची त्यांना
हंसतां हंसतां झोंप लागली दहा दिशांनाहि,
ब्रह्माण्डाचा गोल डोलतो, पण जागा नाहीं !
या प्रेमाला गातां गातां कविचेंही चित्त
प्रेमाच्या निद्रेंत रंगलें पाठ गात गात.

◎ ◎ ◎

## २०. फूलपांखरूं–फुलवेली

‘ हें फूल या उडत्या स्वर्गांतील.
माणिक हें बाइ गडे झुलतें आहे !
हें तान्हें सृष्टीचें गोजिरवाणें ’
कौतुकली मधुवदना हंसली वदली– १

‘ स्वच्छंदी फूलपांखरा ! आनंदी
माधविका पाठविते तुज या लोका,
ये, गाई चुम्बनमय गाणीं कांहीं;
खेळ इथें या कोमल कलिकेवरतें;
ही बाला फूलपांखरा ! चुंबि हिला ’ २

फुलें नवीं   मुग्धलतेवरतीं यावीं,
त्यापरि ती   प्रेमलता फुलली चित्तीं,
हाय परी   फूलपांखरूं तिचें दुरी!
नातरि तें   या सुमनीं स्वर्गचि बघतें! ३

'थांब गडे   धावुं नको इकडे तिकडे;
कलिका ही   मुग्ध हृदय उकली पाहीं.
प्राणच तूं   एक तिचा जीवनहेतु!
थांब तरी–   कठिणच गे नरजाति खरी!' ४

फुलवेली   क्षण रोषें रंजित झाली,
ते बाण   मदनाचे हरिते भान.
रंगहि ते   जडतेला जीवन देते,
अरसिक तें   फूलपांखरूं परि होतें.
रसिक न का   हाय पण तिचा प्राणसखा! ५

हें सुमन   तुजवांचुनि चुंबिल कवण?
'सांग तरी'–   गद्गदली फुलवेल परी
'विरहानें   शून्य न का गमती भुवनें?'
हृदयाला   पूर पुरा भरुनी आला! ६

'या आतां–   अन्त किती बघतां नाथा!
मी फूल   या निर्जन रानांतील
श्वासानें   व्यर्थ आर्द्र करितें भुवनें!'
'व्यर्थचि कां?'   'कोण?–बाइ ग प्राणसखा' ७

सांज खुले दिनरजनीमीलन झालें.
देवमाला उपमा तरि कसली त्याला ?
टपटपती स्वर्भूच्या हृदयावरतीं
कूजनही मधुनिमधुनि ऐकूं येई ! ८

सांजचि ती वर्णावी कैशी गीतीं ?
त्या छाया कवि होता अवलोकाया;
कौतुकला शब्द परी न फुटे त्याला !
मूकपणीं अक्षय गुंगे हेंच मनीं
‘ गोड भलीं फूलपांखरूं--फुलवेली !’ ९

## २१. शुक्रोदय

सौंदर्य शब्दातीत–स्वर्भूवर अवतरतात,
तेजाची फुटली पेठ–दिव्यत्वाची लयलूट,
कृष्णपक्षिंची चंद्रकला–त्यावरती तरते विमला,
शान्ति दाटली निस्तुल ही–मंद कौमुदीसह[1] वाही.

स्वर्गाच्या वरचें तेज–ताराङ्गणिं भरलें आज,
त्यांतच तमही भासतसे–रजनीचे मधुमंत्र जसे;
निश्चितपणा अवनीला–निश्चितपणा गगनाला,
विश्वामधिं मिश्रित झाला–निस्पंदपणा अवनीला.

---

१. कौमुदीसहवासीं.

तेजतमांचें झुंज परी–अव्यक्त नभीं हास्य करी;
संधिकाल अत्युत्कट तो–क्षितिजावर अस्फुट फुटतो
अत्युत्कट सगळें कांहीं–नित्य नवी शोभा पाही;
*सौंदर्यें वेडें झालें–तेजाची वारुणि प्यालें.*

दिव्याच्या मागुनि चाले–विश्व, खरें कळुनी आलें;
केंद्र तया सौंदर्याचा–शुक्र नभीं उगवे साचा.
मुकुट कळ्यांचा दिव्य शिरीं–पीतांबर परिधान करी,
तेज विखुरलें चोंहिकडे–पुष्पावर गगनीं उघडें.

मंगल मंगल गीत म्हणे–अस्फुट रजनी मूकपणें
बालसुधाकर बालकरीं–बालशिरीं अभिषेक करी.

◎ ◎ ◎

## २२. अरुण

पूर्वसमुद्रीं छटा पसरली रम्य सुवर्णाची
कुणीं उधळिली मूठ नभीं ही लाल गुलालाची ?
पूर्व दिशा मधु मृदुल हांसते गालींच्या गालीं.
हर्षनिर्भरा दिशा डोलती या मंगल कालीं.
क्षितिजाची कड सारविली ही उज्ज्वल दीप्तीनें,
सृष्टिसतीनें गळां घातलें कीं अनुपम लेणें ?
हे सोन्याचे, रक्तवर्ण हे, हे पिवळे कांहीं,
रम्य मेघ हे कितेक नटले मिश्रित रंगांहीं.

उदरांतुनि वाहते कुणाच्या सोन्याची गंगा,
कुणीं लाविला विशुद्ध कर्पुररस अपुल्या अंगा ?

* * * *

अरुण चितारी, नभःपटाला रंगवितो काय ?
प्रतिभापूरित करी जगाला कीं हा कविराय ?
कीं नवयुवती उषासुंदरी दारीं येवोनी
रंगवल्लिका रम्य रेखिते राजस हस्तांनीं ?
दिवसयामिनी परस्परांचें चुंबन घेतात—
अनुरागाच्या छटा तयांच्या खुलल्या गगनांत !
स्वर्गींच्या अप्सराच अथवा गगनमंडळांत
रात्रीला शेवटचीं मंगल गीतें गातात ?
किंवा 'माझी चोरुनि नेली मोत्यांची माला'
म्हणुनि नभःश्री रुसली, आली लाली गालांला ?
कीं रात्रीचें ध्वान्त पळालें, आशेची लाली
उत्साहाशीं संगत होउनि ही उदया आली ?
किंवा फडके ध्वजा प्रीतिची जगता कळवाया,
कीं आपणांवर आज पातली हीच खरी विजया ?
कीं स्वर्गींच्या दिव्यांचें हें फुटलें भांडार,
जणूं वाटतें स्वर्गच त्यासह खालीं येणार !
प्रगट जाहलें श्रीरामाचें पुष्पक किंवा हें ?
कीं सोन्याची पुरी द्वारका लखलखते आहे ?

* * * *

"तेजानें न्हाणितें जगाला कोण सखे बाई ?
नवल अगाई ! तेजोमय तूं ? तेजोमय मीही !"

परस्परांना दिशा म्हणाल्या प्रेमळ वचनांनीं
" विरहकाल संपला गा गडे प्रेमाचीं गाणीं !
या मेघाच्या कुंजामध्यें ही लपली कोण ?
तिला बोलवा–पुरे गडे ग ! हा तुमचा मान !
अम्ही गवळणी हृदयरसांनीं पूजूं प्रेमाला,
प्रेमकाल हा ! म्हणोत कोणी अरुणोदय याला.
पूर्वदिशेशीं गोफ खेळतो कृष्णगडी बाई !
उधळित सोनें सर्व तयाच्या लागूं या पायीं.
मधुस्मितानें विश्व भरूं ग ! शंकित कां म्हणुनी ?
सर्व सारख्या ? हांसावें मग कोणाला कोणीं ? "
गोफ चालला गगनमंडळीं, रंग नवा आला,
त्यांत लागला कृष्णाचा[1] कर पूर्वेच्या गाला.
विनयवती ती पूर्वदिशा मग अधोवदन झाली,
तों प्रेमाची अद्‍भुत लहरी वसुधेवर आली !

* * * *

या प्रेमाच्या लाटेखालीं मस्तक नमवावें,
हें आम्हांला, ब्रह्माण्डाला, देवाला ठावें.
परंतु ही बघ भूदेवी तर वेडावुनि गेली,
टकमक पाहत स्वस्थ बैसली या मंगल कालीं !
दंवबिंदूंचा–नव्हे नव्हे ! हा पडदा लज्जेचा—
मुग्धपणाचा, बालपणाचा, कोमल हृदयाचा—
निजवदनाहुनि या प्रौढेनें दूर पहा केला,

---

१. कर्षति इति कृष्णः अर्थात् ज्याचे किरण सर्वंकष आहेत असा जो सूर्य तो कृष्ण.

योग्यच अथवा, प्रेम न मोजी क्षुद्र लौकिकाला !
प्रेमातिशयें मला वाटतें विसरुनि जाइल ही
प्रिय नाथाचा आगमनोत्सव हा मंगलदायी.
कविते ! तिजला साह्य तूंच हो, तूंही पण वेडी !
परंतु वेडाविण सुटतिल का हृदयाचीं कोडीं ?
जा जा ! आतां लाजुं नको ग ! पाहुं नको खालीं !
लाजच अथवा— खुलशिल तूंही या मंगल कालीं.
या लज्जेनें कविमानस हें होउनियां लोल,
प्रेमचंचले ! प्रेमच तुजवर मग तें उधळील !
प्रेमावांचुनि फेड कशानें प्रेमाची व्हावी ?
हा बघ सविता प्रेमळ भूतें प्रेमानें नटवी ?

*　　*　　*　　*

हा प्रेमाचा लोंढा वरुनी आला हो आला
भव्य गिरींनो ! निजशिखरांवर झेलुनि घ्या याला.
नील झग्याला वेलबुटी तो तुमच्या चढवील,
'निगा रखो !' येईल तुम्हांला सरदारी डौल !
कविराणीचा स्फूर्तियुक्त मग होतां अभिषेक,
तटस्थ होउनि तुम्हांस बघतिल हे सारे लोक !
सुवासिनींनो, वनदेवींनो, डोला ग डोला !
नटवा, सजवा वनमालेला तुमच्या बहिणीला !
वनमालांनो हळूच हलवा हा हिरवा शेला,
सूत्रधार हा नभीं उदेला, उधळा सुमनांला !
'जय' शब्दानें आळविण्याला लोकनायकाला
नभोवितानीं या धाडुनि ही विहगांची माला !

सरोवराच्या फलकावरतीं स्वर्गाच्या छाया
कुणी रंगवा, कुणी फुलांवर लागा नाचाया !
वेलींच्या वलयांत बसोनी गा कोणी गाणीं,
या झाडावर त्या झाडावर हंसत सुटा कोणी.
कुणीकुणी या नदीबरोबर नाचत जा बाई,
प्रपातांतही बसुन गा कुणी मंजुळ शब्दांहीं.
उषःकालच्या सुगंध, शीतल मृदुल मंद वाता !
विहार कर, ये पराग उधळित अवनीवर आतां !
या कोमल रविकिरणांवरतीं स्वर्ग बसुनि आला,
सख्या मारुता, गाउनि गाणीं झोंके दे त्याला !

*　　*　　*　　*

ऊठ कोकिळा ! भारद्वाजा ? ऊठ गडे, आतां,
मंगल गानीं टाका मोहुनि जगताच्या चित्ता !
सरिते ! गाणें तुझें सुरांमधिं या मिळवीं बाई !
साध्याभोळ्या तुझ्या गायना खंड मुळीं नाहीं !
पिवळीं कुरणें या गाण्यानें हर्षोत्कट झालीं,
गाउं लागलीं, नाचुं लागलीं, वेडावुनि गेलीं !
चराचरांच्या चित्तीं भरलें दिव्याचें गान !
मूर्त गान हें दिव्य तयाला गाणारें कोण ?
दिव्य गायनें, दिव्य शान्तता, दिव्याचे झोत,
वसुंधरेच्या अरुण ओतितो नकळत हृदयांत !
त्या दिव्यानें स्वर्भूमीचें ऐक्य असें केलें;
त्या दिव्यानें मांगल्याचे पाट सुरू झाले !
मंगलता ती दिव्य कवीला टाकी मोहोनी,
वाग्देवीनें सहज गुंफिलीं मग त्याचीं गाणीं.

# २३. हिरवाळ गडे ही हिरवी

हिरवाळ गडे ही हिरवी; आकाश डौल वर मिरवी
रानाचि रोशना गिरवी, हिरवी राई—
चल तेथ साजणी चल जाऊं लवलाही.
पाण्यामधिं भरलें गाणें, न्हाणील सखीला त्यानें;
अस्मान भरुन नादानें, डोलत राही—
मग शुद्ध बुद्ध उरणार कशाची नाहीं
ताऱ्यापरि सुमनें फुललीं त्या कृष्ण कचांवर घाली;
मग रजनी वैभवशाली, दिसशिल पाही.

........ ........ ........ ........

गुलरोशन पायाखालीं, डोईवर हसती वेली,
वनदेवी वैभवशाली, तसल्या ठायीं
वननिर्झर झुळझुळु वाहिल तुझिया पायीं
खांद्यावर कुरळे केश, तव प्रीतिदेवि ते पाश
गुंफीत फुलांनीं त्यास—

* * * *

हृदयांतिल अस्फुट गीती, नयनामधिं नाचुन जाती
ओठावर बोलहि येती;

× × ×

ती दृष्टि हिऱ्याची खाण, भिवयांची काय कमान ?

◎ ◎ ◎

## २४. श्रावणमास

मोहन पिवळ्या रंगाचें मंदपणें गगनीं नाचे,
माळेपरि गुंफियली ती नील वनश्री मजभंवती,
त्यामधुनी सुंदर गंध स्वप्नापरि विचरे मंद,
मोहन पिवळ्या रंगाचें अरुणाचें गगनीं नाचे
मंद चांदणें त्यांत दिसे, विरघळलेलें स्वप्न जसें;
मधुनयनीं जातां जातां वळुनि बघे रजनीमाता
तीच नीलिमा आळसली, आलिंगुनि भुवनीं बसली;
मालेपरि वेष्टित झाली उपवन शोभा भंवताली;
तींत गुंफिले गंध किती, ठायींच्या ठायीं झुलती;
चित्रापरि मंगलताही प्रतिबिंबित हृदयीं होई;
हृन्माझल्या मग देई मंगलता अभिनव देई—
हृन्मोहक मंगलताही शान्ति भरे निस्तुल देहीं
मी माझेपण आळसवीं, स्वप्नापरि वसुधा बसवी.

◎ ◎ ◎

## २५. श्रावणमास

श्रावणमासीं हर्ष मानसी हिरवळ दाटे चोंहिकडे;
क्षणांत येतें सरसर शिरवें[१] क्षणांत फिरुनी ऊन पडे.

---

१. थोडाच वेळ पडलेला जोराचा पाऊस.

वरती बघतां इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे,
मंगल तोरण काय बांधिलें नभोमंडपीं कुणि भासे !

झालासा सूर्यास्त वाटतो सांज अहाहा ! तों उघडे
तरुशिखरांवर, उंच घरांवर पिवळें पिवळें ऊन पडे

उठती वरतीं जलदांवरतीं अनंत संध्याराग पहा;
सर्व नभावर होय रेखिलें सुंदरतेचें रूप महा.

बलाकमाला उडतां भासे कल्पसुमांची माळचि ते,
उतरुनि येती अवनीवरती ग्रहगोलचि कीं एकमतें

फडफड करुनी भिजले अपुले पंख पांखरें सांवरिती
सुंदर हरिणी हिरव्या कुरणीं निजबाळांसह बागडती

खिल्लारें हीं चरती रानीं, गोपहि गाणीं गात फिरे.
मंजुळ पावा गाय तयाचा श्रावणमहिमा एकसुरें

सुवर्णचम्पक फुलला, विपिनीं रम्य केवडा दरवळला;
पारिजातही बघतां भामारोष मनींचा मावळला !

सुंदर परडी घेउनि हातीं पुरोपकंठीं शुद्धमती
सुंदर बाला या फुलमाला रम्य फुलें-पत्री खुडती,

देवदर्शना निघती ललना, हर्ष माइना हृदयांत,
वदनीं त्यांच्या वाचुनि घ्यावें श्रावण महिन्याचें गीत !

◎ ◎ ◎

# २६. पाऊस

थबथबली, ओथंबुनि खालीं आली,  
जलदाली मज दिसली सायंकालीं.  
रंगहि ते नच यती वर्णायातें !  
सुंदरता मम त्यांची भुलवी चित्ता.  
व्योमपटीं जलदांची झाली दाटी;  
कृष्ण कुणी काजळिच्या शिखरावाणी,  
नील कुणी इन्द्रमण्यांच्या कान्तिहुनि,  
गोकर्णी मिश्र जांभळे तसे कुणी;  
तेजांत धूमाचे उटती झोत,  
चकमकती पांडुरही त्यापरिस किती !  
जणुं ठेवी माल भरुनि वर्षादेवी  
आणुनिया दिगंतराहुनि या ठाया !  
कोठारी यावरला दिसतो न परी.  
पाहुनि तें मग मारुत शिरतो तेथें;  
न्याहळुनी नाहिं बघत दुसरें कोणी  
मग हातें अस्ताव्यस्त करी त्यातें.  
मधु मोतीं भूवरतीं भरभर ओती !

अपूर्ण

◎ ◎ ◎

## २७. तडाग असतों तर—

विमळ चंद्रिका क्षितिजावरतीं,
तरळ तारका चमचम करिती,
दिव्य लोकिंची रुचिरा शान्ती,
तुडुंब भरली गगनांत; १

ग्रहाग्रहावर भरलें तेज,
तेजाची लयलूटच आज,
रात्रीचा शेवटला साज
देव करीती जणुं स्वर्गांत २

तेज दाटलें शान्ति दाटली,
सौंदर्याची वेलहि फुलली;
प्रेमाच्या नव पुष्पीं नटली
कविच्या हृदयांत. ३

मंद तेज अवनीवरते तें.
मधु एकान्ता वाढवितें तें.
त्यांतहि वारा हळूच हाले
निर्भर रुचिरानंदांत ४

या समयीं जर तडाग असतों;
रम्य दिव्य तें रेखित बसतों;
हीच शान्तता अशीच धरितों
शुभ्र जलाच्या हृदयांत ५

[ सौंदर्यानें जीवन बाणे,
प्रेमजागृती हो मग त्यानें,
लहरीवर हें लिहुनी गाणें,
मग दिवसा बसतों गात. ६

चित्रकराला कविरायाला,
अशक्य जें कां उठवायाला,
सौंदर्याच्या नव नव लीला,
त्या उठत्या मम हृदयांत ] ७

◎ ◎ ◎

## २८. गवताचें गाणें

परस्पराकंठीं हात घालुनियां बसलों गात
ऐको ना ऐको कोणी हीं अमुचीं वेडीं गाणीं
उच्छृंखल ओढा चाले, उच्छृंखल मारुत डोले,
उच्छृंखल अभ्रें झालीं, उच्छृंखल अमुची बोली.
अर्थ तयाचा कुणा जरी कळे न, परवा काय तरी?
ज्ञान असो अज्ञानच हें गोड अम्हां अमुचें आहे.

* * * *

स्वर्गांतुनि आली आई, मंजुरवें आम्हां बाही.
ती वदली 'लाला लाला' या या रे नाचायाला.

वारापाउस ऊन गडे नाचनाचती स्वैर पुढें.
पंख पांचुचे तुम्हीहि ते या उडवित येथें तेथें
या जननीवचनीं धालों, नाचत वर आलों आलों.

*　　*　　*　　*

पवनाच्या आन्दोलांत देवदूत होते गात.
आलिंगुनि आम्हांला तें हालविती गद्‌गद हातें.
परस्परां चुंवित जावें, नाचावें, मंजुळ गावें;
झोंक्यावर झोंके घ्यावे, सृष्टीशीं समरस व्हावें.

*　　*　　*　　*

उंच कड्यावरतीं कोणी प्रेमाचीं बसवी ठाणीं.
खोल दरी अंधारांत तेथेंही कोणी झुलत,
एक परी अमुचें गीत. सर्वांचें एकच चित्त.
द्वैताला ठावच नाहीं, प्रेम दिसे ज्या त्या ठायीं.
प्रेम बनुन जीवेंभावें प्रेमाला शोधित जावें.

◎ ◎ ◎

## २९. मेघांचा कापूस

फिकट निळीनें रंगविलेला कापुस मेघांचा,
वरुनि कुणी गुलजार फिरविला हात कुसुंब्याचा;
त्यांतहि हंसली मंदपणें ती चंद्रकला राणी;
कडेकडेच्या मेघांवर ये मोत्यांचें पाणी. १

इंद्रनिळाचा रंग बहरवी गिरिच्या अंगाला,
मधुन जळाची शुभ्र शोभते ती मोहनमाला;
चौंबाजूला थाट दाटला हा हिरवाळीचा,
सृष्टिसतीनें साज घेतला पाउसकाळींचा. २

यशस्विनी सौभाग्यदेवता माता जगताची;
घोर घनघटा* भूलिंगाला प्रक्षाळुनि गेल्या—

अपूर्ण

◎ ◎ ◎

## ३०. शारदीय सौंदर्यदेवता

प्रभातकालीं काव्यतारका सोज्ज्वल गगनांत
उदयाचलिं परिधान करुनिया पीतांबर येत.
मुगुट कळ्यांचा शिरीं, उषेचें सिंहासन केलें,
हालवीत कचभार सृष्टिचें उत्थापन बोले.

प्रसन्न पवनें जलदजाल तें अपसारुनि नेलें,
तारामंडळ विश्वविभव हें आकाशीं ठेलें.
कणाकणांनीं शुद्धचेतना भरुनी अवकाश
सर्व धुवुनि हा निवळ साजिरा रंग भरे त्यास.

---

* मेघसमूह.

पिकलीं शेतें मंद वायुनें आन्दोलन घेतीं
सौंदर्याची मूर्त देवता वनमाला होती.
निर्झरिणी या मुक्तमण्यांचें घेउनि भाण्डार
विमल सैकतामधुन हालतां चमचमती फार.

हा कुरणांचा थाट दाटला वर्णावा कोणीं ?
शारदीय सौंदर्यदेवता अवतरली भुवनीं.
आर्यभूमिच्या दिव्य पुरातन या देवी दोन
शरद्देवता, उषादेवता झाल्या अवतीर्ण.

भूवरचा संसार दाविते सुफलित ही बाला;
तसा स्वर्गसंसार आमुचा दिव्य तिनें केला.
एक गातसे मानवतेचें मधुमंगल गाणें;
देवपणाचे दिव्यमंत्र परि धरिले दुसरीनें.

◎ ◎ ◎

## २१. औदुंबर

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेउन
निळासांवळा झरा वाहतो बेटाबेटांतुन.
चार घरांचें गांव चिमुकलें पैल टेकडीकडे;
शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गरदी पुढें.
पायवाट पांढरी तयांतुनि अडवीतिडवी पडे;
हिरव्या कुरणांमधुन चालली काळ्या डोहाकडे.
झांकळुनी जळ गोड कालिमा पसरी लाटांवर;
पाय टाकुनी जळांत बसला असला औदुंबर

◎ ◎ ◎

## ३२. खेड्यांतील रात्र

त्या उजाड माळावरती
बुरुजाच्या पडल्या भिंती;
ओसाड देवळापुढतीं
वडाचा पार—अंधार दाटला तेथ भरे भरपूर.
ओढ्यांत भालु ओरडती,
वाऱ्यांत भुतें बडबडती,
डोहांत सावल्या पडती,
काळ्या शार—त्या गर्द जाळिमधिं रात देत हुंकार.
भररानीं काकस्थानीं
उठतात ज्वाळ भडकोनी,
अस्मान मिळालें धरणीं,
आर ना पार—अवकाळ रात्रिचा प्रहर घुमे तो घोर.

◎ ◎ ◎

## ३३. अंगाई—गीतें

### १

बोल बाई बोल ग। तुझ्या बोलाचें काय वानुं मोल ग।
डोल बाई डोल ग। जाईजुईचीं लाख फुलें तोल ग।
हांस बाई हांस ग। माझ्या अंगणीं माणिकांची रास ग।
नीज बाई नीज ग। गाई अंगाई काऊचीऊ तूज ग।

२

या बाई या। बकुळिच्या झाडाखालीं फुलें वेंचूं या।
उन पडलें। पानफुल दिसे कसें गोडगोडुलें।
गोडगोडुलें। मोतियाचे दाणे कोणीं खालीं पाडिले ?।
रान हालले। पहांटेला शुकदेव गाणें बोलले।

◎ ◎ ◎

## ३४. रागोबा आला

१

रागोबा आला, आला,
गडे आमुच्या ताईला,
फुगले ग फुगले गाल,
फुल झालें माझें लाल.
धांवुनि ही आली, आली;
गंगायमुनेसह खालीं.

२

ताई बाई सोनुकले,
तूं तल माझें फूल गले !
जा गे सगळ्या दूर चला.
राग फुलाला या आला

गेला गेला राग अहा !
हंसली ताई, पहा पहा !

३

हंसली ग हंसली ताई,
हें फूलहि हंसलें बाई,
उनपाउस हीं एक गडे
एक ताईचें हंसें-रडें
राग ताइचा हारवला;
चला चला खेळायाला.

१६९५८

७३९४२ काव्य
१९५२ ५।३।७१

## ३५. बीज

आहे बीज म्हणोनि आज तुजला चंद्रा ! बघोनी मनीं
माझीही भगिनी असेल नयनें माझ्याकडे लावुनी,
आला कंठ असेल दाटुनि तिचा, नाना मनीं भावना
येवोनी असतील त्या करितही दुःखी तियेच्या मना.
ताई, भाउ तुझाहि त्याच बघतो चंद्राकडे या क्षणीं;
आणोनी तव मूर्ति चित्तफलकीं उद्विग्न तोही मनीं.
कालें घोर दरी जरी पसरिली प्रेमामधें दुःखदा
प्रीतीनें परि एकरूपच असूं मी तूं पहा सर्वदा

घेवोनी करिं दीप, अक्षत तुवां चंद्राकडे फेकुनी,
मारू आज कुठें असेल म्हणतां जें होय तूझ्या मनीं,
तें येथें; परि गे, क्षणीं मम मनीं नेत्रांतुनी थांवती
हे अश्रू तुज तेच घालित असें ओवाळणी संप्रती

◎ ◎ ◎

## ३६. चिमणीचा घरटा चोरिस गेला

चिंव् चिंव् चिंव् रे। तिकडे तूं कोण रे?

'कावळे दादा कावळे दादा, माझा घरटा नेलास, बाबा?'
'नाहीं ग बाई, चिमुताई, तुझा घरटा कोण नेई?'

'कपिला मावशी, कपिला मावशी, घरटें मोडून तूं कां जाशी?'
'नाहीं ग बाई, मोडीन कशी? मऊ गवत दिलें तुशीं'

'कोंबडी ताई, कोंबडी ताई, माझा घरटा पाहिलास बाई?'
'नाहीं ग बाई, मुळीं नाहीं तुझा माझा संबंध कांहीं'

'आतां बाई पाहूं कुठें? जाऊं कुठें? राहूं कुठें?'
'गरीब बिचाऱ्या चिमणीला सगळे टपले छळण्याला.'

चिमणीला मग पोपट बोले 'कां गे तुझे डोळे ओले?'
'काय सांगूं बाबा, तुला? माझा घरटा कोणी नेला?'

'चिमूताई, चिमूताई, माझ्या पिंजऱ्यांत येतेस, बाई?'
'पिंजरा किती छान माझा! सगळा शीण जाईल तुझा'

‘जळो तुझा पिंजरा मेला! त्याचें नांव नको मला!’
‘राहीन मी घरट्याविना!’ चिमणी उडून गेली राना.

◎ ◎ ◎

## ३७. संतांचा अनुवाद

देऊळींचा देव मेला विश्वीं विश्वरूप झाला ॥
देव झाला शतखंड तेणें कोंदलें ब्रह्माण्ड ॥
क्रियाकर्मीं देव नाहीं देव कीर्तनीं न राही ॥
देव नाहीं ज्ञानामधीं ती तों देवाची समाधी ॥
सत्य देव विश्वान्तरीं हिंडतसे दारोदारीं ॥ १ ॥

एक देव कष्ट करी एक उघडा शरीरीं ॥
एक पोटासाठीं फिरे एक भुकेलेला मरे ॥
एक देव झाला रोगी देहदु:खी दु:ख भोगी ॥
एका आपंगीता नाहीं देव दीनवाणी पाही ॥
ऐसे देव नानापरी हिंडताति दारोदारीं ॥ २ ॥

देवें तुम्हां दिली आई तैशी ब्रह्माण्डीं रमाई ॥
देवें तुम्हां दिली तात तैसा माधव जगांत ॥
देव तुम्हां पाठींपोटीं तैसे देव घटीं घटीं ॥
नका पाहूं त्यांची धूळ देव माझे अमंगळ ॥
धरा कारुण्य अंतरीं सत्य देव व्हावा जरी ॥ ३ ॥

नको पुण्याईचें ओझें  सर्व म्हणा ‘ माझें माझें ’ ॥
नको ठेवूं अहंकार  करा साह्य थोडे फार ॥
नका लाजे देऊं थारा  सर्वेश्वर आणा घरा ॥
नको संपत्तीची चाड  नको कीर्तीचेंही वेड ॥
दारीं पडे देवराणा  तया मंदिरांत आणा ॥ ४ ॥

माझें हृदयमंदिर  माझ्या देवाजीचें घर ॥
माझे तीस कोटी देव  नको अद्वैताचें नांव ॥
जळो माझी दोषदृष्टी  जीव तुटो तयांसाठीं ॥
हातें घडो त्याची सेवा  निदिध्यास लागो जीवा ॥
म्हणे रमाईचें बाळ  हेचि आप्त सर्वकाळ ॥ ५ ॥

◎ ◎ ◎

## ३८. धर्मवीर

आद्य ऋषींनीं जी केली  तेजाची पूजा पहिली,
ती करणें ज्यां ज्यां लोकां  ते सारे सावध ऐका !
गर्जू द्या हिंदिस्तान  ऐकुनि हें माझें गान,
धर्मवीर हिंदिस्तान,  देवाचा कलिजा प्राण,
बाळ तयाचे जे कोणी,  धर्मवीर हिंदिस्तानीं,
ते सारे सावध ऐका,  सत्यधर्म कथितों लोकां–
ज्या तेजामध्यें मिनले  आद्य ऋषी जाउनि सगळे.
तेंच तेज हृदयीं भिनतां,  आद्य ऋषी बघतां बघतां–

अवतरुनी तुमच्या हृदयीं स्फूर्तिमंत्र गातिल कांहीं !
जडतेचें लागुनि भूत सृष्टि करी हळहळ येथ.
उणीव तेजाचीच जगीं भासतसे जागोजागीं.
क्षुद्र तुम्ही बनला का रे ! मायेनें भुललां सारे !
तेजाला अवमानुनियां अंधारीं मरतां वाया.
मरणाचें काढुनि मरण घ्या मिळवा जीवंतपण !
वाट करा तेजाला रे, फोडुनि हीं कारागारें
प्रकाश द्या सृष्टीला तो, जो तुम्हांवरतीं येतो !
धर्माचारांची माती कां धरुनी बसलां हातीं ?
मातीवर चढतें कीट, सत्य धरा ध्यानीं नीट.
सत्य सदा निर्भेळच तें, आज उद्यां येथें तेथें.
रूढींचें चढलें कीट धर्मावर, परजा नीट !
सत्याची समशेर धरा, असत्य सारें पार चिरा !
आद्यऋषींचा सद्धर्म हेंच मात्र त्याचें वर्म—
सत्य प्रस्थापित व्हावें, देहमनें जीवेंभावें.
जडतेची काढा कीट, तेजाची उजळा वाट.
धर्मपताका घ्या हातीं, उदार व्हा देहावरतीं ![1]
अहंकार जिरला नाहीं, मोह पुरा विरला नाहीं—
धर्माच्या वाफा नुसत्या दवडितसां भलत्यासलत्या !
तोंडावर बसली माशी शक्ति न ती उडवायासी !
विषयांचा नयनीं धूर, धर्म मात्र तुमचा थोर !
दिडकीला सतरा पापें धर्म धर्म म्हणणें सोपें !
ब्रह्मचर्य तुमचें थोर, चवदावे वर्षीं पोर !
देहाचे बनलां दास; मायेचा बसला फांस,

---

१. प्राणांवरतीं.

स्वार्थानें वेडे झालां, धर्माचा मुडदा केला !
धर्म नव्हे संध्यास्नान, धर्म नव्हे आसनध्यान;
तत्त्वज्ञानाचे बोल, तें धर्मावरचें फोल !
अंतरंगीं तुमच्या वसतो, आचरणीं तुमच्या दिसतो,
धर्म खरा तुमचा तोच, बाकींचे शाब्दिक नाच !
वर्णाया सुंदर फार धर्म नव्हे नाजुक नार.
जीवाचें द्यावें मोल, धर्म तेधवां समजेल.
तोंवरि या वाफा सोडा, 'धर्म' म्हणा, छाती झोडा—
अधःपात टळणें नाहीं, धर्म खरा कळणें नाहीं !
रूढि अशी कोणी दावा, बदल[1] जिला नाहीं ठावा.
नामरूप बदलायाचें[2] ! चंचलता जगतीं नाचे ![3]
ही वरची[4] पोपटपंची, अजुनि किती घोकायाची ?
आंत चला उघडा डोळे, मोहाचे सोडा चाळे;
परात्पराची कांस धरा, तेजाची समशेर करा !
अंधकार तोडा मोडा; धर्म खरा[5] पदरीं जोडा.
बाधक ते तोडुनि बंध, सत्याचा मिळवा छंद
भिऊं नका कलिकाळाला; धर्मवीर ! जय जय बोला !
अग्नीनें जळणें नाहीं, शस्त्रानें तुटणें नाहीं;
पाण्यानें बुडणें नाहीं, वाऱ्यानें उडणें नाहीं.
दिक्कालापरते तुम्ही, विश्वाचे अवघ्या स्वामी !
धर्म तुम्हांसाठीं बनला, धर्म तुम्ही तुमचा केला.
सत्याला नांदायाला, देव जगीं स्थापायाला;
तेज जनीं पसरायाला, धर्म तुम्ही तुमचा केला.
देवाला विसरुनि कां रे, या पोकळ धर्माचारें

१. मृत्यू. २ हीं मरणाचीं. ३ साची. ४ जगताची. ५ सत्यधर्म.

सत्याचा अपमान करा ? अधःपात हा खराखुरा !
सत्य खरें स्थिरलें जेथें, तेज खरें मुरलें जेथें
देव खरा विलसे जेथें, धर्म खरा अमुचा तेथें.
सत्यासाठीं नित्य नवे धर्मनियम आम्हांस हवे.
तेजाचीं आम्ही बाळें, सत्यरूप आम्ही सगळे.
धर्मवीर हिंदिस्तान,[1] देवाचा कलिजा प्राण !
बाळ तयाचे जे कोणी धर्मवीर हिंदिस्तानीं,
स्वार्थाला देउनि लाथ, तेजाचा धरुनी हात,
खरे विरागी धीरवर, गांभीर्याचे महीधर,
दिव्य चिंतनीं रमणार, स्वयंपणें विश्वाकार.
विश्वकुटुंबी विश्वधनी, तेच खरे हिंदिस्तानी,[2]
धर्मवीर हिंदिस्तान, देवाचा कलिजा प्राण !
सत्य बोल हे करा उठा– धर्मवीर ! अद्वैत लुटा !
शुद्ध सत्य हृदयांत धरा, तेजाचा उपदेश करा !
मायामय कारागारा, तोडा मोडा पार करा !
आचारांची प्रौढि[3] नसे, सत्य ठसावें करा असें.
धर्मपताका घ्या हातीं, व्हा केवळ तेजोमूर्ती.
व्हा सगळ्या विश्वां नेते,[4] धर्मतत्त्व अमुचें हें तें.
सत्यधर्म निरहंकार, सर्वांचें समता सार;
सत्यधर्म जगतीं प्रेम. चोंहिंकडे आत्माराम.
स्वार्थाचा नुरला लेश, देहाचा गळला पाश,
मरणाला आलें मरण, सत्यधर्म जीवंतपण !
सत्यधर्म कळणें नाहीं, जोंवर ही जडता राही;
धर्माचें तोंवर सोंग, जा मिरवा नुसतें ढोंग !

---

१ हिंदुस्तान. २ हिंदुस्तानी. ३ रूढि. ४ सगळ्या विश्वाचे नेते.

मेलेल्या सजवा रूढी, गात बसा त्यांची प्रौढी !
शूद्रांचे सोसा शाप देशावर लादा पाप !
विधवांना रडतचि ठेवा धर्माच्या मिरवा नांवा !
कोणि असो कसली जात, आम्ही तर पसरूं हात[१] !
देशाचाही बंध नसे, विश्व सर्व अमुचेंच असे.
चोहिंकडे आत्माराम सर्वांवर अमुचें प्रेम.
खाणारे आम्ही मोतीं राजहंस भूमीवरतीं.
आद्य ऋषींनीं सांगितलें, संतांनीं अमुच्या कथिलें.
धर्मतत्त्व हें खरें खरें आम्हांला कळलें सारें !
धर्मवीर भूमीवरतीं, धर्मतत्त्व अमुच्या हातीं;
देवाचे आम्ही प्राण, आम्हांला भिवविल कोण ?
काळाचे आम्ही[२] काळ, काळदिशा अमुचा खेळ !
तेजानें भरलीं अंगें ! नेउं जगा तेजामागें !
हिमगिरिचा काढा कांटा, एकिकडे सागर लोटा;
वाट करा आम्हांला रे, का मरतां व्यर्थचि सारे ?
तेजाचे आम्ही दास, सत्याची धरिली कांस;
देवांला फिरवूं मागें दाखवितां कसलीं[३] सोंगें,

---

ही कविता बालकवींच्या हयातीत मासिक मनोरंजनात जशी प्रसिद्ध झाली तशीच येथे प्रसिद्ध केली आहे. रा. निफाडकर यांनी संपादिलेल्या बालकवींच्या कविता-संग्रहात मूळातील ' हिंदिस्तान 'बद्दल प्रत्येक ठिकाणी ' हिंदुस्थान ' असे छापले आहे आणि इतरही काही फेरफार केले आहेत व वरती मूळाबरहुकूम ही कविता छापणाऱ्या गोविंदाग्रज मंडळाच्या कवनगुच्छाच्या संपादकास 'हिंदुस्थान'चे ' हिंदिस्तान ' असा अनधिकृत ( ? ) फरक केल्याबद्दल अनेकवार वृथा दूषण दिले आहे. —संपादक.

१ कोणि असो कुठली पाहूं का ? आम्ही पसरूं बाहू. २ कवि हे. ३ कां हीं.

देहाची परवा नाहीं, नांवाची परवा[1] नाहीं;
धर्मवीर भूमीवरतीं त्या अमुची असली गीती !

◎ ◎ ◎

## ३९. जीर्ण दुर्ग

दुर्ग भयंकर जीर्ण पसरला पुढतीं, जो[2] गतकालीं
शूर साहसी नरसिंहांनीं अपुली वसती केली.

कड्याकड्यांमधिं घुमुनि नर्मदा गात यशोमय गीतें
सांगत होती सर्व देशभर सद्यःकर्तव्यातें.

रंगमहालीं शेज फुलांची याच गडावर झाली,
स्वातंत्र्यास्तव अग्नि भडकला– राख तयाची केली.

तरवारीची धार देवता हीच जयांची एक,
ब्रीद जयाचें सदा तियेला रुधिराचा अभिषेक.

जीव नव्हे संसार ओपिला स्वातंत्र्यास्तव ज्यांनीं,
त्या वीरांचा वास जाहला गतकालीं या स्थानीं.

आतां कोणी क्षुद्र पुजारी देविस पूजायातें
घालित बसतो कुंकुमपूरित चंदन अपुल्या हस्तें

---

१ कीर्तीची चाडहि नाहीं. २. पुढें, जेथ गतकालीं.

आणि पिवोनी भांग दुखारी झिंगत वदतो कांहीं
पूर्वकथा निर्विकार चित्तें....हर्षित दोन पयांहीं

हे काळाचे खेळ, कुठेंही असेच चालायाचे,
त्यास कशाला परि आम्हांला कांहिं न वाटे त्याचें

एक खुराडें— भाड्याचें तें— राहूं त्यांत खुशाल
क्षुद्र जिवांना अम्हां कशाला असले रंगमहाल !

◎ ◎ ◎

## ४०. वैष्णव-धर्म

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म
संतजनीं वर्म सांगीतलें.
तयांचें भजन घडो अहर्निश
माझ्या मीपणास आग लागो.
पर-उपकारीं वेंचो सर्व शक्ति
हेचि माझी भक्ति पामराची.
सर्वही आघात येवो मजवरी
सुखी राहो परी देव माझा.
नको स्वर्गवास जनधनकीर्ति
प्रेमाची संपत्ति प्रेमरूप.

◎ ◎ ◎

# ४१. प्रीति हवी तर

प्रीति हवी तर जीव आधि कर अपुला कुरबान,
प्रीति हवी तर तळहातावर घे कापुनि मान !

तलवारीची धार नागिणी लसलसती प्रीत,
याद ठेव अंगार जगाला लाविल निमिषांत !

प्रीति निर्मिली तुला वाटतें का दुबळ्यासाठीं ?
प्रीतिदेवि जगदेकवीर जो जाय तयापाठीं !

नव्हे प्रीतिला रंग लाविला लाल गुलाबांचा,
परि रुधिराचा, धडधडणाऱ्या जळत्या जीवाचा.

गुलगुल बोले प्रीति काय ती ? काय महालांत ?
प्रीति बोलते काळ घालितां कलिजाला हात !

स्त्रैणपणाच्या चार भावना नच पचती प्याला
हीन जिवानें घेउं नये त्या हा[1] जहरी प्याला !

सह्य जिवाला होय जाहला जरि विद्युत्पात,
परी प्रीतिचा घात भयंकर दुसरा कल्पान्त !

जीवंतपणीं मरण घेउनी फिरणें जगतांत;
सांठविली ब्रह्माण्डदाहिनी दाहकता यांत !

◎ ◎ ◎

---

१. त्या जहरी प्याल्याला.

# ४२. प्रीति व कर्तव्य

प्रीतीचा पथ हा भयाकुल दिसे सौंदर्य-सौदामिनी
डोळ्यांना क्षण तेज दाखवुनि या अस्तंगता हो क्षणीं;
चित्तांमाजि विकारसिंधु खवळे चांचल्य जीवीं भरे,
नेत्रांतून उदास तेज जगतीं वेड्यापरी वावरे, १

वरतीं हा ग्रहगोल शान्त, वरतीं हा चंद्रमा मंगल,
तैसें नील गभीर हें गगनही निश्चित उर्वीतल.
पाहोनी असला विरोध जगतीं चिद्वृत्ति हो घाबरी.
देवा पाप तरी असेल कुठचें ? मी खिन्न कां यापरी ? २

कोठें जाउं कसें करूं मज विभो, कर्तव्य कैसें कळे ?
आलें तें समजूनही तरि पुन्हां हें चित्त कैसें वळे ?
माझ्यामाजिंच शत्रु घोर बसले माझा कराया वध !
कर्तव्यास बघूं टपून बसुं कीं यांच्यावरी सावध ? ३

गेला तास निघूनिया दिवसही याच क्रमें जातसे,
गेले मासहि, वर्षही निघुनिया, सार्थक्य कांहीं नसे;
खा, पी, नीज पुन्हा असेंच करितां आनंद नाहीं पुन्हा;
चित्तामाजि सदैव टोचित वसे कर्तव्य ही भावना. ४

डोकें जाय विचार एक करुनी चित्तीं दुजें तोंच ये;
चित्ताचा पगडा विशेष; बळ तें बुद्धीबळाला न ये.
त्या योगें परि जीव हा निशिदिनीं ठेंचाळतो सारखा;
साऱ्या हाय ! सुखास होउन बसें मी माझिया पारखा ! ५

अपूर्ण

◎ ◎ ◎

# ४३. प्रेमाचें अल्लडतेचें चित्र

चंद्रकला जलदामधुनी–धांवतसे भरभर गगनीं;
स्वच्छ चांदणें क्षण येतें–क्षण सर्वहि अंधुक होतें;
क्षण उल्हासा हो भरती–उदासता तों ये वरतीं.
पाहुनियां चंचलतेतें–आठवलें हृदयीं मातें;
प्रेमाच्या अल्लडतेचे–ते दिन हसण्यारुसण्याचे
चित्तचंद्रिका प्रीति खरी–धांवत होती हृदंतरीं
तारुण्याचें दृश्य तदा–हंसलें रुसलें कितीकदा।
चंद्रकला गगनीं विलसे–जलदांमधुनी धांवतसे;
चित्तचंद्रिका हाय परी–न दिसे मजला हृदंतरीं.
म्हणुनि असा पडुनी येथें–शून्य मनानें गगनातें
अवलोकित मी गात असें–जड हृदयाचें गीत असें.

◎ ◎ ◎

# ४४. दिव्य आणि प्रीति

## पद

दिव्य जिथें, प्रीती तेथें;
आलिंगुनि अन्योन्यातें.
प्रीति तुला जर हवी खरी?
विलीन हो दिव्यांत तरी.

विश्व फुलूं दे,
चित्त भुलूं दे,
जाऊं दे झरझर त्याला
दिव्याला कवळायाला. १

मर्यादेच्या अंधारीं
प्रीति वसे का कधीं तरी ?
अफाट जगताचें रत्न,
प्रीतीला अडवी कोण ?
दिव्य ज्योति
स्फुरतां चित्तीं
विश्वें हीं स्फुरती बाई !
प्रीति-दिव्य एके ठायीं २
विशाल ब्रह्माण्डापरती
प्रेमवल्लि चढवी वरतीं,
तिचीं फळें, तिचिया शाखा
व्यापूं दे तेजोलोका.
तीच गडे ती,
दिव्यप्रीती,
दुःखदायिनी दुसरी ती
स्वार्थोद्भव लहरी नुसती ! ३
चोंहिकडुनि निज हृदयांत
दिव्याचे उधळित झोत
प्रीतीची चमके स्वारी
दिव्यांतुन पाझरणारी.

दिव्य एक तें,
प्रीती जेथें;
दिव्यरूप जी ती प्रीति
दुसरी ती केवळ भ्रान्ति ! ४
आत्म्याची जी पुरोगती,
नांव तिचें प्रीति प्रीति.
विश्वात्म्याचें मधुहास,
दिव्य जगीं वदती त्यास.
वेडी गीतें
अखंड गाते,
प्रीति लुब्ध दिव्यांवरतें,
प्रीतिबद्ध दिव्यहि हो तें. ५
दिव्यप्रीतीसंगमता
होऊं दे हृदयीं आतां.
स्वर्भूची संगमता ती
मग येइल उतरुन चित्तीं.
स्वर्गधरा ती
प्रीति–प्रीति
मी, तूं, ही अवघी जगती,
प्रीतीनें न्हालीं नुसतीं. ६

◎ ◎ ◎

## ४५. प्रेमाचें गाणें

प्रेमावांचुनि सर्व सुनें;
जग भासे बापुडवाणें;
मोठ्या उल्हासें म्हणुनी
प्रेमाचीं रचितों गाणीं.
आकाशीं तें,
जगीं विलसतें,
दिशांत हंसतें;
विश्व वेष्टिलें प्रेमानें;
प्रेमावांचुनि सर्व सुनें १

संध्याराग म्हणो कोणी–
यातें मी अक्षय मानीं.
म्हणो कोणी 'ती भूल खरी'
नाहीं मी म्हणणार परी.
सौख्य मावळे,
दुःख कोसळे,
उदास सगळें
प्रेम वाढते परी दुणें;
प्रेमावांचुनि सर्व सुनें २

उच्चंबळे जें तुझे मनीं,
गुंग तुला टाकी करुनी,
तेंच खेळतें दिनरजनीं,
मित्रा, माझ्या नित्य मनीं.
त्याविण जगतीं
–दुःखें, खंती–
भरलीं भाती.
व्यर्थ त्याविणें हो जगणें;
प्रेमावांचुनि सर्व सुनें ३

प्रेम कुठें? तें रानभर;
प्रेम खेळतें फुलांवर
गातें मंजुळ तें गाणें
जगतीं साऱ्या दिनरजनी!
कुणी बांधिलें
कुणी रोधिलें
नाहीं अडलें
तें फिरतें स्वच्छंदानें
प्रेमावांचुनि सर्व सुनें ४

प्रेमावांचुनि रान घर,
जाच मना दे घोरतर!
प्रेम जिथें तें कान्तार!
उघडें स्वर्गाचें द्वार!
ये तर! गगनीं
जगीं हिंडुनी
आणुं शोधुनी,
त्यास आळवूं ये गाणें,
प्रेमावांचुनि सर्व सुनें ५

◎ ◎ ◎

## ४६. दोष व प्रीति

दोष असती जगतांत किती याचें
नसे मजला सामर्थ्य गणायाचें;
दोष माझा परि ह्याच मला वाटे,
दोष बघतां सत्प्रेम कसें आटे ?
दोष असती जगतांत, असायाचे;
मला त्याशीं तरि काय करायाचें ?
प्रेमगंगेच्या शुद्धसिंचनेंहि
शुद्ध होइ न जो, दोष असा नाहीं;
गड्या पूर्णा ! मज आस तुझी नाहीं.
सख्या न्यूना ! ये मार मिठी देहीं.
प्रीति माझ्या हृदयांत करी वास.
न्यूनतेला पूर्णत्व द्यावयास !

◎ ◎ ◎

## ४७. भटकणें

सर्व जगानें मला टाकिलें म्हणून धरिलें तुला;
तुझ्याच भजनीं तुझ्याच चरणीं जीवभाव वाहिला.
तुझ्याजवळ मी कशी देवते, प्रेमयाचना करूं ?
हा गवताहुनि दीन दास तव, दूर नको परि धरूं.
थोर थोर नर नित्य वांछिती तुझें कृपावीक्षण,
तव चरणाच्या धूळिं लोभलें दुबळें माझें मन.

तव हाताचा गोड जाहला स्पर्श मला जेधवां,
तुझिया भजनीं मात्र वाहिलें तेंव्हांपासुनि जिवा.
गेला भडकुन राही जाउन वनस्मशानीं जरी,
या गगनाची शपथ, लोचनीं तुझीच मूर्ती परी.
निराश झालों बघुनि सभोंतीं पर्वतमाला जरी,
रडत बैसलों बाळपणींही तुझ्याच नांवें तरी.
परदेशामधिं दिवस कंठिले, सौख्य सर्व टाकिलें;
आशा कीं मज दिसतिल कोठें रम्य तुझीं पाउलें.
मैदानावर खुळ्या पिशापरि भटकत फिरलों किती !
किती लोटली रात्र तयाची नाहीं हृदया क्षिती.
किति हृदयाची तीव्र वेदना तुजसाठीं सोशितों !
परि अजुनी तूं दूर किती वद पथ दुःखद वाटतो.

अपूर्ण

◎ ◎ ◎

## ४८. मोहिनी

[ ताराराणी ]

(या पद्यपंक्ती एखाद्या खंडकाव्याच्या आरंभीच्या असाव्यात. कथा-नायिकेवरून नाव द्यावे, तर ते या पद्यपंक्तींत आढळत नाही. चवदाव्या ओळीतील ‘ मोहिनी ’ हे तर त्या कथानायिकेचे नाव नसेल ना ? —संपादक )

या शुभ्र विरल अभ्रांचें । शशिभंवतीं नर्तन चाले,
गंभीर धवळली रजनी । बेभान पवनही डोले;

तंद्रींतच अर्धीसुर्धी । लुकलुकते ताराराणी,
ये झुंजुमुंजु[1] तेजानें । पूर्वेवर पिवळें पाणी;
निस्पंद मंद घटिका ती । अंधुकता धुंद भरीत,
ब्रह्माण्डमंदिरीं गाई । सौभाग्यसुभग संगीत.

*　　*　　*　　*

निद्रिस्त नील वनमाला । निद्रिस्त सरोवर खालीं,
वर मूक मोहनें जैसीं । शशिकिरणें विरघळलेलीं;
इवलाच अधर हलवून । जल मंद सोडितें श्वास;
इवलाच वेल लववून । ये नीज पुन्हां पवनास.
निश्चिंत शान्ति-देवीचा । किंचितसा अंचल हाले;
रोमांच कपोलीं भरती । कुंजांत कोकिला बोले.

*　　*　　*　　*

घननील लतालवयांत । हिमधवल शिलातलभागीं
चमकून मोहिनी झाली । जणुं कुंजगुंजनें जागी.
सौंदर्यभरीं भरलेलें । तारुण्य चढे रंगास,
अलवार कोंवळें अंग । जशि काय फुलांची मूस.
धरि आम्रमंजरी कानीं । हातांत जुईची वेणी,
कंठांत मालतीमाला । माधवीच भासे बाला.

*　　*　　*　　*

मदनाची मंगलमाया । नटनाच करी हृदयांत;
स्फुरतात कल्पनातीत । रणकार सुखाचे त्यांत.
किति होत नाच नयनांचा । किति रंग मुखावर आले;
तें चित्र चोर चित्ताला । कितिदां तरि चुकवुनि गेलें.

---

१. मंजु मंजु.

उत्कंठा धीर धरीना । लागला दुखाया ऊर;
तारुण्यतरल बालेच्या । चित्तांत भरे हुरहूर.

*  *  *  *

पायांत रुप्याचा तोडा । ये थबकत थोडा थोडा
युवराज विजयसिंहाचा । झाडींतुनि पिवळा घोडा.
शिरपेंच शिरावर साजे । पाठीवर लटके ढाल,
रूदार झगा जरतार । अंगावर हिरवी शाल;
उतरून विलासी वीर । चुंबुनि ती मोहनमाला
जणुं रम्य हृदय रमणीचें । हळुवार धरी हृदयाला.
उतरून वारुवरतून । सरदार शिपाई आले;
हळुवार हृदय रमणीचें । हृदयाशीं संगत झालें.

अपूर्ण

◎ ◎ ◎

## ४९. निःश्वास (?)

देहचिंतनीं जीव जाळुनी हा कुठवर घ्यावा,
घाल मोहिनी तूं फुंकूनी गोड गडे पांवा.
तव अधरींचें प्रेम– लाडके कवीश नमि यातें;
तव हृदयींचें श्वसन– अहा त्या प्रेरितसे गीतें.
तव हृदयींची सुखद उष्णता प्रेम भरी हृदयीं;
नवल न मग तद्गीत ऐकतां मन मोहुनि जाई.

अपूर्ण

◎ ◎ ◎

## ५०. ते डोंगर सुंदर दूरदूरचे बाई

ते डोंगर सुंदर दूरदूरचे बाई, पाहीन गडे त्या हिरव्या हिरव्या राई
त्या विमल जलासह वळणें वळणें घेत, हिंडेन झऱ्यांच्या शीतल कुंजवनांत

दरडीवर बसल्या चढून चिमण्या वेली, परि हाय फुलांची पाखर पायाखालीं,
उचलून उराशीं धरीन चुंबुनि त्यांतें, गुंफीन तयांची माला मी निज हातें

तीं हरिण-बालकें नयनीं पाहुनि मातें, म्हणतील आज हें नवेंच कोणी येथें
उडतील भरारा राघू बोलत बोल, आकाशमंडळीं त्यांची माळ खुलेल

कुरणांतहि किलबिल करिती बहिणी सात, मी बघेन भांडण कसलें चाले त्यांत

◎ ◎ ◎

## ५१. तूं तर चाफेकळी

'गर्द सभोंतीं रान साजणी तूं तर चाफेकळी !
काय हरवलें सांग शोधिसी या यमुनेच्या जळीं ?'

ती वनमाला म्हणे, 'नृपाळा, हें तर माझें घर;
पाहत बसतें मी तर येथें जललहरी सुंदर.

हरिणी माझी, तिला आवडे फारच माझा गळा;
मैना माझी गोड बोलते तिजला माझा लळा;

घेउनि हातीं गोड तिला त्या कुरणावरतीं फिरे—
भाऊ माझा, मंजुळवाणें गाणें न कधीं विरे.'

'रात्रीचे वनदेव पाहुनी भुलतिल रमणी! तुला;
तूं वनराणी, दिसे न भुवनीं तुझिया रूपा तुला.

तव अधरावर मंजुळ गाणीं ठसलीं कसलीं तरी;
तव नयनीं या, प्रेमदेवता धार विखारी भरी!

क्रीडांगण जणुं चंचल सुंदर भाल तुझें हें गडे,
भुरु भुरु त्यावर नाचत सुंदर कुंतल कुरळा उडे.

अर्धस्मित तव मंद मोहने, पसरे गालांवरी;
भुलले तुजला हृदय साजणी, ये चल माझ्या घरीं.'

*    *    *    *

सांज सकाळीं हिमवंतीचे सुंदर मोतीं घडे;
हात लावितां परि नरनाथा तें तर खालीं पडे.

ती वनबाला म्हणे नृपाळा सुंदर मी हो खरी,—

अपूर्ण

◎ ◎ ◎

## ५२. काय असे संसारांत ?

आशा सरली, प्रीति निमाली,
नैराश्याची भयाण काळी
रजनी ही चहुंकडे पसरली,
मार्ग सांपडेना त्यांत.
माळ म्हणोनी धरीं जिला ती,
व्याळ होउनी डंखे चित्तीं.
सत्य म्हणा कीं कुलटा प्रीती
मज लोटी पाताळांत
स्वार्थसुखाची झाली होळी,
परमार्थाची राखरांगुळी,
दुर्दैवाची पिकली पोळी,
काय राहिलें जगतांत.
हें चिंतेचें वादळ सुटलें,
सुखसरितेचें पाणि आटलें.
दुःख दवाग्नी[1] क्रूर भडकले,
देह पोळला हा त्यांत.
भारभूत मज नको जिणें हें,
उदास विश्वच मजला आहे,
सोड दयाळा प्रभो ! प्रार्थना
हीच तुला आहे.
हें जग अवघें अवघें खोटें,
नित्य चाललें हें उफराटें,

---

१. दावानल.

पुरे बोचले याचे कांटे,
धांव दयासिंधो !
हा काळाचा उदार सागर
रमे तुझ्यासह प्रशान्त निर्भर,
त्यांतुनि लहरी एक उंच कर
मज उदरीं घ्याया.
क्रूर जगीं या कसलें गाणें ?
कसलें हसणें कुठें खेळणें ?
तुझ्या पदीं घे मग प्रेमानें
गाइन मी तेथें.

◎ ◎ ◎

## ५३. हे तासाचे तास—

हे तासाचे तास निघुनिया जाती,
अंधार भरे मग चित्तीं,
किति दडपण हें अवजड हृदयावरतीं
कष्टानें बोलहि निघती,
हें स्वप्नचि कीं जागृति न कळे कांहीं,
जणुं गहन मनावर येई,
हीं भुतें पिशाच्चें सारीं,
वाऱ्यावर करिती स्वारी,
मम चित्तहि त्यामाझारीं,

किति आरोळ्या घोर मृत्युला देतें
मृतवत् जों हें जग होतें.
मग मद्यानें जेविं रक्त उसळावें
तशि घोर कल्पना धावे
मग तिजवरती काळेशार विचार
गरगरगर उडती दूर
हृदयीं हें असलें चाले,
नस नस जणुं करकर बोले,
सर्वाङ्ग ठेंचलें गेलें
जणुं होतिल हे खंड खंड देहाचे,
अशि घोर निराशा जाचे.

◎ ◎ ◎

## ५४. माझें गाणें

माझें गाणें, एकच माझें नित्याचें गाणें;
अक्षय गाणें, अभंग गाणें, गाणें हें गाणें. १

सर्व जगाचें मंगल, मंगल हें माझें गाणें;
या विश्वाची एकतानता हें माझें गाणें. २

आशेच्या वीणेचा चढवुनि सूर भौतिकांत
हें गाणें, हें प्रियकर माझें गाणें मी गात. ३

ही प्रेमाची, ही शान्तीची, विश्वमंगलाची,
सौभाग्याची तार तशी ही, ही जगदैक्याची. ४

निरध्वनी हें, मूकगान हें यास म्हणो कोणी,
नभांत हें सांठवलें यानें दुमदुमली अवनी. ५

सर्व धर्म हे, भेद–पंथही सर्व एक झाले;
माझें, माझें विश्व, तार ही प्रेमाची बोले. ६

शान्त(हि) मत्सर, प्रशान्त कपटस्वार्थाची ज्वाला,
चिच्छान्तीनें अहा भरीलें सगळ्या विश्वाला. ७

ही मोक्षाची, स्वातंत्र्याची, उन्नतिची माला,
सौभाग्याची तार लागलों मीं छेडायाला. ८

हें नंदनवन ही स्वर्भूमी एक पहा झालीं !
मंगल मंगल मद्‌गानाची गति ही शेवटली. ९

◎ ◎ ◎

## ५५. अश्रुमाळ

ही अश्रूंची अखंड माला। म्हणो कुणी ही तुला कशाला;
परंतु कळतें माझें मातें। अश्रुमाळ ही जें मज देते.
रडण्यावांचुनि। कुढण्यावांचुनि
त्या हास्याचा अक्षय पेला। जगीं कधीं या कुणा मिळाला?
मिथ्या स्वप्नीं रमवुनि वृत्ति। जगीं हासते मानवजाति,
परंतु ज्यानें जागें व्हावें। त्यानें रडणें जवळ करावें.
उदासीन हें। रडणें नोहे
या चढत्या अश्रूंची माला। दाखविते चढत्या आशेला.

निंदा कोणी या रडण्याला। हसो कुणी तें त्यांचें त्यांना;
परंतु अक्षय मी रडणार। स्वर्गाच्या माड्या चढणार.
मानवतेची। भूक आमुची।
सवाल करिते या रडण्यास.......

अपूर्ण

◎ ◎ ◎

## ५६. काळाचे लेख

ब्रह्माण्डावरि नित्य नूतन अशीं चित्रें सुरम्यें किती
पंखांहीं अपुल्या विशाल लिहितो हा काळ दिव्याकृती
संध्या आणि उषा, तसे रविशशी, नक्षत्र–ताराङ्गण
दिव्यें दाखवितो अनंत असलीं आम्हांस रात्रंदिन १

त्यानें शान्ति नभीं गभीर लिहिली, आम्हां न ती लाभते;
दिव्य प्रीति तयें जगीं पसरिली, आम्हीं तियेचीं भुतें;
विश्वाच्या हृदयांतल्या निवडुनी स्वर्गीय भावांप्रती
चित्रें रंगविलीं तयें, न कळती हा हंत आम्हांस तीं ! २

'मातें स्वर्ग दुरावला' म्हणुनिया चित्तीं बिचारी कुढे
त्रस्ता दीन वसुंधरा बघुनिया व्योमस्थ तेजाकडे;
'स्वर्गाचें सगळेंच गूढ वसलें काळाचिया लेखनीं'
बोले निश्वसुनी 'कधीं तरि मला सांगेल का तें कुणी ?' ३

काळाचीं जर हीं निगूढ लिखितें आम्हां कळालीं तरी
देवा रे ! वसुधा क्षणांत बनवूं प्रत्यक्ष स्वर्गापरी.

◎ ◎ ◎

## ५७. सौंदर्याचा अभ्यास कर !

गाणें हें रचिलें असे जुळवुनी कोठून कांहीं तरी,
वाणी सत्य तुझी असेल भरली द्वेषानलानें जरी,
रम्याकार चमत्कृतिप्रचुर हें ब्रह्माण्ड नेत्रीं दिसे,
खेळे कांहिं तरी तमांतुनि, मनीं गाणें तदा होतसे.
सूर्याचीं किरणें; सुनिर्मल तशा त्या तारकामालिका,
संध्येचे रमणीय रंग, उदयीं सृष्टी मनोहारिका,
वृक्ष श्यामल पुष्पसंकुल चलद्‌दूर्वादलाच्छादिता,
वाहे शान्तपथा सुरम्य सरिता कल्लोलमालायुता;
प्रेमानें अभिषिक्त चित्र मग त्या रामण्यविश्वीं दिसे,
चित्ताची रमणीयता उतरुनी संगीत होतें तसें.
तें सौंदर्यच आणिलें जुळवुनी कोठून कांहीं तरी,
तूंतें तें न दिसे म्हणून सखया, अभ्यास याचा करी.

◎ ◎ ◎

## ५८. काल आणि जीवित

गेले भंगुनि दुर्ग, दुर्गगिरिचीं गेलीं झरोनी शिरें,
गेले देश कितेक राख बनुनी संतप्त कालानलें.
होवोनी थरकांप, पेटूनि मनीं, ज्वालामुखें प्रत्यहीं
जें तें नश्वर ! हाय ! हाय ! म्हणुनी निःश्वास टाकी मही !

भूमीचा बडिवार काय तरि या, तो विश्वसाक्षी वरी,
कालव्याधशरें प्रतापनिधिही घायाळ हो अंतरीं;
शुक्राच्या शशिच्या कला स्मरुनि हो स्वर्देवतासुंदरी
भीतिग्रस्त खगोलनेत्र करुनी दिङ्मूढ वेड्यापरी!
काळाचा घनघोर उग्र वणवा दुर्वार्य ऐसा जरी
ब्रह्माण्डांत प्रतिक्षणीं भडकुनी अस्वस्थ चित्ता करी,
चित्ताच्या परि नंदनांतिल पहा एकेक माझ्या कळी
स्वानंदांत डुलोनियां प्रगटवी स्वामित्व कालानलीं!
'जावो विश्व जळून, जीवित तुझें कालस्थलाबाधित,'
प्रीतीनें मज हा धडा शिकविला, हो शान्ति हस्तंगत!

◎ ◎ ◎

## ५९. अनंत

अनंत तारा नक्षत्रें हीं, अनंत या गगनांत
अनंत दीप्ती, अनंत वसुधा हे शशिसूर्य अनंत. १

वरतीं खालीं सर्व सांठलें वातावरण अनंत,
माप कशाचें, कुणा मोजितां, सर्व अनंत अनंत. २

कितेक मानव झटती, करिती हाडाचेंही पाणी,
अनंत वसुधा आजवरी हो परी मोजिली कोणीं? ३

म्हणोत कोणी 'आम्हीं गणिला हा ग्रह, हा हा तारा,'
परंतु सांगा कुणी मोजिला हा सगळाच पसारा? ४

विशाल वरतीं गगन नव्हे, हें विश्वाचें कोठार,
उदात्ततेचा सागर हा चिच्छान्तीचा विस्तार. ५

कुणी मोजिला कुणास त्याची लांबीरुंदी ठावी?
फार कशाला दिग्वनितांची तरी कुणी सांगावी? ६

अनंत सारें विश्व, जाहलें अनंतांत या लीन;
क्षुद्र मानवा, सांग कशाचा बाळगिसी अभिमान? ७

तव वैभव हें, तुझीं धनें हीं, हे अत्युच्च महाल
जातिल का गगनास भेदुनी? अनंत का होतील? ८

तुझ्या कीर्तिचें माप गड्या का काळाला मोजील?
ज्ञान तुझें तूं म्हणशी 'जाइल', कोठवरी जाईल? ९

'मी', 'माझें' या वृथा जल्पना, तूं कोणाचा कोण?
कितेक गेले मी मी म्हणतां या चक्रीं चिरडून. १०

## ६०. ज्योत

व्योमीं पाहुनि अरुणातें । दीप विझविला पटवातें
मावळली ती वायूंत । तेजोमय दीपज्योत १

देहाला टाकुनि जाती । प्राण्यांचे आत्मे वरतीं
त्यापरि टाकुनि धूमाला । दीपाचा आत्मा गेला २

अदृश्य जें जग त्याच्यांत । जाउनि ती विरली ज्योत
गेली ! नाशाला गेली । नाहीं हो ! अक्षय झाली ३

वायूच्या उदरीं गेल्या । असंख्यात ज्योती असल्या
स्वर्ग तोच, त्या बसतात । जेथें या अवकाशांत ४

देवाच्या छत्राखालें । संमेलन त्यांचें झालें
पावित्र्याच्या त्या मूर्ती । दिसतिल का फिरुनी जगतीं ५

मूर्तच त्या होतील जरी । चकाकेल सृष्टी सगळी
खरी दिवाळी येईल । तेजोमय जग होईल ६

हाय ! परी होइल का तें । येतिल का ज्योती येथें
रमल्या त्या स्वानंदांत । मर्त्य जगीं का येतात ? ७

निदान दर्शन बा वायो । आम्हांला त्यांचें होवो
पाहूं दे तीं भांडारें । नेत्र भुकेले झाले रे ८

दिसतिल ते सारे तेथें । देशाचे अमुच्या नेते
या विश्वाचे दीपक रे । असतिल तेथें बघूं बरें ९

दाविसी न मज कां वाता । जा नच तव पर्वा आतां
देहदीप विझणारच हा । जाइन मीं मग तिथें अहा १०

दिव्यपणा येईल मला । बघण्याला ज्योती विमला
त्यांसह त्यांतच राहीन । स्वानंदीं होउनि लीन ११

◎ ◎ ◎

# ६१. आवाहन

श्रमलें दमलें वणवण फिरुनी गगनीं रविकरजाल;
शिणल्या सुंदर सान्ध्यदेवीचें हो घर्माङ्कित भाल,

शिणले मारुत, खिन्न पयोधर दुर्धर साहुनि ताप
शून्य गिरिदरी, जर्जर निर्झर गळती आपोआप

उदासवाणें एकच गाणें शून्य मनें वनराई
घोळित राही, लागुनि तंद्री शीण भरे तद्देहीं.

शिणलें कोणी संसाराचा वाहुनि माथां भार,
अनंत चिंताकाहूरांनीं भरे कुणाचें ऊर

गायन गातां शिणली माता, शिणलें तान्हें बाळ,
शिणला पालख; मंद हालुनी घालविताहे काळ.

शिणली काया, शिणली माया, शिणले लोकाचार,
सौख्यहि शिणलें, दुःखहि शिणलें, शिणले तत्त्वविचार.

काळवंडल्या वातावरणीं ये करुणामय वाणी,
शीण पावली प्रीतिदेवता ब्रह्माण्डाची राणी.

जगन्मोहिनी काव्यविणेचा मंद पडे रणकार,
ग्रहगोलांवर गंधर्वाचा एक जुळेना सूर,

पक्वपणाची पिवळी छाया सुंदरतेवर रांगे.
ब्रह्माण्डाचीं शीण पावलीं, श्रमलीं दमलीं अंगें.

ये, ये, ये जगदेकमाउली ! ये रजनी लवलाही,
सृष्टिदेवता नातरि बुडते भीषणतेच्या डोहीं.

तव अधरावर जन्म पावती नंदनवनिंचे वात,
नवजीवन ये उसळूनि तुझा वरती फिरतां[1] हात

तुझिया स्पर्शें मृदु पल्लविता शान्त लता ही घेई;
दिव्यदर्शनीं तुझ्याच जननी, फुलते सुंदरताही.

आद्यदेवते रजनी, ये ये निजले श्रीभगवान,
ब्रह्माण्डाचा भार माउली तुजविण वाहिल कोण?

प्रीतिदेविला नवसंजीवन कोण पुन्हा देईल?
ग्रहगोलांना निज कक्षांतुनि कोण पुन्हां नेईल?

ये ये रजनी, ये फिरफिरुनी, येशील न तू जेव्हां
प्रलयकाळ या ब्रह्माण्डाचा सत्वर होइल तेव्हां!

◎ ◎ ◎

## ६२. दुबळें तारूं

कसें हाकारूं। शीडाविण दुबळें तारूं
तुडुंब सागर भरला आहे,
दुष्ट काल झंझानिल वाहे,
तुफान तेणें खेळत राहे,
कसें हाकारूं। शीडाविण दुबळें तारूं? १

---

१. फिरतां तव प्रेमांकित हात.

सुखदुःखाच्या लाटा येती,
क्षुब्ध समुद्रातें त्या करिती,
तेणें उपजे चित्तीं भीति
कसें हाकारूं। शीडाविण दुबळें तारूं? २

षड्रिपु जलचर पसरुनि जाळें
स्वैरगतीनें फिरती सगळे,
ओढुनि घेतिल नौका स्वबळें,
कसें हाकारूं। शीडाविण दुबळें तारूं? ३

मायावर्ती भ्रमेल का हें?
भ्रमतां प्रलयीं बुडेल का हें?
चित्ता चिंता जाळित आहे;
'कसें हाकारूं। शीडाविण दुबळें तारूं?' ४

पार पाहतां न दिसे कांहीं,
दुसरा त्राता कोणी नाहीं,
सदा भयाची जाचण ह्रदयीं,
कसें हाकारूं। शीडाविण दुबळें तारूं? ५

नको नको हा प्रवास याचा!
अब्धि नव्हे दरबार यमाचा;
सोडुनि द्यावा पंथचि याचा,
कसें हाकारूं। शीडाविण दुबळें तारूं? ६

## ६३. यमाचे दूत

बोलवितात। विक्राळ यमाचे दूत,
गिरिशिखरावर आ पसरोनी,
काळ्या अंधारांत दडोनि,
किंवा पडक्या बुरुजावरुनी,
शब्द येतात। 'चल नको बसूं जगतांत'

खोल खोल भेसुर दरडींत,
पडक्या घोर जुन्या विहिरींत
उगवुनि पिंपळ वर येतात
ते म्हणतात। 'चल जगांत दुसऱ्या शान्त'

परिस्थितीचीं कठोर भूतें
क्षणांत करिती शून्य मनातें,
पूर्वस्मृति मग ताजी होते.
जळतें त्यांत। हृदयाचें होउनि भूत.

क्षणभर सांपडतां एकान्त
विचारलहरी उद्भवतात,
विझते प्रेमाशांची ज्योत,
पेट घेतात– हे असंख्य वणवे आंत.

पुस्तक वाचायाला घ्यावें,
कवितेनें कीं मन रमवावें,
सृष्टीचें सौंदर्य बघावें,
हृदयीं तों तों। हा विकार दृढतर होतो.

वेडें भूत बनोनी जावें.
लिहिलें दैवीं काय असावें,
न कळे तोंड कुठें लपवावें,
कां छळतात– हे असे यमाचे दूत ?

धांव धांव सदया, जगजेठी !
दया करीं रे दीनावरतीं,
आशा तुजवांचुनिया परती
नुरली कांहीं– जननी गे, धांवुनि येई.

◎ ◎ ◎

## ६४. दोन फुलें

हीं कालाचीं दोन फुलें दों हातीं
दोघांवर माझी प्रीती
क्षण यावरती क्षण त्यावरती पाही
दृष्टी मम नाचत राही
हुंगितों क्षणैक तयातें
चुंबूनि घडिघडी यातें
मी वदतों, रे देवा नित्य असूं दे
गुंगत मज यांच्या छंदें

परि काल वदे “नाहीं, वेड्या ! नाहीं
चंचलता मानवता ही

दे स्वकरींचें एक फूल मज आतां
दुसऱ्यावर तूं कर सत्ता.
हें बाल्य खेळतें येथें
तारुण्य हासवी मातें
वद काळा ! मी यांत कुणाला सोडूं
शब्दही नको तो काढूं !

*     *     *     *

मधु हास्यानें परिमल पूरित झाले
प्रेमानें सिंचित केलें
सुखदु:खांच्या मंद तरल भावांहीं
हें बाल्य डुले सुखदायी
नाहीं तें तुजला देत
रंगेन अखंड तयांत
तूं जा जा जा, फूल दुजें तें घेई
पर्वा मज त्याची नाहीं
परि थांब जरा नको त्यासही नेऊं
दे मला घडीभर पाहूं
हें थबथबलें दिव्य प्रीतिरसानें
स्वर्गाचें यांतच ठाणें
मी देउं कसा वद याला !
मज्जीवित सर्वस्वाला
मज राहूं दे काळा कौमार्यांत
डोलत या दोन फुलांत

◎ ◎ ◎

## ६५. जिज्ञासु

हे योगीशा, मोहमूढ मी नर दुर्बल दीन,
आनंदाच्या मागें वणवण दमलों भटकून १
अपूर्णतेनें पूर्ण निराशा ह्रदयाची होते;
अमृत मुखाशीं नेतां नेतां विषमय हो येथें. २
आनंदाच्या भारानेंही दुखणारें चित्त,
दुःख बघुनि मग नवल न त्याचे तुकडे होतात. ३
खराखुरा आनंद असे कीं सर्वच आभास?
पडतें कोडें लागे वेडें चित्त रडायास! ४
उदास जीवन कंठायातें मग कांहीं नाहीं
भुलभुलाई तत्त्वज्ञांची शोधुनिया पाही. ५

◎ ◎ ◎

## ६६. तुझें न घडलें दर्शन अजुनी*

तुझें न घडलें दर्शन अजुनी प्रिय जननी या तव बाळा
वाणि न कानीं हाय! ऐकिली शान्तवील जी ह्रदयाला.
शान्तवील जी मम ह्रदयाला, संदेहाला घालविल.
प्रेमळ जननी, जीव गोठतो तगमग दाटे ह्रदयांत
क्षणक्षणा हुरहुरुनि जीवही कंठामधिं दाटुन येत.

---

* सह्याद्री, डिसेंबर १९४४. संग्राहक : बा. सी. मर्ढेकर.

मनोवृत्तिंना फुलविल माझ्या काव्यवसंता बोलविल;
( सुंदरतेचीं ) गूढगायनें गाउन विश्वा हालविल.
सभोंवार चांदणें पसरलें हें शरदाचें गोड किती ?
झाड झुलेना पान हलेना; विश्वचि हो कीं स्मिमित अती.
प्रसन्नता जणुं अगाध सरिता भरिती अपुली चंद्रकरीं;
रजनीदेवी गूढ शान्ततामंत्र पसरिती त्याहि वरी;
हृदयस्पर्शी अंगाईचें प्रेममाउली गीत म्हणे;
त्यांच्या तारा हलुनि राहिल्या चंद्रकरीं जणुं मूकपणें.
अनंत चिंता अनंत दुःखें, वाण तयाला नसे मुळीं !
चंद्रकरापरि प्रभो अनंता प्रीति तरी तव वाढतसे.
दमलीं शमलीं मानवबाळें त्यांस विसांवा हवा जरी,
नसेल जगतीं नसे; असो परि शान्ति सागरा तुझ्या घरीं.
सृष्टि तुझी ही— हेंच तुझें घर— विहार ( येथें स्वैर करी );
निळ्या नभावर संगमरवरी गिरिशिखरापरि मेघ दिसे;
शुभ्र धरेवर नील घनापरि सुंदर छाया शोभतसे.
जगत्पावनी जगदात्म्याची करुणा गगनीं विरघळुनी...

◎ ◎ ◎

## ६७. तापल्या जिवाला कोण देइना ताप ?

मम विशीर्ण गीता ! पाठवुं तुज जगतांत ?
कां ठेवुं आपल्या सांठवुनीच मनांत ?
ती जीवकला नच सुंदर तुजवर कांहीं.
तुज चित्ताकर्षक गंधहि उरला नाहीं.

जो लाजवील कीं ललनेच्या हृदयाला
तो रंग नसे तव दैवीं लिहिला बाळा !
तव भग्न देहिं मधुबिंदूही नच राही
करिशील काय तरि राहुन जगतीं पाही.
ही तीव्र झळा त्या उन्हावरुनिया आली
परि करूं नको ती मात लाडक्या, खाली.
जणुं जाळ तापल्या दगडांतुनि निघतात,
जळलेंस परी नच पुरें जाहलें त्यांत.
तापल्या जिवाला कोण देइना ताप ?
संतप्त नरावर कोण करि न संताप ?
वेड्याच्या मागें होउनि वेडें लागे,
तूं दुःखी जन, तव दुःखचि राहिल मागें

(अपूर्ण)

◎ ◎ ◎

## ६८. निराशा

रात्र संपली, दिवसहि गेले,
अंधपणा ये फिरुनि धरेला,
खिन्न निराशा परि हृदयाला—या सोडित नाहीं.

नित्यापरि रविकिरणें देती
रंग मनोहर सान्ध्यमुखीं तीं,
खळबळ ओढा गुंगत गीती—राईंतुनि वाहे.

सुंदर सगळें, मोहक सगळें,
खिन्नपणा परि मनिंचा न गळे,
नुसती हुरहुर होय जिवाला—कां न कळे कांहीं !

चंद्रबिंब धरि अभिनव कान्ती,
मेघ तयांनीं धवलित होती,
परि हृदयीं नैराश्यकालिमा—मम खंडत नाहीं !

भोवऱ्यांत जणुं पडलों कोठें,
स्वप्न भयंकर दिसतें वाटे,
जीवित केवळ करुणासंकुल—नैराश्यें होई !

(अपूर्ण)

◎ ◎ ◎

## ६९. हृदयाची गुंतागुंत

हृदयाची गुंतागुंत कशी उकलावी ?
ही तीव्र वेदना मनामनाची ठावी.

अंधार दाटला अपार भरला पूर,
परि पार तयाच्या कोण मला नेणार ?

हें ज्ञान मला तर अज्ञानापरि भासे,
मी सोडवितां तें उलटें बांधी फासे,

मन विटलें, विटली शब्दचिकित्सा सारी;
मी फिरतां गरगर बुद्धि तयामाझारीं.

सौंदर्य फुलांचें, गाणीं वनविहगांचीं,
ती गोड शान्तता हिरव्या वृक्षलतांची,

शीतलता सुंदर चंचल निर्झरिणींची,
गंभीरपणाची मूर्ती गिरिरायाची,

मज रुचे न किमपी व्यापकता गगनाची;
ती अनंततेचीं किरणें ग्रहगोलांचीं

ती अमर्यादता अचिंत्य गूढ दिशांची,
ही अगाधता कीं सर्वंकष कालाची !

हें दिसून सर्वहि मज न दिसेसें होई,
समजून मनाला कांहीं उमगत नाहीं.

हे धर्म सांगती भिन्न भिन्न पथ कांहीं,
मम वृत्ति सांगती भिन्न तुझा पथ पाहीं.

ही बुद्धि सांगतां मन ऐके ना तीतें,
हें चित्त वदे तें पटेच ना बुद्धीतें.

द्वैताची असली अक्षय झोंबी चाले,
सुखदुःखीं खातें चंचल चित्तहि झोले.

दुर्भाग्य दुर्बळा मनास दिसतें सारें,
परि चंचल चळतें चपळहि चित्त कसें रे !

मानवतो कवणां स्वार्थ, कुणां परमार्थ,
परि अर्थ दिसेना हाय मला उभयांत.

वैराग्य बरें कीं सुखद बरा अनुराग,
परि हाय प्रीतिचें उगाच माझें सोंग.

तें कर्म बरें कीं बरवा कर्मत्याग ?
दुर्दैव तसें, मज नव्हे त्याग ना भोग.

ती श्रद्धा बरवी अश्रद्धाहि बरी ती;
परि मानवते मज मधेंच भलती रीति.

व्यामोह भयंकर दुस्तर भरला भारी,
कीं जीव दडपतो मम निद्रेमाझारीं !

मज व्यर्थ नको तीं अमरपणाचीं गाणीं;
कुणि उठवा असल्या गहनांतुनि हलवोनी.

तूं तुझाच कर उद्धार बोल हे कळती,
परि सहायार्थ या वृत्ति मनीं तळमळती,

हा हाक मारतो उठवा मजला कोणी,
या भर निद्रेच्या दुस्तर गहनांतूनी.

दिन पक्ष मास ऋतु वर्ष भराभर गेले
हें रक्त जसेंच्या तसेंच सांकळलेलें—

अपूर्ण

◎ ◎ ◎

# ७०. शून्य मनाचा घुमट

शून्य मनाच्या घुमटांत
कसलें तरि घुमतें गीत;
अर्थ कळेना कसलाही,
विश्रान्ती परि त्या नाहीं;
वारा वाही,
निर्झर गाई,
मर्मर होई,
परि त्याचें भीषण भूत
घोंघावत फिरतें येथ.

दिव्यरूपिणी सृष्टि जरी
भीषण रूपा एथ धरी;
जग सगळें भीषण होतें.
नांदाया मग ये येथें;
न कळे असला,
घुमट बनविला,
कुणी कशाला ?—

अपूर्ण

◎ ◎ ◎

## ७१. सुकलेलीं फुलें

अंजनीगीत

आयुष्याच्या प्रभातकालीं
चित्ताच्या क्षितिजावर आलीं,
सुस्वप्नें तीं क्षण लकलकलीं—
विलयाला गेलीं. १

कालतरूचीं गलित फुलें तीं
पुनरपि फुलतिल का मजभोंतीं ?
स्मरतां त्यांना अहा उसळती—
हृदयाच्या वृत्ती. २

स्मरणाच्या थडग्यांतुनि या रे !
सुमनांनो भूवरतीं सारे !
खेळ करूं ते पुन्हां एकदां
पूर्वी जे केले. ३

दिव्य माझिया नक्षत्रांनो !
बाल्यवनींच्या वनविहगांनो !
या चिमण्यांनो ! या छकुल्यांनो !
या, या, या आतां. ४

प्रेमपूर्ण मधु बाल्य अहा तें
तुम्हांसंगतीं येइल येथें;
मींही सोडुनि तारुण्यातें
होइन बाल पुन्हां. ५

प्रेमावांचुनि अन्य न कांहीं,
दुष्टपणाचा स्पर्शहि नाहीं,
अंधाराचा मागमूसही
न दिसे ज्या ठायीं, ६

त्या बाल्याच्या सीमेवरते
दुष्ट मत्सरी जगतापरते
प्रेमाचें साम्राज्य सभोंतें
बनवोनी राहूं. ७

स्वानंदाच्या त्या रानांत
मृदु हास्याचें पेरुनि शेत,
परस्परांचे धरुनी हात
नाचूं स्वच्छंदें. ८

सत्त्वविशिष्ट प्रेमावरतीं
स्वर्गाची जर आहे वसती
नयनरज्जुंनीं बांधुनि आणूं
तर तो भूवरतीं. ९

ज्या प्रीतीच्या मंजुळ नादें
बाल्याच्या मोहोनी छंदें
वाजविली मुरली गोविंदें—
सर्वांना ठावें १०

ती मुरली घेवोनी हातीं
दिव्य नाद तो भरित दिगन्तीं
या बाल्याच्या सीमेवरतीं
आपणही राहूं. ११

◎ ◎ ◎

# ७१. सुकलेलीं फुलें

अंजनीगीत

आयुष्याच्या प्रभातकालीं
चित्ताच्या क्षितिजावर आलीं,
सुस्वप्नें तीं क्षण लकलकलीं—
विलयाला गेलीं. १

कालतरूचीं गलित फुलें तीं
पुनरपि फुलतिल का मजभोंतीं ?
स्मरतां त्यांना अहा उसळती—
हृदयाच्या वृत्ती. २

स्मरणाच्या थडग्यांतुनि या रे !
सुमनांनो भूवरतीं सारे !
खेळ करूं ते पुन्हां एकदां
पूर्वी जे केले. ३

दिव्य माझिया नक्षत्रांनो !
बाल्यवनींच्या वनविहगांनो !
या चिमण्यांनो ! या छकुल्यांनो !
या, या, या आतां. ४

प्रेमपूर्ण मधु बाल्य अहा तें
तुम्हांसंगतीं येइल येथें;
मींही सोडुनि तारुण्यातें
होइन बाल पुन्हां. ५

प्रेमावांचुनि अन्य न कांहीं,
दुष्टपणाचा स्पर्शहि नाहीं,
अंधाराचा मागमूसही
न दिसे ज्या ठायीं, ६

त्या बाल्याच्या सीमेवरते
दुष्ट मत्सरी जगतापरते
प्रेमाचें साम्राज्य सभोंतें
बनवोनी राहूं. ७

स्वानंदाच्या त्या रानांत
मृदु हास्याचें पेरुनि शेत,
परस्परांचे धरुनी हात
नाचूं स्वच्छंदें. ८

सत्त्वविशिष्ट प्रेमावरतीं
स्वर्गाची जर आहे वसती
नयनरज्जुंनीं बांधुनि आणूं
तर तो भूवरतीं. ९

ज्या प्रीतीच्या मंजुळ नादें
बाल्याच्या मोहोनी छंदें
वाजविली मुरली गोविंदें—
सर्वांना ठावें १०

ती मुरली घेवोनी हातीं
दिव्य नाद तो भरित दिगन्तीं
या बाल्याच्या सीमेवरतीं
आपणही राहूं. ११

# ७२. पांखरास

पांखरा, गाइलें तुला कधींहि न कोणीं.
न च अश्रु गाळिले कुणीं वनीं येओनी !
निःश्वास धांवती सौख्यामागें सारे;
दुःखाचा वाली कुणा कुणीहि न बा रे !

मधु सुखद उष्णता मिळतां रविरायाची
हीं पवनान्दोलीं कमलें उमलायाचीं.
तेव्हांच कोकिलाभैना गातिल गाणीं,
होतील फुलें स्मरविव्हल त्या गीतांनीं.

त्या मधुर मुखींचें अश्रुजाळ चुंबीत
झुलतील फूलपांखरें निजानंदांत.
रविवदनावरचा रंग जरा परि[1] बदले,
मग गान, सर्व सौंदर्य, सर्व हें थिजलें !

या मत्त कोकिळा गिरिकुहरीं रडतील,[2]
कोंवळ्या कळ्या मोडोनि मान पडतील,
लवदार मनोहर वेलबुटी नवलाची
त्या काळीं कोठें नाहीं प्रगटायाची.

रवि वरतीं वरतीं चढत चढत गगनांत
अंगार भरिल या मंद शीत पवनांत;
निष्प्रेम मनाचें गाणें केविलवाणें
तें तुझें मात्र राहील जसेंच्या तैसें.

१. भराभर. २ सोडुनी आम्र जातील.

ती पूर्वतारका प्रभातरेषेवरतीं
जशि काय उभी सौंदर्यदेवता होती;
पीतांबर कसिले, रानवेत्र धरि हातीं,[1]
शिरिं मुकुट कळ्यांचा, त्रिलोकसुखदा मूर्ति.

हळुवार हिमाचें अवगुंठन हलवोनी
बोलेल[2] सर्व निद्रिस्त विश्व म्हणवोनी[3]
सारून जरा कचभार बालिका पाहे.
एकेक तारका समाधिचें सुख लाहे.

निद्रिस्त भूमिका स्वप्न जणों हें दिसलें,
स्वप्नांत लाडके, सुंदर डोळे भिजले.
स्मरतांहि जया हो रोमांचाची भरती,
मधु मंद अहा ती घटिका सौख्यद होती.

परि तोहि काळ तव हृदया नच सुखदायी,
निष्प्रेम मनाला कोठेंही सुख नाहीं.
चुंबीत गुलाबी गाल मधुर संध्येचा
कर वरती आला सुंदर रविरायाचा,

जग समाधिस्थ जणुं सर्व सर्व हें होतें,
परि शान्तिलेशही नव्हता ठाउक तूंतें !
बैसून कुठें तरि कांटेरी झुडुपांत
तव हूं–हूं–हूं–चें होतें गीत वहात !

---

१. परिधान करी ती पीताम्बर कटिभागीं. २. गाईल. ३. डुलवोनी.

येईल एक परि धन्य दिवस सौख्याचा
जो करिल तुझ्यासह अंत तुझ्या गीताचा.
फिरवून फरारा गोफण तो झाडील
कांट्यांवर उपडें भग्न हृदय पाडील!

मग एकच धडकी, एकच अंतिम बोल
बोलून[1] तुझें हें जळतें हृदय निवेल!

◎ ◎ ◎

## ७३. उदासीनता

कोठुनि येते मला कळेना
उदासीनता ही हृदयाला.
काय बोंचतें तें समजेना
हृदयाच्या अंतर्हृदयाला.
येथें नाहीं तेथें नाहीं,
काय पाहिजे मिळवायाला?
कुणीकडे हा झुकतो वारा?
हांका मारी जीव कुणाला?
मुक्या मनाचे मुके बोल हे
घरे पाडिती पण हृदयाला.
तीव्र वेदना करिती, परि ती
दिव्य औषधी कसली त्याला!

◎ ◎ ◎

१. गाऊन.

## ७४. पारवा

भिंत खचली, कलथून खांब गेला,
जुनी पडकी उद्ध्वस्त धर्मशाला;
तिच्या कौलारीं बसुनि पारवा तो
खिन्न नीरस एकान्तगीत गातो.

सूर्य मध्याह्नीं नभीं उभा राहे,
घार मंडळ त्याभंवतिं घालिताहे.
पक्षि पानांच्या शान्त सावल्यांत
सुखें साखरझोपेंत पेंगतात.

तुला नाहीं परि हौस उडायाची,
गोड हिरव्या झुबक्यांत दडायाची,
उष्ण झळया बाहेर तापतात.
गीतनिद्रा तव आंत अखंडीत.

चित्त किंवा तव कोंवळ्या विखारें
दुखतखुपतें का सांग, सांग बा रे!
तुला कांहीं जगतांत नको मान?
गोड गावें मग भान हें कुठून?

झोंप सौख्यानंदांत मानवाची
पुरी क्षणही कोठून टिकायाची?
दुःखनिद्रें निद्रिस्त बुद्धराज
करुणगीतें घुमवीत जगीं आज

दुःखनिद्रा ती आज तुला लागे;
तुझें जगही निद्रिस्त तुझ्या संगें.
फिरे माझ्या जगतांत उष्ण वारें,
तुला त्याचें भानही नसे बा रे !

अपूर्ण

◎ ◎ ◎

## ७५. मी

मी न जगाचा, मी न कुणाचा, मी नच माझा माझा;
परी पसारा सगळा माझ्या विश्वीं मत्प्रेमाचा. १
मी स्वच्छंदी, पुरता छंदी, धारी मी न कुणास;
परी मोहिनी विविधरूपिणी सृष्टीचा मी दास. २
मी येथें, मी तेथें, जगतीं जरी पूर्ण भरलों मी;
प्रशान्ततेसह परंतु माझा वास सदाचा व्योमीं. ३
मी शूरांचें शौर्य संगरीं, मी योग्याचें ध्यान,
सृष्टीमध्यें स्वर्ग मीच, मी या विश्वाचा प्राण. ४
कल्पतरूंचीं फुलें तारका वेंचुन आणिन खालीं;
वाहिन मत्प्रिय वसुंधरेला नित्याची लाखोली. ५
जिथें न कांहीं तेथुनि आणिन मूर्ति व्यक्तित्वाला
जादुगार मी, हवें तसें या वांकवीन जगताला; ६
अधर युवतिचा कोमल, त्याहुनि कोमल सुमनें फार;
मी पुष्पासम, नव्हे नव्हे हो, त्याहुनिही सुकुमार ७
शून्याकारें, शून्याधारें, शून्यवृत्तिनें चाले;
परी हांसतां मी या विश्वीं वस्तुजात हें डोले. ८

◎ ◎ ◎

७३९८२ १९८२ १६२५८

[ आवश्यक वाटल्या त्या काही कवितांना रसग्रहणात्मक टीपा दिल्या आहेत.]

## ११. कवि-बाळें :

आपल्या आशयाची दारे पट्कन खुली करणाऱ्या बालकवींच्या स्वच्छ, नितळ कवितेच्या तुलनेने ही कविता कदाचित काहीशी गूढ वाटेल. या कवितेची जन्म-कथा सांगताना—

'ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं
क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति।'

ह्या भगवद्गीतेच्या नवव्या अध्यायातील श्लोकार्धावरून बालकवींना जी अभिनव कल्पना सुचली, त्या कल्पनेचा आविष्कार त्यांनी ह्या गीतात केला आहे असे उद्गार[१] ग. त्र्यं. माडखोलकर यांनी काढले आहेत. 'कविबाळें' देवाची लाडकी, आवडती. ('आम्ही कोण म्हणून काय पुससी आम्ही असूं लाडके, देवाचे; दिधलें असे जग तयें आम्हांस खेळावया' हे केशवसुतांचे उद्गार येथे सहज आठवतील.) देवांनी त्यांचे कौतुक तरी किती परोपरीने पुरवावे ? सूर्यकिरणांत बसून, तऱ्हेतऱ्हेचे सौंदर्य उधळीत रहावे हेच त्यांचे काम. अशाच एका खेळात, सूर्यकिरणांना ओढून त्यांनी एक बीन तयार केले, (बालकवींनी तुतारीच्या अनुकरणाने 'धर्मवीर' ही कविता लिहिली, इतर अनेकांनी त्या वेळी डंका, रणशिंग अशी वाद्ये निवडली, पण बालकवींच्या हातीचे खरेखुरे वाद्य बीन हेच होते यात काय शंका !) आणि अनिवार हर्षाने ते वाद्य ही कविबाळे वाजवू लागली. कवीच्या, कलावंताच्या निर्मितीची ही जन्मकथा किती अद्‌भुत-रम्य आहे ! वाद्य तरी असे जादूचे, अन् वाजवणारेही असे कसबी की प्रत्यक्ष देवही ऐकण्यासाठी उत्सुक झाले. त्या वाद्यझंकाराचा एक एक सूर असा किमयागार– की सृष्टीचे एकेक फूल त्याने आपोआप उमलू लागले. (किती नाजुक

१. पाच कवि : प्रा. मं. वि. राजाध्यक्ष; पृ. २२६.

कल्पना ! ) पण हे सारे असेच कोठून राहणार ? दृष्ट लागण्याजोग्या सुखाला नेहमी दृष्ट लागते तसेच हे घडले,– कोठून तरी विषारी वारा आला आणि हा आनंद कोमेजू लागला. वीनाच्या ताराही तुटून गेल्या. असे मनात येते की या अद्भुत-रम्य कवितेतून बालकवी आपल्या काव्य-जीवनाचीच दुहेरी कथा सांगत आहेत काय ? स्वप्नसृष्टी जळाली, सारी माती माती झाली,– आणि मग या वर्णनातच अवचित समोर ठाकते ती विलक्षण प्रतिमा... "या खोल भूमि गर्तेत अंधार खळाळत होते." विश्वाच्या पोटी लपलेल्या खोल-खोल अंधाराचा चटका कवींना आणि कलावंतांना सर्वात आधी व अधिक बसावा हे स्वाभाविकच नव्हे काय ? काळाच्या त्या भयाण आवर्तात भोवंडून, चाचपडून, ठेचकाळून, विव्हल होणे हेच त्यांच्या नशिबी आले. जीवाला आग लागली. जळावेगळ्या मासोळी-सारखी तडफड तडफड होऊ लागली... टाहो फोडला गेला... पण आश्चर्य असे की, तो टाहो, त्या किंकाळ्या, हीच जगाची लाडकी गाणी झाली... ती संतप्त अश्रुमाला हीच कल्पनाश्रेणी वाटू लागली, विश्व त्यांनाच गौरवू लागले... माना डोलावू लागले. त्या मुग्ध अंतःकरणात काय बोचत होते याची पर्वा कोण करणार ?

प्रा. मं. वि. राजाध्यक्षांनी या कवितेचे रसग्रहण करताना, ' Our sweetest songs are those that tell of saddest thought ' या शेलेच्या सुप्रसिद्ध उद्गारांची आठवण केली आहे, ती यथार्थच होय. ' कवि-बाळें ' ही कवीची, कलावंतांची कहाणी होय. कवींच्या अपार्थिव अस्तित्वाची, कलानिर्मितीची आणि त्यांच्या शोकान्तिकेचीही.

### १५. निर्झरास :

बालकवींच्या निसर्गगीतांतून डावेउजवे, अधिकउणे निवडणे खरोखर अशक्य-प्राय वाटावे अशी भुरळ या कविता बघता बघता रसिक-मनावर घालतात, आणि आयुष्याच्या कोणत्याही काळात कोणत्याही अवस्थेत ही भुरळ ओसरत नाही, उणावत नाही. कलेचे सौंदर्य अम्लान ठरते ते असे. 'निर्झर' या कवितेची जादू तर अशी आगळी की, बालवयापासूनच तिचा वाचक काहीशा अजाणते-पणाने तिच्याकडे ओढला जातो, आणि नंतरही तिच्या अर्थसौन्दर्याचे, नाद-गुणांचे नवनवे पैलू, नवनव्या छटा त्याला दिसू लागतात.... दिसत राहतात.

बालकवींच्या अतृप्त आयुष्यातील निरामय आनंदाचे काही दिवस महाबळेश्वर येथे गेले. कधी एकटे तर कधी दे. ना. टिळक यांच्यासह तेथे ते अनेकदा राहिले. दोघे दूरवर फिरायला जात. अशाच एका भ्रमंतीत ' निर्झर ' या कवितेचा जन्म झाला. अत्यंत उत्स्फूर्तपणे झाला. " सूर्यास्त होत होता, भोवताली किर्रर झाडी होती, अशा वेळी बालकवींना स्फूर्ती झाली— व ' दरीदरी घुमवित येई ' ही या कवितेची पहिली ओळ साभिनय म्हणण्यास त्यांनी सुरुवात केली. मग तेथेच बसून त्यांनी ती कविता पुरी केली "[१] इतक्या उत्स्फूर्तपणे जन्मलेल्या या कवितेत ' चिकित्सेपार वाटणारा गोडवा ' आणि आशयाचे जिवन्त हृदयंगम सौन्दर्य भरून राहिले असल्यास नवल ते काय ! बालकवींनी आपल्या अंगभूत बालवृत्तीने निर्झरालाही प्रथम बालरूपातच पाहिले. त्यांनी प्रौढत्वीही नकळता जपलेले हे निजशैशवच जणू या निर्झर रूपातून विलसत आहे. आणि अवखळ शैशवाचे हे बालरूप किती विलोभनीय आहे ! खडकावर लोळण घेत अंगाभवती गरगर फिरत, आणि लपत छपत हिरवाळीत शिरणाऱ्या बालनिर्झराला जणू सारी सृष्टीच शोधते आहे, तीही त्याच्यामुळे जणू नादावली आहे. पाचूंची हिरवी राने, वसन्तमंडप, वनराई, पिवळी शेते— सारीच त्याला शोधत आहेत, सामोरी येत आहेत,– गाणी गात आहेत. रे, लाडक्या, गडे–– अशा लाडिक संबोधनांनी आणि शब्दाच्या पुनरुक्तीने या बालविश्वात केवढा लडिवाळपणा भरून राहिला आहे... " खरोखर, हे बालविश्वच आहे. येथे तरूही बालतरू आहेत आणि रानफुलेही इवलाली आहेत. झरा म्हणजेच बाळकृष्ण आणि लतारूपी गोपी त्याच्यासह क्रीडा करीत आहेत..."[२] पण हे असे आणि एवढेच नाही. वृन्दावनातील कान्ह्याप्रमाणे आपल्या नादगुणाने जडतेलाही हसविणारा हा वेडा निर्झर म्हणजे कवीच्या दृष्टीने काव्यदेवीचा प्राण आहे. त्याच्या गीतात जी स्वर्गीय मोहिनी भरून राहिली आहे तिचे कविमनाला अनिवार आकर्षण आहे. कारण त्याला ती लाभलेली नाही. ज्या जीवितातून ती स्वाभाविकरीत्या उचंबळून येते ते जीवितच त्याला लाभलेले नाही....

---

१. बालकवींची समग्र कविता : प्रा. भा. ल. पाटणकर, पृ. ३१.
२ बालकवि : प्रा. द. भि. कुलकर्णी; पृ. २६, म सा. पत्रिका, १९६२.

दिव्य रसीं विरणें जीव
जीवित हें याचें नांव
तें जीवित न मिळे मातें
मग कुठुनी असलीं गीतें

...हे व्याकुळ उद्गार म्हणूनच अंतःकरणाला चटका लावतात! निर्झराने, या गुणी कविराजाने आपल्याला त्याची दिव्य गीते शिकवावी ही कविमनाची आस आपल्यालाही व्याकुळ करते.

—निर्झराने बालकवींना अखेरीस आपले ‘ अक्षयगायन ’ शिकविले की नाही कोण जाणे– पण सृष्टीची सतार मात्र त्यांची ही गीते सदैव गात राहील यात शंका नाही...

## १६. बालविहग :

त्या तेजाचा प्राण चिमुकला
संध्येचा दूत
बालविहग आनन्द मूर्तिमान्
झुलतो गगनांत

हे वर्णन सार्थ ठरावे असेच बालकवींचेही कोवळे मन जीवनाच्या त्या सोनेरी प्रभातकाळात होते. स्वच्छ, आनंदी, प्रेमपूर्ण डोळ्यांनी ते सृष्टीकडे पाहात होते. हेच उजळ मन कसे काळवंडत गेले याची कहाणी ज्या कवितांमधून गुंफली गेली आहे त्यात ‘ बालविहग ’ या कवितेस अग्रभागी ठेवावे लागेल. अनेक अर्थांनी ही कविता बालकवींची प्रातिनिधिक व सर्वोत्कृष्ट कविता होय. त्यांच्या कवित्वाचे आणि वृत्तीचेही सारेच मनोज्ञ विशेष येथे मोठ्या हृदयंगम आणि झळझळीत स्वरूपात एकवटले आहेत; सौंदर्यरूप ल्याले आहेत, बालकवींच्या साऱ्याच संवेदना या कवितेत किती तल्लख, तरळ आणि उत्कटरूपात अवतरल्या आहेत. डोळ्यांपुढे चित्र उभी करणारी दृश्यांची व रंगांची पखरण तर येथे आहेच, पण ‘ लसलशीत ’सारख्या शब्दांतून स्पर्श-संवेदनेचेही समाधान केले आहे—नव्हे हा मूर्तिमंत सुंदरतेचा जलसाच आहे असे वाटावे, असा उत्फुल्ल फुलोरा येथे

बालकवींच्या कल्पनेला आला आहे. गिरिशिखराच्या गोड फुलांतील झुलता पराग, संध्येचा दूत, जादूची फिरकी,– अशा किती कल्पना टिपाव्यात?

अष्टदिशांचा गोफ सभोंती
हा भिरिभिरि पाहे
मन्द झुले वनमाल वाहतां
शान्त झरा वाहे

या शब्दांतून तर असे दिव्य, देखणे व पूर्णचित्र निर्माण होते; पण ते नुसते डोळ्यांपुढे प्रगटूनच थबकत नाही, आपणही त्या चित्राचाच एक भाग होतो– एक घटक बनतो...निराळे, वेगळे राहूच शकत नाही. कविमनाच्या आन्तरिक तन्मयतेची ही बाधा अशी विलक्षण आहे! सोन्याहून पिवळे ऊन वाऱ्याने हालणाऱ्या हिरवळींच्या लाटांतून सोनेरी वर्ख पेरीत असावे तशी नादलय सर्व कवितेभर विखुरली आहे. केवढा ओघ, केवढे प्रवाहित्व! "बालकवींची शब्दगंगा सुन्दर व पवित्र, तशीच अप्रतिहत वाहणारी होती." हे त्यांना मानणाऱ्या एका ज्येष्ठ[1] प्रतिभावन्ताचे उद्गार म्हणूनच यथार्थ वाटतात. बालकवींच्या काव्यगुणांची साक्ष तर ही कविता देतेच, पण त्यांच्या आन्तरहृदयाची दारेही येथे मोठ्या हृदयस्पर्शी रीतीने खुली झाली आहेत. त्यांच्या आन्तर्मनाच्या खोल नाजुक आकांक्षा, हळुवार स्वप्नेही कोणताही अंतराय न ठेवता येथे शब्दाङ्कित झाली आहेत....

अचाराचे पाश मनाचे
हे गळुनी जावे
चित्त वाटते तरळ तुझ्यापरि
खगबाळा व्हावें

हे मनोगत, हे स्वगत ऐकताना डोळे पाणावतात ते यामुळेच.

'काव्यदेवता अंतरली मज गरिबाला आज' हे आतआतले दुःख उघडे होते ते येथेच, आणि 'जीव ओढतो वरवर जाया चैतन्यापाठी, हाय सुटेना

१. सौंदर्य आणि साहित्य : बा. सी. मर्ढेकर, पृ. १६१.

दृढ देहाची परि बसली गाठी ' ही अंतःकरण गुदमरून टाकणारी व्यथा बोलकी होते ती येथेच.

अंतराळात भरारणाऱ्या बालविहगाला पाहून होणाऱ्या दिव्य आनंदातही दुःखाचा उमाळा दाटतो तोही यामुळेच. स्वतःच्याच नव्हे तर मानवी जीवनाच्याच अपूर्णतेचे हे विशाल दुःख या कवितेत सौन्दर्याच्या तलम आवरणाखाली असे उघडे झाले आहे... ते पाहताना मनही तसेच सुजाण हवे, डोळेही तसेच हळुवार हवेत,- एरवी सारेच विफल होईल !

## १८. फुलराणी :

ही बालकवींची कविता रसिकांना आजही मनापासून प्रिय आहे. १९१०-११ या काळात बालकवींच्या ज्या अनेक कविता मासिक मनोरंजनातून प्रथम प्रसिद्ध झाल्या त्यांतच ' फुलराणी 'ही होती. रसिकांची मने तिने एकदा जिंकली ती जिंकलीच. त्यानंतर मराठी कविता अनेक संक्रमणांमधून, स्थित्यंतरांमधून गेली. जुन्या-नव्या मूल्यांचे आणि प्रवृत्तींचे अनेक चढउतार तिने अनुभविले पण ' फुलराणी 'चे टवटवीत सौन्दर्य आजही तितकेच ताजे राहिले आहे. ' फुलराणी 'ची जन्मकथा सांगताना प्रसिद्ध वंग-नाटककार मायकेल मधुसूदन दत्त यांच्या ' पद्मावती ' या नाटकाचा उल्लेख बालकवींच्या[1] चरित्रकारांनी केला आहे. या नाटकातील कमलिनीचे स्वयंवर-वर्णन म्हणजेच ' फुलराणी ' या काव्याचे मूळ असा निर्वाळाही त्यांनी तेथे दिला आहे. फुलराणीची ही जन्मकथा कदाचित खरीही असेल. परंतु या मूळ कल्पनेमध्ये बालकवींनी जो प्राण, जी रसार्द्रता, आणि जे भावमाधुर्य ओतले आहे ते केवळ अनुपमच नव्हे तर सर्वस्वी त्यांचेच आहे.

बालकवींनी आपल्या निसर्ग काव्यातून सदैव मानवी भावनांचा व भावानुभवांचाच आविष्कार केला, आणि आपल्याही तरळ मनाच्या पालटत्या भावावस्था त्यांनी निसर्गातील विविध रूपांतून अनुभवल्या याची प्रचीती ' फुलराणी ' या

---

१. बालकवी : कृ. बा. मराठे, पृ. १२०.

छोट्या कथा-काव्यातून अत्यंत मोहक स्वरूपात येते. रविकिरणांनी फूल फुलले ही निसर्गातील एक दैनंदिन आणि साधी गोष्ट, पण प्रा. राजाध्यक्षांनी[1] उल्लेखिल्याप्रमाणे याच साध्या गोष्टींतून बालकवींच्या स्वप्नतरल प्रतिभेने ही नाजुक प्रेमकथा निर्माण केली. बाल्य व यौवन यांच्या सीमेवर असणाऱ्या नवतीच्याच प्रान्तात बालकवी मनाने वावरत असल्याने, निसर्गालाही कधी ते बालरूप देत, कुमार मन देत, तर कधी अनोख्या यौवनातील स्वप्निल अनुभवांची जादू त्यावर टाकून, त्यालाही भुरळ घालीत...आपलेसे करीत. 'फुलराणी'त नेमके हेच घडले आहे. कवी गिरीशांनी[2] उल्लेखिल्याप्रमाणे "फुलराणी आणि रविकर ही कौमार काळातील तरुण प्रेमिकांचीच उत्कृष्ट चित्रे होत" यात शंका नाही. किंबहुना "ही एक आधुनिक स्वयंवर असून तिची नायिका आहे एक साधीसुधी निसर्गकन्या, एक साधीभोळी कळी."[3] तिच्या मिषाने बालकवींनी निरागस मनात उद्भवणाऱ्या पहिल्या कोवळ्या प्रीतीचे, तिच्या भावतंद्रीचे आणि मधुर व्याकुळतेचे चित्र अशा लाघवी तन्मयतेने केले आहे की त्याची गोडी कोणत्याही काळात अवीटच वाटावी. पंचेन्द्रियांच्याद्वारा रसिक मनाला घडणारे आणि पुलकित करणारे स्पर्श-रस-रूप-गंधाचे वैभव 'फुलराणी'मध्ये सहजपणे उधळले आहे.

'हिरवे हिरवेगार गालिचे
हरिततृणाच्या मखमालीचे'

या पहिल्याच ओळीपासून दृक् आणि स्पर्श-संवेदनेच्या पाकळ्या अलगद फुलू लागतात;– नंतरही त्या सारख्या फुलतच राहतात. कवितेतील अभ्यस्त शब्दांमुळे व "छंद आणि कल्पना यांचा दृष्ट लागण्यासारखा सुंदर मेळ" जमल्याने तिची रचना किती लयबद्ध व नादमधुर झाली आहे. साध्यासुध्या मराठी आणि प्रौढ संस्कृत शब्दांचे संमिश्र रसायनही येथे असे एकजीव झाले आहे की, विसंगतीची थोडीही बोच परिणामी उरू नये; उलट कवितेचा मिष्ट, मधुर स्वाद वाढावाच.

---

१. पांच कवि : प्रा. मं. वि. राजाध्यक्ष, पृ. २२३.
२. सह्याद्रि : प्रा. शं. के. कानेटकर; फेब्रुवारी १९३९.
३. बालकवि : प्रा. द. भि. कुलकर्णी : म. सा. पत्रिका, जानेवारी, १९६२.

बालकवींच्या इतर कवितांप्रमाणेच या कवितेनेही त्यांच्या अभ्यासकांना काही वर्णनप्रमाद आढळले आहेत. संध्येच्या आन्दोली झोके घेणारी रजनी, तानांवर ताना घेणारे कोकीळ, आणि पखवाज वाजविणारे निर्झर ही त्याचीच काही उदाहरणे होत.

कवीच्या निरीक्षणाची सूक्ष्मता इतरत्र अनुभवता येत असल्याने तिच्या अभावाचा दोषारोपही येथे करता येणे कठीण. प्रा. राज्याध्यक्षांच्याच शब्दांत कदाचित या आक्षेपालाही एक उत्तर देता येईल. काहींचे त्याने समाधान होईल, अनेकांचे होणारही नाही ! "असल्या स्वप्नाळू कवितेतील प्रतिमा वास्तव कशा असतील ? त्यांचा विलक्षणपणा हाच त्यांचा मोठा गुण. स्वप्न आणि जागृती, बाल्य आणि तारुण्य यांच्या सीमेवर नाचणाऱ्या या कवितेला घोटीव कायदे नकोत."[१]

## २१. औदुंबर :

बालकवींच्या या चिमुकल्या कवितेने रसिकांच्या चिंतनाला जसे आवाहन केले तसे त्यांच्या इतर कोणत्याही कवितेने क्वचितच केले असेल. उण्यापुऱ्या दहा ओळींची ही छोटी कविता म्हणजे कवीच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीची आणि समृद्ध संवेदनशीलतेची साक्ष देणारे एक निर्दोष आणि पूर्ण निसर्गचित्र आहे. "ज्या जिवन्त रेखीव चित्रांतून रंग नुस्ते उधळले आहेत आणि नादांचे झरे वळणे घेत वहात आहेत, निळयासावळ्या झऱ्यांची आन्दोलने आणि गतिमानता येथे शब्दांनी केवळ शब्दाङ्कितच नव्हे तर नादाङ्कितही केली आहेत."[२] अशा तन्मयतेने घेतलेल्या रसास्वादाचा एक सरळ उत्कट सूर रसिकांच्या अलीकडील अभिप्रायांमधून ऐकू येतो. तर निसर्गरम्य देखाव्याचे मोजक्या शब्दांत हुबेहूब वर्णन करणे हे कार्य कलावन्ताचे नाही; या कवितेत बालकवींनी अधिक काय सांगितले आहे हे पाहण्यासाठी ते निव्वळ निसर्गवर्णन आहे ही भावना सोडून दिली पाहिजे असा स्पष्ट इशाराही एका विद्वान अभ्यासकांनी[३] दिलेला आढळतो. त्यांच्याच शब्दात पहावयाचे तर "आधीच्या सहा ओळीं सुखातून दुःख किंवा आशेतून निराशा यांचे जे विरोधी चित्रण कवीने केले आहे

---

१. पांच कवि : प्रा. राजाध्यक्ष, पृ. २२३.

२. साहित्याचे मानदण्ड : प्रा. गंगाधर गाडगीळ, पृ. ५३.

३. साहित्य निर्मिती आणि समीक्षा : प्रा. दि. के. बेडेकर, पृ. ८-९.

त्यानंतरची एक चित्तवृत्ती शेवटच्या दोन ओळींत औदुंबराच्याद्वारे व्यक्त झाली आहे. ही तिसरी वृत्ती म्हणजे खिन्न परन्तु संन्यस्त मनाने स्थितप्रज्ञाप्रमाणे जगाकडे पाहण्याची वृत्ती. काळ्या डोहावर स्वतःच आपली छाया पसरून बसलेल्या औदुंबराच्या या सुन्दर चित्राने एकंदर कवितेच्या सर्व वर्णनाला एक पूर्तता आली आहे. कारण आशा-निराशेच्या द्वंद्वाचा अनुभव घेऊन मनाची जी अखेरची विकल अवस्था झाली तिचे उत्कट चित्र कवितेच्या शेवटच्या दोन ओळींत सुन्दर तऱ्हेने रंगविले आहे." प्रा. दि. के. वेडेकरांनी औदुंबर या कवितेत पाहिलेल्या खोल प्रतीकात्मक अर्थाला अगदी विरोधी अशी एक वेगळीच प्रतिक्रिया प्रा. द. भि. कुलकर्णी[1] यांच्या या कवितेसंबंधीच्या चिंतनामधून आढळते. औदुंबर या कवितेत बालकवींनी निसर्गाला बालरूप दिले आहे असा त्यांचा आग्रह आहे. त्यांच्या मते बाळकृष्णाप्रमाणेच हा निळा-सावळा झरा मोठा अल्लड असून या हाती हिरवळ, त्या हाती हिरवळ घेऊन वाटेतील बेटांना चुकवीत तो पळत आहे. या पहिल्या दोन ओळींत निसर्गाचे अतीव प्रसन्न व गतिशील चित्र बालकवींनी रेखाटले. झऱ्यावर त्यांनी बालकाचा प्रत्यक्ष अध्यारोप केला नाही पण त्यांच्या अंतर्मनाने झऱ्याच्या गतीत, हुलका-वणीत व आनंदात बालसदृश काही तरी पाहिले; म्हणूनच जाणिवेशी निगडित असलेला रूपक अलंकार येथे न येता बालकवींच्या बालमनातील झुळकेने फक्त या ओळी गंधित झाल्या. येथेही बालकवी बालकाच्याच डोळ्याने निसर्गाकडे पहात आहेत, आणि निसर्गात त्यांना बालक्रीडेचा साक्षात्कार होत आहे.

औदुंबर या कवितेसंबंधी रसिक आणि साक्षेपी अभ्यासकांनी आपल्या चिंतनामधून केलेली ही तिन्ही भाष्ये आपापल्या परीने अर्थपूर्ण आणि मार्मिक आहेत. कवितेकडे रसिक वळतो तो स्वतःच्याच मनाची आणि व्यक्तिमत्त्वाची सामग्री घेऊन; या सामग्रीच्या भिन्नतेमुळे त्याच्या चिंतनात आणि आकलनातही अपरिहार्य असे अंतर पडते याचेच हे सुस्पष्ट उदाहरण होय. परंतु मोकळ्या स्वागतशील मनाने या सुंदर कवितेला सामोऱ्या जाणाऱ्या वाचकांनी येथे उल्ले-खिलेल्या कोणत्याही अर्थाचा अडसर आपल्या रसिकतेला आणि आकलनाला

---

१. बालकवि : प्रा. द. भि. कुलकर्णी, म सा पत्रिका, जाने. १९६२, पृ. २८.

घालू नये हेच खरे. या चिमुकल्या कवितेची नाजुक चित्रमयता, तिच्या शब्दा-शब्दांतून सापडलेली रंगांची गहिरी पखरण, तिच्यातील अल्पाक्षर रमणीय काव्य, आणि तिच्या नादाची अत्यंत उस्फूर्त लय हे सारेच सच्च्या कवितेचे गुणविशेष येथे इतके बोलके आणि चित्रमय झाले आहेत, "कलावंताचा हात आणि चित्रकाराची दृष्टी" कवीने अशा कौशल्याने येथे वापरली आहे की तिच्या निखळ सौंदर्यस्वादासाठी कोणत्याही मार्गदर्शनाची आवश्यकताच रसिकाला पडू नये.

## ३२. खेड्यांतील रात्र :

बालकवींच्या या चिमुकल्या कवितेने आधुनिक समीक्षेला मोठेच आव्हान दिले यात शंका नाही. बा. सी. मर्ढेकर[1] यांनी "सौन्दर्य व साहित्य" या आपल्या ग्रंथामध्ये आपण आधीच मांडलेल्या वाङ्मयसमीक्षेच्या आधारे एखाद्या वाङ्मयीन कृतीचे समीक्षण करावे, प्रात्यक्षिक दाखवावे, असे ठरवून 'खेड्यांतील रात्री'चे जे समीक्षण केले ते रसग्रहणाच्या स्वरूपाचे नसूनही मराठीतील काव्यसमीक्षणामध्ये अत्यंत महत्त्वाचे मानले गेले आहे. या समीक्षणासंबंधी पुढेही काही चर्चा 'सत्यकथा' या मासिकातून झाली. ही चर्चा करणाऱ्या रसिक अभ्यासकांमध्ये प्रा. माधव आचवल,[2] श्री. प्रभाकर पाध्ये, प्रा. संभाजी कदम यांचा निर्देश आवर्जून करावयास हवा. मर्ढेकरांनी आपल्या समीक्षणात, शब्दांच्या गुणवत्तेच्या व शक्तीच्या अभ्यासावर विशेष भर दिला आहे. हे रसग्रहण त्यामुळे काहीसे एकाङ्गी व त्रोटक झाले आहे. संश्लेषणापेक्षा विश्लेषणावर त्यात स्वाभाविकपणे अधिक भर दिला गेला आहे. प्रा. आचवल यांनी अनुभवाच्या प्रसरणशील व स्थितिशील आकारांवर भर दिला असून त्या अनुरोधाने त्यांतून उद्भवणाऱ्या अर्थग्रंथी, त्यांतील लयतत्त्व, व अर्थाकृती यांचा विशेष विचार केला आहे. त्यांच्या मते सजीव आणि निर्जीव सृष्टीतील जडतेच्या भक्कम पायावर जे जे म्हणून टिकून राहील अशी अपेक्षा होती, ते ते ढासळून नष्टप्राय होत असलेले या कवितेच्या पहिल्या कडव्यात दिसते. दुसऱ्या कडव्यात श्रुतिसंवेदनेला आवाहन केले आहे. ही श्रुतिसंवेदना तरी कशी ? निःस्तब्धतेतून आवाजाचे

---

१. सौंदर्य व साहित्य; बा. सी. मर्ढेकर : पृ. १०९.

२. मर्ढेकरांचा वाङ्मयविचार; प्रा. माधव आचवल, सत्यकथा, ऑक्टो. १९६२.

भेसूर विडंबन करावे अशी ! तिसऱ्या कडव्यात दृक्संवेदना व श्रुतिसंवेदना यांच्या आवाहनांचा समन्वय साधला असून विचित्र, भयाण नि निःशब्द दबा धरणाऱ्या अदृष्टाच्या संदिग्धतेमुळे तो अर्थ भारावला आहे. म्हणजे अनुभवाच्या आकारांना मनोज्ञ गुंतागुंतीने गुंफून लयतत्त्वाच्या उपयोगाने बालकवी अर्थाचा एक सुंदर पक्षबंध या कवितेत गुंफून गेले आहेत.

प्रा. कदम व श्री. पाध्ये यांनीही या संदर्भात आपल्या काही चिंतनांची स्वतंत्र भर घातली आहे. परंतु प्रा. आचवलांनी उल्लेखिल्याप्रमाणे कविता ही एक सचेतन कृती आहे, सचेतनात हा तिचा प्राण आहे, त्यामुळेच तिला अनेक परिमाणे लाभणे शक्य होते. वातावरणनिर्मितीचे बालकवींचे सामर्थ्य विलक्षण प्रत्ययकारी रीतीने आणि समर्थपणे या कवितेत शिगेस पोहोचले आहे. खेड्यातील त्या रात्रीची, त्या उजाड माळाची बाधा इतकी सांसर्गिक आहे की आपल्या मनाचा पुरता ताबा घेतल्यावाचून ती रहात नाही. ‘अस्मान मिळालें धरणीं’ —‘आर ना पार’ असा तो “रात्रीचा अवकाळ प्रहर” आपल्यालाही जणू झपाटून टाकतो, पछाडून टाकतो;– आणि कवितेने तरी याहून अधिक काय करावयाचे असते ?

## ४१. प्रीति हवी तर :

यौवनाच्या ऐन भरात ज्याची काव्यप्रतिभा मोहरली, त्या तरुण कवीच्या काव्यसंभारात खरीखुरी प्रेमकविता दुर्मिळ असावी हा योग आश्चर्यकारी वाटला तरी तो सत्य आहे. निसर्गाच्या विविध क्रीडांचे आणि विलसितांचे चित्रण करताना धुंदावलेली—मुक्त झालेली त्यांची लेखणी, त्यांची वाणी प्रत्यक्षतः जेव्हा प्रेमविषयाकडे वळते तेव्हा मात्र ती कुंठित होते, अवरुद्ध होते. तिचा अनिरुद्ध प्रवाह जणू खण्डित होतो. आत्माविष्काराच्या वाटेने प्रेमानुभवाचा, प्रेमी व्यक्तीचा ध्यास उत्कटपणे शब्दाङ्कित करण्याऐवजी प्रीतीच्या शाब्दिक तत्त्वज्ञानात तो घुटमळू लागतो; प्रेमकल्पनेचाच पाठपुरावा करतो, सच्च्या अनुभूतीच्या जिवंत आविष्काराला पाठमोरा होतो.

‘प्रीति हवी तर’ या कवितेची हीच गत झाली आहे. अंतर्यामीची खरीखुरी हाक जेव्हा पारखी होते, हरवून जाते, तेव्हा आवाजाची पट्टी अकारण चढते;

उच्च सुरात, वरच्या टिपेत बोलू लागते. या कवितेत नेमके हेच घडले आहे; आणि पाखरासारखी सहजमधुर वाणी लाभलेल्या बालकवींकडून असे काही स्वीकारावे लागते तेव्हा त्यातील तीव्रता अधिक जाणवते. प्रीति हवी असेल तर सर्वस्वाने बलिदान करण्याची तयारी हवी, हा सिद्धान्त बिंबवण्यासाठी बालकवींनी ठाशीवपणाचा, अतिशयोक्तीचा, नाटकी, भडक विधानांचा आश्रय शब्दाशब्दांतून घेतला आहे..

तलवारीची धार नागिणी लसलसती प्रीत
याद ठेव अंगार जगाला लाविल निमिषांत...

आणि तसे करताना जे अत्यंत सहजपणेच त्यांना गवसले असते तेच त्यांनी पुरते गमावले आहे. प्रीतीच्या कठोर व्रताचा संस्कार आणि प्रभाव मनावर पडण्याऐवजी येथे परिणाम होतो तो अत्युक्तिपूर्ण शब्दांच्या आतषबाजीचा! आणि गडकऱ्यांच्या नाटकांतील एखादा उताराच छंदोबद्ध झाला आहे काय— अशी शंका बालकवींच्या चहात्यांच्याही मनात आल्यावाचून राहात नाही! जिवंत अनुभूतीचा चैतन्यमय स्पर्श पारखा झाला की शब्द- केवळ शब्दच कसे उरतात, कसे निष्प्राण वाटतात याचीच ही साक्ष!

### ४८. मोहिनी :

या शीर्षकाखाली ज्या पद्यपंक्ती आढळतात त्या एखाद्या खण्डकाव्याच्या आरंभी असाव्यात असा तर्क "बालकवींच्या समग्र कविते"च्या संपादकांनी[1] केला आहे. स्फुट कवितेला सहजगत्या आपलीशी करतानाच दीर्घ रचनेचे प्रयोगही बालकवी करीत होते. गोविंदाग्रजांच्या कथाकाव्याप्रमाणेच बालकवींची ही रचनाही अपूर्ण राहिली असली तरी त्यांच्या निखळ काव्यात्मतेचे मोठे मनोज्ञ विशेष या अपुऱ्या रचनेतूनही व्यक्त होतात. मोहिनी या काव्यखंडाची सुरुवातच किती काव्यमय, किती आकर्षक आहे!

या शुभ्र विरल अभ्रांचें। शशिभंवतीं नर्तन चाले,
गंभीर धवळली रजनी। बेभान पवनही डोले;

१. बालकवींची समग्र कविता : सं. पार्वतीबाई ठोमरे, पृ. १७८.

तंद्रींतच अर्धीमुर्धी । लुकलुकते ताराराणी
ये झुंजुमुंजु तेजानें । पूर्वेवर पिवळें पाणी

धुक्याने वेढलेल्या सृष्टीसारखे केवढे गूढ, उदात्त आणि वेडावून टाकणारे सौंदर्य या शब्दाशब्दांतून ओसंडत आहे! डोळ्यांपुढे केवळ चित्रच उभे रहात नाही,– तर " ये झुंजुमुंजु तेजानें । पूर्वेवर पिवळें पाणी ... " अशा शब्दांनी जे वास्तव, जे सत्य तेच स्वप्नासारखे अस्पष्ट वाटू लागते आणि कवितेतील स्वप्निल जगच सत्याभास लेवून आपल्याभोवती नर्तन करू लागते... गूढमधुर वातावरणनिर्मितीची ही किमया बालकवींना पूर्णत्वाने साधली होती यात काय शंका? बालकवींनी निसर्गाचे मानवीकरण सर्वत्र आणि सदोदित केलेच परंतु

'इवलाच अधर हलवून जल मन्द सोडितें श्वास
इवलाच वेल लववून ये नीज पुन्हा पवनास'

या शब्दांनी सृष्टीला बहाल केलेले नाजुक प्राणतत्त्व, कोवळे चैतन्य केवळ असाधारण वाटते...शब्दांची जादू तर येथे अक्षरशः कवितेत वर्णिलेल्या चंद्रकिरणांसारखीच आशयाशी एकजीव होऊन 'विरघळून' राहिली आहे...

" अलवार कोवळे अंग जशि काय फुलांची मूस " या शब्दांतून जे व्यक्त होते त्याखेरीज, सांगण्यासारखे अधिक ते काय उरले आहे असे वाटावे इतके हे शब्द येथे बोलके झाले आहेत; आणि तरीही ते वाचाळ मात्र नाहीत. धवळली, अलवार, इवला अशा समर्पक शब्दांनी ही आगळी रंगत वाढली आहे. फार काय, 'लागला दुखाया ऊर' यातील 'दुखाया' हा प्रयोग साधा असूनही किती अर्थवाही वाटतो. अंतरीच्या वेदनेत शरीरदुःखाची कळ येथे न कळता मिसळली आहे. बालकवींची अंगभूत लय, त्यांचा नादगुण यांची प्रचीती येथेही येते, एवढेच सांगितल्याने या काव्यखण्डाचे नितान्त माधुर्य पुरेसे व्यक्त होणार नाही. त्यासाठी,

पायांत रुप्याचा तोडा । ये थबकत थोडाथोडा
युवराज विजयसिंहाचा । झाडीतुनि पिवळा घोडा ।

या व अशा ओळींच ठेक्यात वाचावयास हव्यात! कथाकाव्यात रसिकाची

८

वेधकता वाढविण्याचा गुणही असावा लागतो; तोही येथे अवतरला आहे. मात्र काव्य अपूर्ण राहिल्याने त्या वेधकतेची पूर्ती मात्र होत नाही– हे रसिकांचे दुर्भाग्य !

## ५१. 'तूं तर चाफेकळी'

"ही कविता अपूर्ण राहावी याची रसिकाला नेहमीच टोचणी लागेल, तो कल्पनेने ती पूर्ण करू पाहील, पण कल्पनाही पांगळी पडावी अशी काही तरी जादू या थोड्या ओळींत आहे"[१] या शब्दांत मनःपूर्वक गौरविले असताही जिच्याठायी भरून राहिलेली माधुरी पुरेशी व्यक्त झालीच नाही असे वाटावे अशी बालकवींची ही एक अप्रतिम कविता 'तूं तर चाफेकळी'! कवितेचे नावच कसे सुकुमार आणि नाट्यपूर्ण आहे,– कुतूहल जागे करणारे. बालकवींचे हे जवळ-जवळ एकमेव आणि अत्युत्कृष्ट नाट्यगीत. निःश्वास, मोहिनी इत्यादी त्यांची कथाकाव्ये अपूर्ण राहिल्याची खंत जशी रसिकाला वाटत राहते तशीच ती या देखण्या नाट्यगीताबद्दलही वाटते. पण त्याच्या अपुरेपणातही जे सौंदर्य आहे ते वाऱ्यावरून आलेल्या मधुर लकेरीचे आहे, ढगाआडून डोकावणाऱ्या चंद्र-कोरीचे आहे. बालकवींचे हे नाट्यगीत जसे नितान्तमधुर आहे तसेच ते नितान्त-सुंदरही आहे. कारण त्यातील प्रत्येक शब्दाला स्वतःचे माधुर्य आहे, आणि स्वतःचे लावण्यही आहे. मोत्यांच्या टपोऱ्या माळेतील प्रत्येक वेचक पाणीदार मोत्यासारखा एकेक शब्द यात कसा अचूक पडला आहे; आणि त्या एकेका शब्दाचे माधुर्य एकवटून या कवितेची वेडावून टाकणारी लय निर्माण झाली आहे. मोहोळातून ठिबकणाऱ्या एकेक मधुबिंदूतून एक वेगळेच मोहोळ तयार व्हावे तशी! या कवितेतील एकेक शब्दाला स्वतःचे असे सौंदर्य आहे, कारण प्रत्येक शब्द हेच एक चित्र आहे!– आणि किती देखणे चित्र! चित्रमयता आणि नादमाधुर्य या वापरून वापरून शिळया झालेल्या शब्दांचा मूळ अर्थ येथे पुन्हा सजीव झाल्यासारखा वाटावा अशा स्वरूपात हे दोन्ही गुणविशेष या कवितेच्या अनुपम नादलयीतून व चित्रमयतेतून साकार झालेले आहेत. लाडिक आर्जव व नाट्यमयता तर येथे शिगेस पोहोचलेली दिसतात. बाह्यात्कारी भाबड्या वाटणाऱ्या चतुर संवादांची ही ठेवण पहा–

१. पांच कवि : प्रा. मं. वि. राजाध्यक्ष, पृ. २२७.

ती वनमाला म्हणे नृपाळा,
'हे तर माझे घर
पहात बसते मी तर येथे
जललहरी सुन्दर'

'तर' हे व्याकरणातील साधे अव्यय इतके लडिवाळ आणि स्निग्ध होऊ शकेल असे या कवितेतील त्याचे रूप पाहण्यापूर्वी आणि त्याचा नाद ऐकण्यापूर्वी कोणाला वाटले असते ?

वनमालेने गर्द रानात नदीकाठी असू नये तर असावे तरी कोठे ? एवढा सारा मोहक अर्थ या 'तर'मध्ये सामावला आहे. चाफेकळी, जळी, गळा, लळा, हरिणी, साजणी, या शब्दाशब्दांतून अनुप्रासमूलक माधुर्य जणू उतू चालले आहे. आणि कवितेची धुंदी ही दर ओळीगणिक कशी वाढत आहे...चढत आहे...वातावरणनिर्मिती या शब्दांतून जे ध्वनित होते– ते अशा मधुर कवितेत मूर्तिमन्त प्रगटलेले दिसते. आपल्यापुढे असलेल्या या अपुऱ्या कवितेचा शेवट

'भुलले तुजला हृदय साजणी
चल ये माझ्या घरी'

या चटका लावणाऱ्या आकर्षक ओळीने होतो; पण मनाची वाढलेली उत्सुकता पुढे पूर्ण मात्र होऊ शकत नाही. ज्या सुन्दर गोष्टी नेहमी अपुऱ्याच राहतात, आणि ज्यांच्या अपुरेपणातही एक मोहिनी भरून राहिलेली असते अशी ही एक देखणी पण अपूर्ण कलावस्तू.

**७२. 'पांखरास'; ७४ 'पारवा':**

बालकवींच्या रसास्वादामध्ये, त्यांच्या उदासीनतेच्या गीतांकडे महाराष्ट्राचे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे असे परखडपणे सांगून या कवितांकडे रसिकांचे लक्ष माधव जूलियन्[१] यांनी प्रथम वेधले आणि बालकवी म्हणजे आनंदाची गाणी गाणारा कवी, हे सरळ समीकरण त्यांची काव्यव्यक्ती अजमावताना अपुरे पडेल ही जाण वाचकांमध्ये प्रथम निर्माण केली.

१. अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक; डॉ. मा. त्र्यं. पटवर्धन, पृ. २६.

'हृदयाची गुंतागुंत', 'शून्य मनाचा घुमट' या कवितांप्रमाणेच 'पाखरास' आणि 'पारवा' या कवितांचाही अंतर्भाव या उदासीनतेच्या गीतांमध्येच करिता येईल. निसर्गाच्या मिषाने बालकवींनी येथेही आपल्या अंतरीची व्यथाच मुखर केली आहे. रसास्वादासाठी या दोन कविता येथे एकत्रित आणल्या याचे कारण त्या पक्षांसंबंधाच्या कविता आहेत एवढेच नव्हे, या दोन्ही कवितांत भरून राहिलेला खिन्नतेचा– वैफल्याचा सुर एकच आहे; आणि तरीही त्या खिन्नतेचे पोत मात्र वेगवेगळे आहे. रविवदनावरचा रंग बदलण्यापूर्वीचे आणि बदलल्या नंतरचे सृष्टीचे द्विविध रूप 'पांखरास' या कवितेत तीव्र आणि विदारक विरोधाने कवीने रेखाटले आहे. सुखाचे, आनंदाचे सोबती सारेच असतात, दुःखाचा वाली मात्र कोणीही नसतो, हे सांगताना गिरिकुहरात रडणाऱ्या मत्त कोकिळांची आणि माना मोडून पडलेल्या कोवळ्या कळ्यांची चित्रे मोजक्याच शब्दांच्या फटकाऱ्याने अशी चितारली आहेत की अंगावर भयसूचक काटा उभा रहावा! मात्र त्याबरोबरच प्रभातरेषेवर, कळ्यांचा मुगुट घालून उभ्या राहिलेल्या पूर्वतारकेचे, सौंदर्यदेवतेचे चित्र असे संपन्न आणि खानदानी दिमाखाचे आहे की पहातच रहावे! अशाच दुसऱ्या मनोहर सृष्टिरूपाचे चित्रण करताना निद्रिस्त भूमीचे 'लाडके सुंदर डोळे'ही भिजवून टाकणारे हे जणू स्वप्नच तिला पडले आहे ही कल्पनाही आपल्या सौंदर्याने रसिकाला खिळवून टाकते. ऋतुचक्र फिरत राहते... दिवसमास उलटतात, पण पारव्याचे 'हूं हूं'चे गीत मात्र सारखे वहातेच आहे... निष्प्रेम मनाच्या या केविलवाण्या गीतासाठी, 'वहाते' हे क्रियापद किती असाङ्केतिक परंतु किती अन्वर्थक आहे! निष्प्रेम मनाला सुख कोठेच नाही, शान्तिलेश त्याला ठाऊकही नाही; फरारा आलेल्या गोफणीने एक दिवस त्याचे भग्न हृदय काट्यावर उपडे पडले तेव्हाच त्याचे गाणेही थांबले, तोवर नाही. बालविहगासारख्या कवितेवर आलेले दुःखाचे सावट येथे अधिकच गडद झाले आहे; कारण हे विफलतेचे गाणे आहे. संवेदनाशील व्यक्तीच्या किंवा कलावंताच्या वाट्याला अपरिहार्यपणाने येणारी हीच विफलता,–ज्या विफलतेच्या गीताला मृत्यूवाचून दुसरा शेवट नाही, दुसरी समाप्ती नाही.

'पारवा' या गीताचे रसग्रहण, बालकवींचे एक भक्त आणि प्रतिभावंत कवी बा. सी. मर्ढेकर यांनी मोठ्या तन्मयतेने केले आहे. उन्मन करणारी तादात्म्याची खूण जेव्हा कवितेत उमटते, तेव्हा काव्यमय म्हणून शिक्का बसलेल्या सुललित

शब्दांच्या निर्जीव पोपटपंचीप्रमाणे ती वाचा फोडीत नाही किंवा तिचा भर आवेशपूर्ण शब्दांवरही असत नाही; तर तिची उत्कटता व प्रेरणा लेखकाच्या शब्दशक्तीची मान वाकवून तिला प्रामुख्येकरून अर्थवाहिनी करण्यात फलद्रूप होते, अशा अत्यंत समर्पक शब्दांत 'पारवा' या कवितेतील बालकवींची संवेदन-क्षमता आणि एकरूपता त्यांनी गौरवली आहे. लक्ष वेधून घेणाऱ्या चार ओळींच्या पहिल्याच कडव्यात संवेदनेला जाग आणणाऱ्या प्रत्येक वस्तूत एक एक विचार-प्रेरणा आहे; आणि या साऱ्या दृश्यापासून कौलारावर बसलेल्या पारव्याकडे स्वाभाविक सरलतेने वाहतो आहे– येथे तादात्म्याचा अभाव नाहीच, त्यामुळे त्यावर पांघरूण घालण्याचीही आवश्यकता नाही. पारवा हाच कवीच्या तादात्म्याचा केन्द्रबिंदू आहे याबद्दल रसिकमनांत यत्किंचितही संदेह उरत नाही असाच या कवितेचा आकृतिबंध निर्माण झाला आहे. मध्याह्नी नभात उभा असलेला सूर्य, त्याभोवती मण्डल घालणारी घार, पानांच्या शान्त सावल्यांत सुखाने साखर-झोपेत पेंगणारे पक्षी– या साऱ्या प्रतिमा या केन्द्रबिंदूभोवती फिरणाऱ्या वर्तुळा-सारख्या आहेत.

चित्त किंवा तव कोवळ्या विखारें
दुखत खुपतें कां सांग सांग बा रे

या हळुवार प्रश्नातील आर्तता इतकी हृदयस्पर्शी वाटते,– कारण कविमनाच्या कोवळ्या विखारामधूनच तिचाही उगम झाला आहे. सांग–सांग या पुनरुक्तीने या प्रश्नाला असहाय निर्वाणीची एक वेगळीच धार चढली आहे. पक्ष्याला सुखनिद्रा लागल्याने त्याचे जगही झोपी जाते; कवीच्या भावविश्वात मात्र ऊष्ण वारे वाहते आहे...या शेवटच्या सुरापाशीच ही कविताही थांबते. बालकवींच्या ज्या अपूर्ण कविता अन्तःकरणाला अधिकच चटका लावतात त्यांत हा पारवा दृष्टिआड कसा करवेल ?

## ७३. उदासीनता :

शुद्ध भावकविता पहायची आहे तुम्हांला ? अनुभवायची आहे ? तर मग बालकवींच्या 'उदासीनते'कडेच वळले पाहिजे आपल्याला. अवघ्या बारा ओळींची ही चिमुकली कविता; संवेदनाशील मनावर वेळी–अवेळी

आपले सावट आणणारी एक भाववृत्ती, एक भावावस्था उण्यापुऱ्या बारा ओळींच्या या काव्यविश्वात मूर्तिमंत अवतरली आहे, साकारली आहे. अत्यंत साध्या, सहज, अहेतुक पावलांनी आली आहे, बिंबली आहे. अशी बिंबली आहे की, वाचता वाचता ती आपल्या मनातही कशी ठसते, कसे एक व्याकुळ वादळ घुसमटून टाकते हे आपल्याला कळूही नये! अन् आपल्याला कळू नये हेही स्वाभाविकच नव्हे का? अनुभवणाऱ्याला तरी ते कोठे कळले आहे? काय आहे, कुठून येते आहे, कसे आहे, हे बालकवींना तरी कळले होते का? नाही म्हणून तर स्वतःशीच बोलावे तसे हे अत्यंत साधे उद्गार उमटतात—

**कोठुनि येते मला कळेना, ही उदासीनता हृदयाला**
**काय बोचतें तें समजेना, हृदयाच्या अंतर्हृदयाला**

काही तरी बोचत आहे, खुपते आहे, सलते आहे; कसली तरी अनामिक छाया चित्ताच्या आकाशावर दाटून येते आहे, काही तरी झाकोळते आहे, काळवंडते आहे. पण ते सारे आहे अबोध...अनाकलनीय...अव्यक्त...! मनाच्या पृष्ठभागावर कदाचित त्याचा एक इवलासा तरंगही दिसणार नाही... आहे ते सारे आत,–आत-आत, हृदयाच्या अंतर्हृदयात! काय हवे आहे या हृदयाला? कोठून हवा आहे दिलासा,–विसावा? या दृष्टिगोचर विश्वात तर तो दिसत नाही, मिळत नाही; मग तो त्या दुसऱ्या लोकात तरी असेल का?– तेही समजत नाही. कसे समजावे? मनाचे वारे वाहते आहे, कुठे तरी झुकते आहे, कलते आहे,– कुणाला तरी हाकारते आहे, पण ती हाक कुणासाठी आहे हे या बापड्या जीवालाही समजत नाही. मग त्या हाकेला उत्तर तरी कोठून मिळणार? ती हाक जीवाची आहे; आतल्या जीवाची आहे,– बाहेर उमटतही नाही. पण मुक्या मनाची शब्दात न उमटणारी ती मुकी हाक मात्र अंतःकरणाला घरे पाडते...घायाळ करते...तीव्र वेदनांचे मोहळ खवळून उठते...जीवाला कळा लागतात. कोणती दिव्य स्वर्गीय औषधी या कळा थांबवणार आहे,– या वेदना शमवणार आहे,– निववणार आहे?

कविता इथे संपते. इथेच ती संपायला हवी. शब्दात पकडलेली ही काही क्षणांचीच एक भाववृत्ती आहे,– यापलीकडे तिला ताणणे म्हणजे तिचा कोवळा जीव दुखविणे! (बालकवी ते कसे करतील?) ही कविता उत्तर न गवसणारा

एक घायाळ प्रश्नच होय;– ज्या प्रश्नाचे पडसाद आपल्याही मनात नकळता घुमत राहतात. ही अस्थिर, कातर भाववृत्ती शब्दांत पकडताना एक शब्दही येथे अधिकउणा खपणार नाही, याची पुरेपूर जाण कवीला अंगभूतच आहे; शिकवून न येणारी, मूळचीच असणारी, स्वयंप्रेरणेनेच येणारी ही जाण आहे... प्रत्येक शब्द अत्यंत साधा आहे, निरलंकृत आहे. कारण अलंकारांचे ओझे या कवितेला नव्हे या भाववृत्तीलाच खपणारे नाही याचीही जाणीव कवीला आहे. एकलक्षी शुद्ध मनाने केवळ एका भावानुभवाचा वेध येथे घेतला आहे... नव्हे भावक्षणांचा ! कोणत्याच 'भावबाह्य, कलाबाह्य प्रयोजनांचा अडसर त्यापुढे आलेला नाही. म्हणूनच ही शुद्ध कला आहे,– शुद्ध भावकविता आहे.

# बालकवींविषयक साहित्याची सूची

## बालकवींची कविता :

बालकवींची समग्र कविता, भाग १, "मधुगीते"–संपा. ए. या. निफाडकर, १९२३.

बालकवींची कविता– संपा. गो. गो. अधिकारी, १९२५.

बालकवींची समग्र कविता– संपा. प्रो. भा. ल. पाटणकर, आ. १– १९४२.

समग्र बालकवी– संपा. पार्वतीबाई ठोमरे, १९६६.

*काव्यरत्नहार, सर[१]– गो. गं. पोतदार.

बालकवींसंबंधीं ग्रंथ–प्रबंध

बालकवि [ काव्यसमीक्षणात्मक प्रबंध ]– रा. शं. वाळिंबे, मे १९५०.

बालकवि [ " ]– कृ. बा. मराठे, १९६२.

## बालकवींसंबंधी ग्रंथान्तर्गत निर्देश :

बालकवी– ग. त्र्यं. माडखोलकर, "आधुनिक कविपंचक", भा. १–१९२१, भा. २–१९२६, पृ. १४३, १७६.

---

१. प्रस्तुत सूची समग्र नाही. तथापि तशा सूचीस ही साहाय्यक व्हावी अशी अपेक्षा आहे. त्याच दृष्टीने कृ. बा. मराठे यांच्या "बालकवि" या पुस्तकातील संदर्भ-सूचीतील काही नोंदी, अपुऱ्या असूनही, त्यांचा यात समावेश केला आहे. मात्र अशा नोंदींमागे* अशी खूण केली आहे. 'साहित्य-सहकार' या लेखांतील 'नियतकालिकांतील लेखांच्या सूची'चा प्रस्तुत सूचीच्या कामी चांगला उपयोग झाला आहे.

मराठी साहित्यावरील इतिहास-ग्रंथांत, टीका-ग्रंथांत, मराठी काव्यावरील ग्रंथांत, तत्संबद्ध लेखांत बालकवींचा निर्देश, त्यांच्या काव्यासंबंधी काही विवेचन अनेक ठिकाणी आले आहे. कवितांच्या वेगवेगळ्या स्वरूपाच्या संपादित वेच्यांतही बालकवींच्या काव्याविषयी काही विवेचन, टिपण आढळते. अशा सर्वच ठिकाणांची येथे नोंद केलेली नाही. प्राधान्याने किंवा विशेषत्वाने जेथे बालकवींविषयी काही विवेचन आहे अशा ठिकाणांचीच तेवढी येथे नोंद केली आहे.–सूचीमधील उपविभागातील नोंदी सामान्यतः कालानुक्रमाने केल्या आहेत.

स्मृतिचित्रें-- भा. ३— लक्ष्मीबाई टिळक, [ प्रकाशन १९३४ ते १९३६ दरम्यान ] पृ. ५०–२६; ७८–८४.

अर्वाचीन मराठी काव्य— रा. श्री. जोग, आ. १–१९४६; पृ. ९६–१०२.

पाच कवि— संपा. मं. वि. राजाध्यक्ष, भा. १–१९४६. पृ. १६२–१६५, २२१–२२८ ( टीपा )

आधुनिक मराठी कविता– भ. श्री. पंडित, भा. १–१९५२, पृ. १३५–१३८.

आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, अ. ना. देशपांडे, भा. १–१९५४, पुनर्मुद्रण १९६७, पृ. ३२६–३३६.

## चरित्रात्मक आणि काव्यविवेचनपर लेख :

महाराष्ट्राचा बालकवी— का. र. मित्र, ' मसिक मनोरंजन '.

महाराष्ट्राचा बालकवी— ना. वा. टिळक, ' मासिक मनोरंजन ', मे १९१८, पृ. ४२५–४३२.

बालकवींची कविता— वि. ल. बर्वे, उद्यान, जुलै १९२०.

माझा- छे ! महाराष्ट्राचा बालकवी— के. म. सोनाळकर, [ " बालकवींची समग्र कविता " भा. १, १९२३, प्रस्तावना, पृ. अ–ऋ. ]

" बालकवींची समग्र कविता " [ पुस्तक-परीक्षण ]— शारदाश्रमवासी ' महाराष्ट्र साहित्य ', मार्च-एप्रिल १९२४.

रा. ठोमरे ऊर्फ बालकवी यांची कविता— श्री. म. माटे, [ " बालकवींची कविता ", संपा. गो. गो. अधिकारी, १९२५, प्रस्तावना, पृ. १–१८ ]

बालकवींची कविता— के. ल. टेंभुर्णीकर, " काव्यचर्चा " [ १९२५ ] पृ. २५७–२७०.

बालकवींची कविता— ना. के. बेहेरे, " काव्यचर्चा " [ १९२५ ] पृ. २७१–२८०.

बालकवि ठोमरे यांचीं अप्रकाशित काव्यें ( १ )— संग्राहक ' दिवाकर ', ' रत्नाकर ', नोव्हें. १९२६.

बालकवी आणि निसर्ग— बा. रं. सुंठणकर, चौदावे महाराष्ट्र साहित्य संमेलन, बेळगाव, अहवाल १९२९, पृ. २७–२८.

बालकवींच्या काव्यातील सौंदर्यस्थळें— वा. दा. पंडित, ‘ विहंगम ’, ( व. ४, अं. १० ), ऑगस्ट १९३७.

बालकवी— व्यक्ती व प्रकृती— कृ. बा. मराठे, ‘ ज्योत्स्ना ’, जाने. १९३८, पृ. ७२०–७२४.

ठोमरे त्र्यंबक बापूजी ( बालकवी )— माधव त्र्यंबक पटवर्धन, “ अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक ”, खं. २ ( प्रका. १९३८ ) पृ. १७–३४.

बालकवींवर नवा प्रकाश— पद्मनाथ टोळे, ‘ ज्योत्स्ना ’, जाने. १९४१, पृ. ३४–३८.

“ बालकवींची समग्र कविता ” [ परीक्षण ]— रा. श्री. जोग, ‘ सह्याद्री ’, एप्रिल १९४२.

महाराष्ट्राचा बालकवी— ‘ दीपावली ’, मे १९५९.

बालकवींची असंकलित कविता [ लेख व कविता ]— कृ. बा. मराठे, ‘ छंद ’, आश्विन-कार्तिक १८८१ ( व. ६, अं. १ ), पृ. १४–२१.

बालकवी : एक ध्वनिचित्र— वा. ल. कुलकर्णी, ‘नवयुग’, दिवाळी, १९५९.

महाराष्ट्राचा शेले : बालकवी— कृ. बा. मराठे, ‘ मनोहर ’, जून १९६०.

बालकवींची कविता-–गंगाधर गाडगीळ, ‘ मनोहर ’, मे १९६१ [ समाविष्ट “ साहित्याचे मानदण्ड ”, सप्टें. १९६२, पृ. ४३-६६ ]

बालकवींचा निसर्ग— ग. वि. अकोलकर, ‘ भालचंद्र ’, दिवाळी अंक १९६१.

बालकवींच्या निसर्ग-कवितेचें आकलन-–रा. ग. जाधव, ‘ प्रतिष्ठान ’, डिसें. १९६१.

बालकवी— द. भि. कुलकर्णी, ‘ महाराष्ट्र साहित्य पत्रिका ’ ऑक्टो.-डिसें. १९६१.

बालकवी—द. भि. कुलकर्णी, ‘ महाराष्ट्र साहित्य पत्रिका ’, जाने. ११६२.

पंखातला काळोख— त्र्यं. वि. सरदेशमुख, ‘ सत्यकथा ’, फेब्रु. १९६२ [ समाविष्ट, “ अंधारयात्रा ” १९६८, पृ. २३–४१ ].

“ बालकवी ” [ समीक्षण ] मं. वि. राजाध्यक्ष ‘ सत्यकथा ’, एप्रिल १९६३.

“ बालकवी ” चरित्राच्या निमित्ताने– गो. म. कुलकर्णी, ‘ सत्यकथा ’, ऑगस्ट १९६३, [ समाविष्ट ‘ खंडनमंडन ’, १९६८, पृ. ८९–१०५ ].

बालकवी— व. दि. कुलकर्णी, ‘ महाराष्ट्र टाइम्स ’, ११ ऑगस्ट, १९६३.
बालकवींच्या सहवासात— शं. के. कानेटकर, ‘ मनोहर ’, सप्टें. १९६३.
“ बालकवी ” [ परीक्षण ]— शं. के. कानेटकर, ‘ मांडवी ’, सप्टें. १९६३
बालकवी आणि रमाई— म. वा. धोंड, ‘ सत्यकथा ’, सप्टें. १९६३.
बालकवी आणि रमाई— कृ. बा. मराठे, ‘ सत्यकथा ’, नोव्हें. १९६३.
बालकवी— म. श्री. पंडित, ‘ युगवाणी ’, दिवाळी अंक १९६३.
बालकवी आणि रमाई— म. वा. धोंड, ‘ सत्यकथा ’, जाने. १९६४.
बालकवी आणि रमाई— म. वा. धोंड, ‘ अभिरुचि ’, सप्टें. १९६६.
बालकवींचा मृत्यू— म. वा. धोंड, ‘ सत्यकथा ’, डिसें. १९६६.

## बालकवींचे चरित्र व काव्यसमालोचन :

“ समग्र बालकवि ” ( संपा. पार्वतीबाई ठोमरे, १९६६ ) पृ. १–६७

## निकटवर्तियांच्या आठवणी :

“ समग्र बालकवि ” ( संपा. पार्वतीबाई ठोमरे, १९६६ ) पृ. ३२४–३७२.
बालकवि आणि रमाई— म. वा. धोंड, ‘ दीपावली ’, जाने. १९६७.
* बालकवींची अल्पस्मृती— वा. कृ. भावे, ‘ विहंगम ’.
* बालकवी आणि त्यांची कविता— वा. दा. पंडित.
* बालकवी आणि गोविंदाग्रज— कृ. बा. मराठे, ‘ आगे बढो ’.
* बालकवींची कविता— वसंत तांबे, ‘ मनोहर ’.
* बालकवींची काव्यरत्नावली— कृ. बा. मराठे, ‘ समीक्षक ’.
* बालकवींची प्रतिभा— ए. या. निफाडकर, ‘ लोकमान्य ’.
* दोन शेले— श्री. प. दांडेकर, ‘ सूर्यकांत ’.
* बालकवींच्या सहवासांत— डी. एस्. सॅम्सन ( कामरलेकर ), ‘ मनोहर ’.
* बालकवी त्र्यं. बा. ठोमरे— वा. कृ. भावे, ‘ सुमन ’.
* बालकवींची शब्दकळा—विजया राजाध्यक्ष, ‘ रत्नदीप ’.
* बालकवींची निसर्गकविता— सदा कऱ्हाडे, ‘ नवयुग ’.

## बालकवींच्या कवितांची रसग्रहणे, विश्लेषण :

बालकवींची ‘ फुलराणी ’— गिरीश, ‘ सह्याद्री ’, फेब्रु. १९३९.
* ‘ फुलराणी ’ आणि आठवणी— कृ. बा. मराठे, ‘ नवभारत ’.

* ' फुलराणी ' — गो. म. कुलकर्णी, ' मराठीचे स्वरूपदर्शन '.

* ' पाऊस '— अरविंद मंगरूळकर, ' सारस्वत प्रवेश '.

' पारवा '— बा. सी. मर्ढेकर, ' वाङ्मयीन महात्मता ' या निबंधात. ' सौंदर्य आणि साहित्य ', आ. २, १९६०, पृ. १६१.

' खेड्यांतील रात्र '– बा. सी. मर्ढेकर, ' वाङ्मय आणि सौंदर्यशास्त्र ' या लेखात ' सौंदर्य आणि साहित्य ', भा. २, १९६०, पृ. १०९–१११.

' खेड्यांतील रात्र '– माधव आचवल, ' सत्यकथा ', ऑक्टो. १९६१. (' मर्ढेकरांचा वाङ्मयविचार ' या लेखात ).

' खेड्यांतील रात्र '– प्रभाकर पाध्ये, ' सत्यकथा ', डिसें. १९६१.

' सचेतन तोल आणि खेड्यांतील रात्र '– संभाजी कदम, ' सत्यकथा ', जाने. १९६२.

' खेड्यांतील रात्र ' ( टिपण )– कृ. बा. मराठे, ' सत्यकथा ', एप्रिल १९६२.

' खेड्यांतील रात्र 'मधील काकस्थान ( टिपण )– आ. रा. देशपांडे, ' सत्यकथा ', मार्च १९६५.

' औदुंबर '– दि. के. बेडेकर, ' साहित्य निर्मिती आणि समीक्षा ' भा. १–१९५४, भा. २–१९६६, पृ. ८–१३.

' औदुंबर '– कृ. बा. मराठे, ' [illegible]मोहुर ', [illegible] १९६३.

९६९५६
REFBK-0016957
REFBK-0016957
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
१०३९४२ १९६२ ५।३।७९

# बालविहंग

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १२८७२

१९८८



